७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

मंगळवार, दि. १२ मे २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १३६ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये




# नेतृत्व करण्याची महाराष्ट्राची क्षमता : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**नवी दिल्ली (दै. संध्या)**

पायाभूत सुविधा, नाविन्यपूर्णता, प्रतिभा, स्वच्छ ऊर्जा, सुव्यवस्थित शहरीकरण, तंत्रज्ञान आणि संस्थात्मक विश्वास या घटकांवरून भविष्यातील आर्थिक नेतृत्व निश्चित होणार आहे. या सर्व शक्तींचा सहयोग साधणाऱ्या अर्थव्यवस्था भविष्याचे नेतृत्व करणार असल्याने ही क्षमता असणारा महाराष्ट्र त्यादृष्टीने आवश्यक इकोसिस्टीम उभारत आहे. जागतिक अर्थव्यवस्थेच्या पुढील युगासाठी महाराष्ट्र सज्ज असून त्यासाठी सर्व आघाड्यांवर जाणीवेने प्रयत्न सुरु असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. संतुलित प्रादेशिक विकास हा केवळ सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचा नाही, तर तो आर्थिकदृष्ट्याही अत्यंत शहाणपणाचा आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

नवी दिल्ली येथील हॉटेल ताज पॅलेसमध्ये कॉन्फिडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीतर्फे (सीआयआय) आयोजित अॅन्युअल बिझनेस समिट – २०२६ या दोन दिवसीय परिषदेअंतर्गत सकाळच्या सत्रात झालेल्या व्हिजन फॉर इंडिया@१०० परिसंवादात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. कॉन्फिडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीचे डायरेक्टर जनरल चंद्रदीप बॅनर्जी आणि अध्यक्ष राजीव मेमाणी यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

इतिहासात असे काही क्षण येतात जेव्हा देश बदलामध्ये सहभागी होतात आणि असेही काही क्षण येतात जेव्हा देश त्या बदलाची व्याख्या स्वतः ठरवतात. सध्याचा क्षण हा भारतासाठी बदलाची व्याख्या ठरवण्याचा आहे, असे गौरवोद्गार काढून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, आजचे जग एकाच वेळी अनेक स्थित्यंतरातून जात आहे—यात भू-राजकीय विखंडन, तांत्रिक उलथापालथ, ऊर्जा संक्रमण, पुरवठा साखळीतील बदल आणि आर्थिक विकासाच्या भविष्याबद्दलची मोठी अनिश्चितता यांचा समावेश आहे. मात्र, या अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर भारत हा एकमेव देश मोठ्या प्रमाणावर जगाचा आत्मविश्वास वाढवत आहे. त्याचे कारण केवळ आमची बाजारपेठ अथवा तरुण लोकसंख्या नाही तर आमच्याकडे स्थैर्य, महत्त्वाकांक्षा, लवचिकता आणि अंमलबजावणी करण्याची जबरदस्त क्षमता आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली, भारताने गेल्या दशकात स्वतःबद्दल जागतिक स्तरावर नवी प्रतिमा स्थापित केली आहे. आता आमच्याकडे क्षमतेसोबतच संधी आणि धोरणांची वेगाने अंमलबजावणी करणारा देश म्हणून पाहिले जात आहे.

# रायगडच्या राजकारणात खळबळ!

## ४ दिवसातच म्हसळा नगराध्यक्षांचा राजीनामा; शिवसेनेवर वरिष्ठांचा दबाव की सुनील तटकरेंची राजकीय गुगली?

**मुंबई (दै. संध्या)**



रायगड जिल्ह्यातील म्हसळा नगरपंचायतीत मोठी राजकीय उलथापालथ झाली आहे. अवघ्या चार दिवसांपूर्वी नगराध्यक्षपदी निवडून आलेले शिंदे गटाच्या शिवसेनेचे शाहीद जंजीरकर यांनी अचानक आपल्या पदाचा राजीनामा दिला. जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याकडे त्यांनी हा राजीनामा सादर केला. आपण कोणत्याही दबावाखाली नसून स्वखुशीने राजीनामा दिला असल्याचं जंजीरकर यांनी स्पष्ट केलं. असं असलं तरी या घडामोडीमागे नेमकं काय कारण आहे, याची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. शाहीद जंजीरकर यांच्या या अचानक निर्णयामुळे रायगडच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. काही दिवसांपूर्वीच त्यांनी सात नगरसेवकांच्या पाठिंब्यावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुनील शेडगे यांचा पराभव करून नगराध्यक्षपद मिळवले होते. मात्र, या विजयानंतर चारच दिवसात त्यांना पद सोडावे लागल्यानं शिवसेनेतील अंतर्गत दबाव आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार सुनील तटकरे यांच्या राजकीय रणनीतीची चर्चा सुरू झाली आहे. म्हसळा नगरपंचायतीच्या 17 सदस्यीय सभागृहात शिवसेनेला 9 जागांवर विजय मिळाला होता. त्यामुळे गेली दहा वर्षे असलेली राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता संपुष्टात आली. नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत शाहीद जंजीरकर यांनी राष्ट्रवादीचे उमेदवार सुनील शेडगे यांचा पराभव केला. हा निकाल खासदार सुनील तटकरे आणि मंत्री अदिती तटकरे यांच्यासाठी मोठा धक्का मानला जात होता. सत्तांतरानंतर नगराध्यक्षांच्या दालनातून खासदार सुनील तटकरे यांचा फोटो हटवून त्या ठिकाणी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि माजी मुख्यमंत्री बॅरिस्टर ए. आर. अंतुले यांचे फोटो लावण्यात आले होते.


क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

www.sandhyaepaper.com


## ढिंग-टांग




# मुंबईत मोठी कारवाई; दोन वेगवेगळ्या गुन्ह्यात १२ जणांना अटक

**मुंबई (दै. संध्या)**

अँटी नार्कोटिक्स सेलच्या कांदिवली युनिटने अंधेरी पश्चिमेतील वर्सोवा परिसरातील यारी रोडजवळ छापा टाकत मोठी ड्रग्ज कारवाई केली आहे. या कारवाईदरम्यान पोलिसांनी दोन आरोपींकडून 765 ग्रॅम हेरॉईन जप्त केले असून, आंतरराष्ट्रीय बाजारात या अमली पदार्थाची किंमत सुमारे 3.82 कोटी रुपये असल्याचे सांगितले जात आहे. दुसरीकडे ठाणे जिल्ह्यातील मीरा रोड परिसरात व्यावसायिक स्वरुपात एमडी ड्रग्सची खरेदी-विक्री करणाऱ्या मोठ्या अंमली पदार्थ रॅकेटचा गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष-4 ने पर्दाफाश केला आहे. या कारवाईत तब्बल 13 कोटी 61 लाख 38 हजार 480 रुपये किंमतीचा एमडी ड्रग्स जप्त करण्यात आले. याप्रकरणात 10 आरोपींना अटक करण्यात आली आहे.

कांदिवली ड्रग्स प्रकरणात पोलिसांनी दोन्ही आरोपींना ताब्यात घेत पुढील तपास सुरू केला आहे. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, या प्रकरणात ड्रग्ज पुरवठा साखळीशी संबंधित इतर व्यक्तींचाही शोध घेतला जात आहे. मिरा रोड प्रकरणात पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, 4



एप्रिल 2026 रोजी मिरा रोड पूर्व येथील छेडा आदर्श बिल्डिंग परिसरातील एका घरावर छापा टाकण्यात आला. या कारवाईदरम्यान श्रीमती फिरदोस अरबाज कुरेशी यांच्या घरातून 1 किलो 324 ग्रॅम वजनाचा अंदाजे 2 कोटी 66 लाख 17 हजार 280 रुपये किंमतीचा एमडी ड्रग्स जप्त करण्यात आला. तपासात हा अंमली पदार्थ तिचा पती अरबाज वकील कुरेशी याचा असल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी नयानगर पोलीस ठाण्यात गुंगीकारक औषधीद्रव्ये आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम 1985 अंतर्गत कलम 8(क), 21 (क), 22(क) आणि 29 नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष-4 ने तपासाची सूत्रे हाती घेत मुंबई, मिरा रोड आणि गुजरात येथे धडक कारवाया करत एकामागोमाग एक अशा 10 आरोपींना अटक केली.

# कोकणचा विकास हा महाराष्ट्राच्या विकासाचा कणा : सुनेत्रा पवार

**रायगड (दै. संध्या)**

रोहा शहराच्या सर्वांगीण विकासाला चालना देणाऱ्या विविध विकासकामांचे भूमिपूजन उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते आज पार पडले. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

डॉ. सी. डी. देशमुख सभागृह, रोहा येथे आयोजित कार्यक्रमास खासदार सुनील तटकरे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे, जिल्हा परिषद उपाध्यक्ष मधुकर पाटील, जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल, रोहा-अष्टमी नगर परिषद नगराध्यक्षा वनश्री शेडगे, उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, सभापती विजया पाशिलकर, उपसभापती संजय मांडलुस्कर, मुरुड नगराध्यक्षा दांडेकर, मुख्याधिकारी अजयकुमार एडके आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या, विकास म्हणजे केवळ सिमेंटच्या इमारती अथवा रस्ते नव्हे, तर सामान्य नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणणे होय. श्रद्धा, संस्कृती, पर्यावरण, पर्यटन आणि रोजगार यांचा समतोल राखून विकास साधण्यास शासन प्राधान्य देत आहे. कोकणातील नागरिक मेहनती, प्रामाणिक



रोहा येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन संपन्न

व कष्टाळू असून कोकणाचा विकास हा महाराष्ट्राच्या प्रगतीचा भक्कम पाया असल्याचे त्यांनी सांगितले.

रायगड ही छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाची पावन भूमी असून सामाजिक समतेचा इतिहास घडविणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महाड चवदार तळे सत्याग्रहाचीही ही भूमी आहे. कोकण हा निसर्गसंपन्न, सांस्कृतिक वैभव लाभलेला प्रदेश असून येथील विकासासाठी शासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी नमूद केले.

रोहा-अष्टमी नगर परिषद हद्दीतील कुंडलिका नदीकाठावर विविध ठिकाणी पुरसंरक्षक भिंती बांधणे, कुंडलिका नदी संवर्धन गार्डन येथे खाऊ गल्ली विकसित करणे, जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्स यांनी तयार केलेले शिवसृष्टी शिल्प उभारणे, धावीर महाराज मंदिर येथे भक्तनिवास नूतनीकरण करणे तसेच स्वर्गीय दत्ताजीराव ग. तटकरे ब्लड बँक विकसित करणे आदी विविध विकासकामांचे भूमिपूजन यावेळी करण्यात आले.

महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी मनोगतात स्व. अजित पवार यांच्या कार्याचा उल्लेख करताना, दर्जेदार विकासकामे करण्यावर त्यांचा नेहमी भर होता, असे सांगितले. कुंडलिका नदी संवर्धन प्रकल्पाच्या पुढील टप्प्यातील सुमारे 12.30 कोटी रुपयांच्या कामांचे भूमिपूजन आज होत असल्याचे त्यांनी नमूद केले. रायगड व कोकणाच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही त्यांनी दिली. खासदार सुनील तटकरे यांनी स्व. अजित पवार यांच्या विकासदृष्टीचा उल्लेख करताना, राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून विकासाला गती देण्याचे कार्य सुरू असल्याचे सांगितले. कार्यक्रमास नागरिक, लोकप्रतिनिधी तसेच विविध शासकीय विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ब्रेकिंग न्यूज

### आवाहनानंतर खर्चावर नियंत्रण

मुंबई (दै. संध्या) : देश सध्या कठीण परिस्थितीतून जात असताना राष्ट्रहिताला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केले आहे. त्या आवाहनाला प्रतिसाद देत सांस्कृतिक कार्य तथा इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री अॅड.आशिष शेलार यांनी यंदाच्या फ्रान्स येथील कान्स फिल्म फेस्टिव्हलला न जाण्याचा निर्णय घेतला आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री शेलार यांनी सांगितले की, कठीण काळात देशहिताला सर्वोच्च प्राधान्य देत विभागीय खर्चावर नियंत्रण ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच अधिकाधिक बैठका व्हर्च्युअल माध्यमातून घेण्यात येणार असून संसाधनांचा मर्यादित वापर करण्यावर भर दिला जाणार आहे. दरम्यान, कान्स चित्रपट महोत्सवात सहभागी होणाऱ्या मराठी चित्रपट तसेच त्यासंदर्भातील आवश्यक समन्वय आणि सहकार्यासाठी संबंधित यंत्रणा नियोजित पद्धतीने कार्यरत राहतील, तसेच मराठी सिनेमाला प्रोत्साहन देण्यासाठी जिथे आवश्यकता असेल तिथे ऑनलाईन सहभागी होईन, असेही सांस्कृतिक कार्य मंत्री अॅड.शेलार यांनी सांगितले.

## राष्ट्रीय महिला आयोगाचा धक्कादायक अहवाल मुख्यमंत्र्यांना सादर

# TCS प्रकरण : लैंगिक शोषण आणि मानसिक छळ

**नाशिक (दै. संध्या)**

नाशिक येथील TCS बीपीओ युनिटमधील महिला कर्मचाऱ्यांचे लैंगिक शोषण आणि जबरदस्तीने धर्मांतर केल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला असून, या प्रकरणाने आता मोठे वळण घेतले आहे. या गंभीर घटनेची दखल घेत राष्ट्रीय महिला आयोगाने सखोल चौकशीअंती 50 पानांहून अधिकचा धक्कादायक अहवाल प्रसिद्ध केला असून, तो पुढील कार्यवाहीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सादर करण्यात आला आहे.

राष्ट्रीय महिला आयोगाच्या या अहवालात कार्यस्थळावरील लैंगिक छळ, मानसिक अत्याचार आणि धार्मिक भावना दुखावल्या गेल्याचे गंभीर ताशेरे ओढण्यात आले असून, 'पॉश' कायद्याची अंमलबजावणी शून्य असल्याचे सांगितले आहे. आरोपींनी महिला कर्मचाऱ्यांचे लैंगिक, मानसिक आणि भावनिक शोषण केल्याचा स्पष्ट निष्कर्ष आयोगाने काढला आहे. इतकेच नव्हे तर, हिंदू धर्म, परंपरा आणि श्रद्धांचा अपमान करून महिलांवर विशिष्ट दबाव टाकल्याचा धक्कादायक आरोपही या अहवालाद्वारे करण्यात आला आहे. या अहवालात नमूद केल्यानुसार,



महिला कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण असून तक्रार केल्यास बदली किंवा नोकरी गमावण्याची धमकी दिली जात होती. विशेष म्हणजे, 'पॉश' समिती पूर्णपणे निष्क्रिय असून कार्यालयातील सीसीटीव्ही कॅमेरेही बंद अवस्थेत असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत राष्ट्रीय महिला आयोगाने पोलिसांना 'विटनेस प्रोटेक्शन अॅक्ट' अंतर्गत तक्रारदारांना संरक्षण देण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, संबंधित आरोपींवर बीएनएस कलम 75, 78, 79 आणि 299 अंतर्गत कठोर कारवाई करण्याची शिफारस करतानाच, महिलांच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष केल्याप्रकरणी टीसीएस व्यवस्थापनावरही ताशेरे ओढले आहेत.

नाशिकमधील TCS मध्ये महिला कर्मचाऱ्यांच्या लैंगिक शोषणाचे आणि मानसिक छळाचे अत्यंत गंभीर प्रकरण समोर आले असून, याप्रकरणी आतापर्यंत 8 पीडित महिलांनी तक्रार दाखल केली आहे.

या तक्रारींच्या आधारे पोलिसांनी एकूण 9 एफआयआर नोंदवल्या आहेत. यामध्ये कंपनीतील वरिष्ठ कर्मचारी, एचआर विभागाचे अधिकारी आणि डिलिव्हरी पार्टनर यांचा समावेश असून, त्यांच्यावर बळजबरी, लैंगिक शोषण, लग्नाचे आमिष दाखवून फसवणूक आणि धार्मिक भावना दुखावणे यांसारखे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. या प्रकरणात आतापर्यंत दोन महिलांसह एकूण 8 जणांना अटक करण्यात आली आहे. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन TCS प्रशासनाने अटक करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांचे तात्काळ निलंबन केले आहे.

कंपनीने एका निवेदनाद्वारे स्पष्ट केले आहे की, ते या संपूर्ण तपासात पोलिसांना पूर्ण सहकार्य करत आहेत. दुसरीकडे, डिलिव्हरी पार्टनर असलेल्या आरोपी महिलेच्या वकिलांनी मात्र हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. या प्रकरणातील आरोपांचे स्वरूप पाहता नाशिकमध्ये मोठी खळबळ उडाली असून, पीडित महिलांना न्याय मिळावा यासाठी विविध स्तरांतून मागणी होत आहे.

# शाळांनी ऑनलाईन क्लासेस घ्यावेत, वर्क फ्रॉम होमला प्राधान्य द्या

**मुंबई (दै. संध्या)**

पश्चिम आशियातील संकटाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना पुन्हा एकदा आवाहन केलं आहे. खाद्यतेलावर परकीय चलन जास्त प्रमाणात खर्च होतं.



त्यामुळे त्याचा कमी वापर करावा. तसेच शक्य तिथे ऑनलाईन मिटिंग घ्याव्यात, शाळांनी ऑनलाईन क्लासेस घ्यावेत असं आवाहनही मोदींनी केलं. गुजरातमधील एका कार्यक्रमात पंतप्रधान मोदींनी देशवासियांना ही आवाहनं केली आहेत.

### नरेंद्र मोदींची देशवासियांना आवाहनं

१. जोपर्यंत परिस्थिती ठीक होत नाही तोपर्यंत सोनं खरेदी करू नका.
२. भारतीयांमध्ये डेस्टिनेशन वेडिंगचा ट्रेंड वाढतोय. त्यामुळे परकीय चलनाचा साठा भरपूर खर्च होत आहे. डेस्टिनेशन वेडिंगसाठी परदेशाला प्राधान्य देऊ नका. देशात अनेक ठिकाणं ही लग्नांसाठी योग्य आहेत. त्या ठिकाणांना पसंती द्या. लग्न इथे होत असेल तर भारताच्या मातीचाही आशीर्वाद लाभेल.
३. अनेकजण परदेशात जाऊन सुट्टी एन्जॉय करतात. सुट्टीसाठी परदेशात जाण्यापेक्षा देशातील ऐतिहासिक स्थळांना भेट द्या.
४. विदेशात राहणाऱ्या भारतीयांनी पाच विदेशी पर्यटकांना भारतात आणावं, त्यांना भारत दाखवावा.
५. प्रवासासाठी मेट्रोचा जास्तीत जास्त वापर करा
६. कामाच्या ठिकाणी ऑनलाईन मिटिंगला प्राधान्य द्या.
७. शाळांनी ऑनलाईन क्लासेस घ्यावेत.
८. शेतीत स्वदेशी खाद्य वापरा. रासायनिक खतांचा वापर करू नका. डिझेल पंपाऐवजी शेतात सोलार पंपाला प्राधान्य द्या.
९. खाद्यतेलावर जास्त परकीय चलन खर्च होतं. त्यामुळे त्याचा वापर कमी करा.
१०. विदेशी साहित्यापेक्षा देशी उत्पादनांना प्राधान्य द्या. स्थानिक दुकानदारांकडूनच खरेदी करा.

# संपादकीय

## जेन-झी: हाऊ डेअर यू? - तुमची हिंमतच कशी झाली?

केट अॅलेक्झेंडर यांनी जेन-झीविषयी एक सुंदर सचित्र पुस्तक लिहिलं आहे. त्याचं नावच आहे, 'जनरेशन ब्रेव्ह'. ज्यूड ओर्लांडो यांच्या चित्रांनी सजलेलं हे पुस्तक जेन-झी पिढीला आकार देणाऱ्या मुलामुलींविषयी आहे. या पुस्तकाच्या सुरुवातीलाच हे उद्धरण आहे : 'येणाऱ्या काळात जगाचं रूप कसं असेल, याची कल्पना करून मला केवळ उत्साह वाटतो. आजचे तरुण वाट्टेल ते खपवून घेऊ इच्छित नाहीत. ते नव्या गोष्टींसाठी, सर्वांना सामावून घेईल, असं जग निर्माण करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. भविष्यासाठी हे सगळ्यात उत्तम असं मिश्रण आहे.' जगाशी, समाजाशी जुळवून घेण्यासाठी, अप्रिय, त्रासदायक गोष्टींमुळे न डगमगता पुढे जाण्यासाठी अशा सहनशीलता आवश्यक असते. मात्र, सामाजिक विषमतांच्या संदर्भात जगाकडे पाहताना लक्षात येतं की, अनेकदा ज्यांच्यासोबत अन्याय होत आहे, अशा लोकांना 'सहनशीलते'च्या नावाखाली त्यांच्या अस्तित्वालाच आव्हान देणाऱ्या अनेक गोष्टी त्यांना 'सहन करण्या'चा सल्ला दिला जातो. पारंपरिक भारतीय कुटुंबव्यवस्थेतल्या स्त्रियांना ही सहनशीलता लहानपणापासून शिकवली जाते. सहनशीलतेच्या गौरवीकरणाच्या पार्श्वभूमीवर अॅलेक्झेंडर म्हणतात, वाट्टेल ते खपवून घेण्याविषयी 'सहनशील' नसणं हा जेन-झींचा गुण त्यांना महत्त्वाचा वाटतो. प्रस्थापित जगातल्या विषमता, अन्यायांना आव्हान देण्यासाठी ही वृत्ती महत्त्वाची आहे. मात्र त्याचबरोबर समानुभूती सर्वसमावेशकता या जेन-झीच्या दुसऱ्या गुणधर्माकडे अॅलेक्झेंडर लक्ष वेधतात. अधिकाधिक लोक, त्यांचे विविध दृष्टिकोन, विविध सामाजिक पार्श्वभूमींतून आलेल्या जाणिवा आणि समाजपरिवर्तनासाठीच्या आणि नवनव्या विचारांविषयी खुलं असणंदेखील तितकंच आवश्यक आहे. आज आहे त्यापेक्षा चांगलं जग घडवण्यासाठीचा आपला काफिला सतरंगी असायला हवा. आपल्या पूर्वग्रहांना आव्हान देणारे नवे विचार, वेगळे समाज आणि समूह यांना आपल्या आयुष्यात जेव्हा महत्त्वाचं स्थान असतं, तेव्हा खऱ्या अर्थाने आपण स्वतः आणि आपला समाजदेखील उन्नत होऊ लागतो.

ग्रेटा थनबर्ग हे या जेन-झी कार्यकर्त्यांमधलं महत्त्वाचं नाव. अगदी शाळकरी वयापासून ग्रेटाने पर्यावरणीय न्यायाच्या प्रश्नाकडे जगाचं लक्ष वेधलं. नैसर्गिक संसाधनांना ओरबाडत बेबंद प्रदूषण करणाऱ्या उद्योगांमागच्या साट्यालोट्याच्या भांडवलशाहीला जोवर आव्हान देत नाही, तोवर या पृथ्वीचं भविष्यच काय, वर्तमानदेखील धोक्यात आहे, हे या कार्यकर्त्यांनी हिरिरीने मांडायला सुरुवात केली आणि पाहता-पाहता मोठमोठ्या कंपन्या आणि सरकारांनादेखील ही मंडळी विचारू लागली, 'हाऊ डेअर यू? आमचं आणि येणाऱ्या पिढ्यांचं जगणं अंधारात लोटण्याची तुमची हिंमत कशी झाली?' 'पर्यावरण वाचवा' अशा आशयाची केवळ पोस्टर्स उभी करणं पुरेसं नाही, (खरं तर ते अर्थहीनच आहे!) तर ते बिघडविणाऱ्या सर्वात मोठ्या ताकदींच्या विरोधात संघटित लढा उभारल्याशिवाय पृथ्वी आणि पर्यायाने आपण कोणीच वाचणार नाही, ही महत्त्वाची जाणीव या पिढीने करून दिली. शिवाय, पर्यावरणाचा लढा मानवी न्यायाच्या लढ्याशी जोडलेला आहे, हेदेखील यांनी वारंवार मांडलं. स्थानिक समूह, पर्यावरणपूरक लोकपरंपरा आणि आदिवासी जीवनशैलीच्या हक्कांसाठीचे लढे पर्यावरणाच्या लढ्याशी जोडलेले आहेत आणि आक्रमक भांडवलशाहीचा जसा पर्यावरणाला धोका आहे, तसा मानवी जगण्यालादेखील आहे, हे जेन-झी लढ्यांमध्ये मांडलं गेलं. पर्यावरण आणि मानवता यात द्वैत नाही, या जाणिवेमुळेच ग्रेटा आज पॅलेस्टाइनमध्ये होणाऱ्या नरसंहाराविरोधात ठाम उभी आहे. युद्धाच्या सावटामध्ये ना माणूस टिकेल, ना निसर्ग बहरेल, हेच ती धाडसाने जगाला सांगत आहे.

## संस्कृत सुभाषित

गुरू सुखाचा सागरू । गुरू प्रेमाचा आगरू ।
गुरू धैर्याचा डोंगरू । कदाकाळी डळमळी ना ।।

अर्थ – चैतन्य आणि प्रसन्नता हे शिक्षकाचे आणखी महत्त्वाचे गुण आहेत. तो स्वत:च चैतन्यवादी हवा. त्याच्यासमोर तर आपल्या जीवनातील अगदी उमलणाऱ्या वयातील विद्यार्थ्यांचा उत्साही चमूच असतो. त्याच्या सहवासात तर शिक्षक आणखीच उल्हसित होतात.

## गुरु वचन

### ज्येष्ठांच्या अनुभवाला कमी लेखू नका

एका शेठजीकडे अपार संपत्ती होती. एकेदिवशी त्याच्या मनात विचार आला की, एक भव्य शिव मंदिर बांधावे. सहा महिन्यात मंदिर बांधून तयार झाले. मंदिर उभारणीसाठी लागलेल्या खर्चाशिवाय जो पैसा शेठजीकडे उरला होता तो त्यांनी मंदिराच्या घुमटात भरून ठेवला.

याचा उल्लेख त्यांनी आपल्या वहीखात्यातही केला. नंतर ते तीर्थयात्रेला निघाले. मात्र वाटेतच त्यांचे निधन झाले. शेठजीचे चार मुले होती आणि चारही जण व्यापारी होते. शेठजीच्या मृत्युनंतर काही दिवसांनी त्यांच्या व्यापारात तोटा झाला. त्यामुळे त्यांना पैशाची आवश्यकता भासू लागली. तेव्हा त्यांनी आपल्या वडिलांची जुनी वहीखाते शोधण्यास सुरूवात केली. त्यापैकी एकात मंदिराच्या घुमटात धन ठेवल्याचा उल्लेख होता.

त्यात असेही लिहिले होते की, धन चैत्र शुक्ल नवमीच्या दिवशी घुमटात भरले होते. चार जणांनी घुमट तोडले. मात्र त्यांना धन मिळाले नाही. तेव्हा त्यांना आपल्या वडिलांचे घनिष्ठ मित्र असलेल्या एका ज्येष्ठ व्यक्तीला गाठले आणि घडलेला प्रकार सांगितला. त्या व्यक्तीने त्यांना चैत्र शुक्ल नवमीच्या दिवशी बारा वाजता येण्यास सांगितले. ठरलेल्या दिवशी व वेळी त्या व्यक्तीने त्या ठिकाणी खोदण्यास सुरूवात केली जिथे घुमटाची सावली पडली होती.

घुमटाची सावली चैत्र शुक्ल नवमीच्या दिवशी दुपारी बारा वाजता धन भरले होते आणि त्याच महिन्यात, दिवशी आणि वेळी घुमटाची सावली पडणाऱ्या ठिकाणी खोदकाम करण्यात आल्यावर धन सापडले. चौघा भावांनी ज्येष्ठ व्यक्तीचे आभार मानले आणि त्या धनातून आपला व्यापार पुन्हा सुरू केला. यावरून ज्येष्ठांच्या ठिकाणी असलेल्या अनुभवाला कमी लेखू नये, हेच ही कथा सांगते.

## उपदेशकथा

### मदत

अमेरिका स्वतंत्र झाल्यानंतरची घटना. रस्त्याच्या कडेने जात असताना लष्कराची गाडी अडचणीच्या जागेत अडकली होती. आतील शिपाई उतरुन तिला बाहेर काढण्याचा प्रयत्न करु लागले. त्यांच्यावरचा अंमलदार फक्त हुकूम देत होता.

त्याने मदत केली असती तर गाडी नक्की निघाली असती पण तो होता साहेब ! फक्त हुकूम देत उभे राहणेच त्याने पसंत केले. तेवढ्यात तिकडून एक गाडी आली.

त्या गाडीतून एक सज्जन उतरला. त्याने सैनिकांना प्रत्यक्ष हातभार लावला. गाडी अडचणीतून बाहेर पडली. दुसऱ्या गाडीतून आलेला तो सज्जन अंमलदार साहेबाला म्हणाला, पुन्हा गरज पडली तर मला बोलवत जा आणि त्याने आपल्या कोटाच्या खिशात हात घातला. आपला पत्ता असलेले कार्ड बाहेर काढले व त्या अंमलदारला दिले.

त्याने ते सहज म्हणून वाचले. त्याला दरदरुन घाम फुटला. कारण मदतीला आलेला तो सज्जन अमेरिकेचा सर्वेसर्वा अध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन होता.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | योग:वैधृति २३:१९:०१ |
| १२ मे २०२६ | करण:विष्टि १४:५२:४१ |
| मंगळवार | करण:बव २६:१७:३४+ |
| विक्रम संवत्– २०८२ | सूर्य:मेष |
| वैशाख शके | चन्द्र:मीन१९:२४:४१ |
| संवत्– १९४८ | हिजरी सन् – १४४६ |
| संवत्सर –पराभवनाम | मुस्लिम मास – जिल्काद |
| अयन– उत्तरायणारंभ | तारीख – २५ |
| मास– वैशाख | विशेष |
| ऋतु– सौर ग्रीष्म | पारशी दये मासारंभ |
| कृष्ण पक्ष | संत मुक्ताबाई पुण्यतिथी |
| तिथि:दशमी १४:५२:४१ | – मुक्ताईनगर (एदलाबाद) |
| नक्षत्र:पूर्वाभाद्रपद २५:१७:१२+ | |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९४६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 6 | 4 | | | 2 | |
| 7 | | | | 1 | | | | |
| 6 | 2 | | 7 | 9 | | 1 | | 5 |
| 2 | | 9 | 5 | | | 4 | 8 | |
| 1 | | 7 | | | | 9 | | 3 |
| | 4 | 3 | | | 9 | 7 | | 2 |
| 9 | | 2 | | 3 | 6 | | 1 | 8 |
| | | | | 8 | | | | 4 |
| | 3 | | | 5 | 1 | | | |

### : सूडोकु :

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ९४५ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 4 | 9 | 6 | 3 | 8 | 5 | 7 |
| 9 | 7 | 8 | 5 | 4 | 2 | 3 | 6 | 1 |
| 3 | 6 | 5 | 7 | 8 | 1 | 9 | 4 | 2 |
| 5 | 9 | 3 | 2 | 1 | 7 | 6 | 8 | 4 |
| 8 | 1 | 7 | 4 | 5 | 6 | 2 | 9 | 3 |
| 2 | 4 | 6 | 8 | 3 | 9 | 1 | 7 | 5 |
| 4 | 5 | 2 | 1 | 9 | 8 | 7 | 3 | 6 |
| 6 | 8 | 1 | 3 | 7 | 4 | 5 | 2 | 9 |
| 7 | 3 | 9 | 6 | 2 | 5 | 4 | 1 | 8 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १३२८ – रोम येथे प्रतीपोप निकोलस पाचव्याचा राज्याभिषेक.
- १५८८ – फ्रांसचा राजा हेन्री तिसऱ्याने पॅरिसमधून पळ काढला.
- १६८९ – इंग्लंडचा राजा विल्यम तिसऱ्याने फ्रांस विरुद्ध युद्ध पुकारले.
- १७८० – अमेरिकन क्रांति – ब्रिटीश सैन्याने चार्ल्स्टन, दक्षिण कॅरोलिना जिंकले.
- १७९७ – नेपोलियन बोनापार्टने व्हेनिस जिंकले.
- १८६२ – अमेरिकेचे सैन्य लुईझियानाच्या बॅटन रूज शहरात शिरले.

### राष्ट्रीय

- १९५२ – प्रजासत्ताक भारताचे पहिले संसदीय अधिवेशन सुरू.
- १९५२ – गजसिंग जोधपुरच्या राजेपदी.
- २००६ – नवी दिल्लीतील सीलींग तोडफोड रोकण्या संबंधीचे विधेयक लोकसभेत मंजूर झाले.

### जन्म

- १४०१ – शोको, जपानी सम्राटचा जन्म.
- १४९६ – गुस्ताव पहिला, स्वीडनचा राजाचा जन्म.
- १६७० – फ्रेडरिक ऑगस्टस पहिला, पोर्तुगालचा राजाचा जन्म.
- १८२० – फ्लॉरेन्स नाईटिंगेल, आधुनिक शुश्रुषाशास्त्राच्या संस्थापिका; ब्रिटिश परिचारिकाचा जन्म.
- १८६७ – ह्यु ट्रम्बल, ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटूचा जन्म.
- १८८९ – ऑट्टो फ्रँक, जर्मन लेखकाचा जन्म.

### निधन

- १००३ – पोप सिल्व्हेस्टर दुसरा याचे निधन.
- १०१२ – पोप सर्जियस चौथा याचे निधन.
- १३८२ – जोन पहिली, नेपल्सची राणीचे निधन.
- १८८९ – जॉन कॅडबरी, इंग्लिश उद्योगपतीचे निधन.

## : SMS :

Light The Fags
With The Heat
Of The Lever,
My Bosom Is On Fire!
Nahi aaya Samajh?
Chalo Hindi
main sun lo.
Beedi Jalai lay
Jigar se Piya, Jigar
Maan bari Aag hai.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३७.७ | २७ |
| अहमदनगर | ३७.२ | २६.५ |
| अकोला | ४१.८ | ३०.१ |
| अमरावती | ४०.३ | २८.५ |
| बीड | ४४ | २९.७ |
| भंडारा | ४१.७ | २६.८ |
| बुलढाणा | ३६.४ | २४.५ |
| चंद्रपूर | ४५.१ | २९.५ |
| चेन्नई | ३९.२ | ३०.८ |
| नवी दिल्ली | ३७.५ | २६.१ |
| धुळे | ४१.५ | २९.२ |
| गोंदिया | ३९.६ | २५.४ |
| जळगाव | ४२.४ | ३०.४ |
| कोल्हापूर | ३८.३ | २६.१ |
| लातूर | ३८ | २५.८ |
| मुंबई | ४३.८ | ३५.२ |
| नागपूर | ४१.२ | २६.७ |
| नांदेड | ४१.२ | २७.२ |
| नंदूरबार | ४०.५ | २९.२ |
| नाशिक | ३८.३ | २५.१ |
| पुणे | ३६.८ | २५.९ |
| पंढरपूर | ४०.६ | २७.१ |
| सातारा | ३८.४ | २४.५ |
| सांगली | ३९.३ | २६.९ |
| सोलापूर | ३९.८ | २९.१ |
| वर्धा | ४२.८ | २७.३ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग: पांढरा,शुभ दिशा: पश्चिम भाग्योदय असल्यामुळे यश मिळण्याचे योग आहे.

**तूळ :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: दक्षिण विचार पूर्वक निर्णय घेतला तर यश मिळेल.

**वृषभ :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा : दक्षिण विशेष प्रयत्न केले तर यश मिळणार आहे. कर्ज काढू नका. मुलांचे जीवन सुखमय राहील.

**वृश्चिक :** शुभ रंग : गुलाबी, शुभ दिशा : पश्चिम आपल्या बौद्धीक क्षमतेवर अडचणी पार पडतील. विद्यार्थ्यांनी अभ्यासाकत्रडे लक्ष द्यावे.

**मिथून :** शुभ रंग :लाल,शुभ दिशा:पूर्व आज अचानक लाभ होण्याची शक्यता आहे. मेहनत व परिश्रमामुळे यश मिळेल. आरोग्याची काळजी घ्या.

**धनू :** शुभ रंग– लाल, शुभ दिशा– पश्चिम मनमिळावू स्वभाव असल्या कारणामुळे अडकून पडलेली कामे पूर्ण होतील. मान सन्मान वाढेल.

**कर्क :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा: पूर्व मान सन्मान मिळण्याचे योग आहेत. खाजगी कामासाठी प्रवास घडेल.

**मकर :** शुभ रंग: पिवळा,शुभ दिशा: पूर्व राजकीय व्यक्तिंकडून फायदा मिळेल. आपले विरोधक आपल्याला अडचणीत आणण्याचा प्रयत्न करतील.


**सिंह :** शुभ रंग: लाल,शुभ दिशा: पूर्व मुलांच्या कामामुळे प्रसन्न रहाल. अडकलेली कामे पूर्ण होतील. व्यापारात मनासारखा फायदा मिळेल. आज प्रवास करू नका.

**कुंभ :** शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: पश्चिम आपली अनावश्यक खर्च करण्याच्या प्रवृत्तीमुळे अडचण निर्माण होईल.

**कन्या :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पूर्व सामाजिक कामात सहभाग घ्याल. आर्थिक स्थिती चांगली राहील. आपले वर्चस्व वाढेल.

**मीन :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा: दक्षिण कुटुंबात धार्मिक, शुभ कार्याची योजना आखली जाईल. आपल्या व्यवहार चातुर्याचे कौतुक होईल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९४६



### आडवे शब्द

१. हालचाल
४. जिवाची पर्वा न करता एखादे कार्य करणे
१०. मिठी
११. 'आधा है चंद्रमा, रात आधी' गाण्याचा व्ही.शांताराम यांचा चित्रपट
१२. बूड
१३. उत्तरेकडील बर्फाच्छादित पर्वतराजी
१५. सत्ता
१६. उपस्थित
१८. कोरा
१९. उदबत्ती
२१. एकरुप
२४. अंधार
२६. सर्वसामान्य
२७. त्रिभुवनसंचारी मुनी
२८. दिवसाचे त्रिकाळ
३१. चंद्र
३३. घराणे
३४. शरीर
३५. गवताचे पान
३६. वाईट सवय
३७. अत्यंत मऊ धाग्याचे कापड
३८. आर्जव
३९. खराब
४१. वडील
४२. नोकर
४४. लाडिक, लाघवी
४६. अनेकांची कर्जे घेतलेला
४८. नशा आणणारा एक पदार्थ
४९. चांगला, सभ्य
५०. लाकडी जीना
५२. गाय
५३. उत्सवाचे दिवस
५५. लाज
५६. चापबाण
५७. विद्यापीठातील विभागप्रमुख
५८. फटाक्यातील मसाला
६१. केस
६३. भुतावळ
६६. समीक्षा
६७. गळून जाणे, थकणे
७१. चांदी
७२. मनसोक्त
७३. बेचव

### उभे शब्द

१. लखलखणारे
२. रामाचा एक पुत्र
३. व्याकरणातील तीन काळ
४. जवळचे, जिवाभावाचे
५. सदोदित
६. तमाशा
७. आकलन, भान
८. निमग्न, रममाण
९. अहल्यादेवींचे आडनाव
१४. सत्ता
१६. गज
१७. रसभरीत
१९. मृत्यू नसलेला
२०. फणसाचा एक प्रकार
२२. सहाय्य
२३. च्यापुढे, प्रत्यक्ष
२५. चर्चा
२६. पायापासून डोक्यापर्यंत
२९. मुलेबाळे
३०. चेष्टेत रूप, समाधीची प्रथमावस्था
३२. खाटीक
३३. व्यक्तीच्या चारित्र्याचे परंपरागत मापदंड
३५. गवती चहा
३८. उलट, विरुद्ध
३९. उत्तराधिकारी
४०. धनुष्याच्या दोरीचा आवाज
४१. हार्मोनियम
४३. हात
४५. डबा (हिंदी)
४७. लहान मुलांची शाळा
५१. धमकी
५३. हुक्की
५४. विमानाची धावपट्टी (इंग्रजी)
५४अ. उनाड
५५. --- आझमी
५९. थांबणे (हिंदी)
६०. युद्ध
६२. प्रचलित नाणे
६४. शक्ती
६५. सेनापती
६८. मातीचा कण
६९. गेलेला, जुना
७०. दोन मैलाचे अंतर

### जम्बो शब्दकोडे क्र. ९४५ चे उत्तर

**आडवे उत्तर**
१.अवयव ४.जगन्नाथ ७.वापर १०.नोट ११.चमचमीत १३.रजई १५.पेकाट १६.वानर १७.नकार १९.वटवट २१.खीज २३.वाडी २५.लसलस २७.पोळ २८.पदर ३०.रजा ३२.नाव ३२अ.एकटक ३४.रातवा ३६.गृह ३७.कल ४०.खप ४१.सरबती ४३.जरकबरक ४५.सलवार ४७.कश ४८.गोपुर ४९.कथाकथन ५१.कूपमंडूक ५२.करवत ५४.वनराज ५५.पागा ५६.मकबरा ५८.सहज ६०.कवठ ६१.मावळा ६३.पत ६४.रब ६५.पास ६६.मानस ६७.मारामारी ७०.पनवती ७२.क्षमायाचक ७४. मोदकपात्र ७७.पालक ७८.पल्ला ७९.क्षमाशील ८०.विनवणी ८१.चित्रपट

**उभे उत्तर**
१.अनोळखी २.वट ३.वचन ४.जमीन ५.गतकाल ६.थर ७.वाईट ८.रपेट ९.अटकळ १२.मरवा १४.जवस १८.रसना २०.वचक २२.जपतप २४.डीर २६.लवकर २७.पोक २९.दवा ३१.जागृती ३३.टणक ३४.राखरांगोळी ३५.बरवा ३८.लकडा ३९.विनाशक ४१.सल ४२.बरकत ४४.रजपज ४५.सरकगाठ ४६.चकमक ४७.कडूजहर ५०.नवरा ५१.कुरापत ५३.वर्तमानपत्र ५५.पावस ५६.मळा ५७.बकरा ५९.जबर ६०.कपाळमोक्ष ६२.वसन ६३.परीक्षक ६७.माती ६८.छायाचित्र ६९.चौकशी ७१.वर्तन ७३.कपट ७५.दमा ७६.पाल ७७.पाणी

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### विभागीय आयुक्त कार्यालयात लोकशाही दिनात चार प्रकरणांवर सुनावणी

पुणे (दैनिक संध्या) : विभागीय आयुक्त कार्यालयात विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विभागीय लोकशाही दिनात पुणे जिल्ह्यातील चार प्रकरणांवर सुनावणी घेण्यात आली. यावेळी कोल्हापूर परिक्षेत्राचे पोलीस महासंचालक सुनील फुलारी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, तक्रारदार उपस्थित होते. जिल्हा स्तरावर येणाऱ्या तक्रार अर्जांवर जिल्हास्तरीय लोकशाही दिनात उचित कार्यवाही होणे आवश्यक असून त्यासाठी निर्णय देताना नियम व कायद्याच्या तरतुदीचे पालन करावे, अशा सूचना डॉ.पुलकुंडवार यांनी दिल्या. विभागातील सर्वसामान्य जनतेच्या तक्रारी, अडचणी यांची शासकीय यंत्रणेकडून न्याय्य पद्धतीने व तत्परतेने सोडवणूक करण्यासाठी दर महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी विभागीय आयुक्त कार्यालयात विभागीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. या लोकशाही दिनात नव्याने दाखल चार प्रकरणांचा समावेश होता. या अर्जदारांना तसेच संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सोबतच्या कागदपत्रांसह आपले म्हणणे मांडण्याची संधी देऊन श्री. पुलकुंडवार यांनी सुनावणी घेतली.

### दुचाकी वाहन क्रमांक आरक्षणासाठी 12मेपासून फेसलेस सेवा सुरु

पुणे (दैनिक संध्या) : प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे येथे नवीन दुचाकी वाहनांसाठी आकर्षक, पसंतीचा नोंदणी क्रमांक आरक्षित करण्याची फेसलेस (ऑनलाईन) सेवा १२ मे २०२६रोजी दुपारी १२ वाजल्यापासून सुरू होणार आहे. ही सेवा पूर्णपणे ऑनलाईन स्वरूपात कार्यान्वित असून, कार्यालयामध्ये ऑफलाईन पद्धतीने शुल्क स्वीकारले जाणार नाही. नागरिकांनी ही सेवा घरबसल्या https://fancy.parivahan.gov.in या संकेतस्थळावरून वापर करता येईल. फेसलेस सेवा कार्यान्वित असून, अर्जदार आधार लिंक मोबाईल क्रमांकाद्वारे ओटीपी घेऊन नोंदणी प्रक्रिया पूर्ण करू शकतात. नव्याने सुरू होणाऱ्या 'एमएच १२ झेडआर' मालिकेतील पसंतीचे नोंदणी क्रमांक अर्जदारांना आरक्षित करता येतील. असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे यांनी प्रसिध्दीपत्रकान्वये कळविले आहे.

### अनैतिक संबंधातून तरुणाचा खून; कात्रजमधील आंबेगाव भागातील घटना

पुणे (दैनिक संध्या) : अनैतिक संबंधाच्या संशयावरुन तरुणावर तीक्ष्ण शस्त्राने वार करुन खून करण्यात आल्याची घटना कात्रजमधील आंबेगाव भागात रविवारी रात्री घडली. दीपक क्षीरसागर (वय ३८, रा. समर्थ हाईट्स, इंद्रायणीनगर, टेल्को कॉलनी, आंबेगाव) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दीपक क्षीरसागर हा पुणे महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागात कामाला होता. तो विवाहित होता. रविवारी रात्री जेवण केल्यानंतर तो इंद्रायणीनगर भागात घरासमोर थांबला होता. त्या वेळी दोघांनी त्याच्यावर तीक्ष्ण शस्त्राने वार केले. या घटनेची माहिती मिळताच आंबेगाव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शरद झिने यांनी घटनास्थळी भेट दिली. पोलिसांनी खून प्रकरणात चौकशी केली. तेव्हा दीपक याचा अनैतिक संबंधातून खून झाल्याची माहिती प्राथमिक तपासात मिळाली. पसार झालेल्या हल्लेखोरांचा शोध घेण्यात येत आहे.

### अनैतिक संबंधातून खून

पुणे (दैनिक संध्या) : मुंढवा परिसरात ब्युटी पार्लरचालक तरुणीचा खून करण्यात आल्याची घटना नुकतीच घडली. तरुणीचा मोटारीत गळा दाबून तिचा खून करण्यात आला. तिचा मृतदेह मुंढव्यातील केशवनगर भागात कचरा डेपोजवळ टाकून आरोपी पसार झाला. गुन्हे शाखेने या प्रकरणाचा तपास करुन खून प्रकरणाचा छडा लावला. या प्रकरणी गोरखनाथ देवराव शिंदे (वय ४४, सध्या रा. चंदननगर, मूळ रा. बीड) याला अटक करण्यात आली. अनैतिक संबंध, तसेच आर्थिक वादातून खून केल्याची माहिती तपासात मिळाली. अनैतिक संबंधातून शहरात खुनाच्या दोन घटना घडल्या.

### 'फॅमिली डॉक्टर' हरवला... भविष्यात डॉक्टरांचं काय होणार ?

पुणे (दैनिक संध्या) : 'सध्या स्पेशालिस्ट आणि सुपर स्पेशालिस्ट रुग्णालयांच्या संस्कृतीमुळे 'फॅमिली डॉक्टर' हरवला आहे. अशा मोठ्या रुग्णालयात एखादा रुग्ण दाखल झाला, की तो तिथल्या यंत्रणेत हरवून जातो, घाबरतो. तिथे त्याला पूर्ण वेळ सांभाळणारा एकही 'फॅमिली डॉक्टर' नसतो. रुग्णाला त्याच्या रोजच्या संवादासाठी 'फॅमिली डॉक्टर'ची गरज असते. आता समाजानेच आम्हाला 'फॅमिली डॉक्टर' हवा आहे, अशी मागणी करण्याची वेळ आली आहे,' अशी खंत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या माजी कुलगुरू आणि निवृत्त लेफ्टनंट जनरल डॉ. माधुरी कानिटकर यांनी व्यक्त केली. 'फॅमिली डॉक्टर'ची गरज ओळखून महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात देशातील पहिला 'इंटिग्रेटेड कोर्स इन फॅमिली मेडिसीन' सुरू केल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. समवेदना संस्थेच्या २३ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात डॉ. कानिटकर यांनी 'जिद्द, शिस्त आणि आरोग्य' या विषयावर मार्गदर्शन केले. लेफ्टनंट जनरल (निवृत्त) राजेंद्र कानिटकर, शिक्षणतज्ज्ञ डॉ. राजा आणि रेणू दांडेकर, संस्थेच्या सल्लागार समितीचे सदस्य राजीव साबडे, व्यवस्थापक अमर पवार उपस्थित होते. याच कार्यक्रमात चंद्रकांत आरोळे आणि माधवी राऊत यांचा कृतज्ञता सत्कार करण्यात आला. संस्थेच्या वार्षिक अहवालाचेही प्रकाशन करण्यात आले.

### डॉक्टरांकडे जाताना फाईल्सचा गठ्ठा नेणे जीवावर बेतू शकते

पुणे (दैनिक संध्या) :'सध्याच्या काळात पेशंट आणि डॉक्टर यांच्यातील विश्वास वाढणे गरजेचे झाले आहे. हे नाते समान पातळीवर असायला हवे,' अशा शब्दांत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या माजी कुलगुरू आणि लेफ्टनंट जनरल (निवृत्त) डॉ. माधुरी कानिटकर यांनी रुग्ण आणि डॉक्टर यांच्यातील बदलत्या नात्यावर भाष्य केले. पुण्यातील समवेदना संस्थेच्या कार्यक्रमात डॉ. कानिटकर यांनी 'जिद्द, शिस्त आणि आरोग्य' या विषयावर मार्गदर्शन केले. रुग्णांच्या सवयींबद्दल बोलताना डॉ. माधुरी कानिटकर म्हणाल्या,'अनेकदा रुग्णांना स्पेशालिस्ट डॉक्टरकडे गेले की वाटते, हा हृदयाचा तज्ज्ञ कार्डिओलॉजिस्ट आहे. त्याला माझे दुसरे दुखणे, औषधे का सांगू. मी तर होमिओपॅथीची औषधे घेते, कशाला या डॉक्टरांना सांगायचं ? अशा समजामुळे रूग्ण डॉक्टरपासून माहिती लपवतात. मात्र, असे करणे घातक ठरू शकते. त्यामुळे जे काही उपचार घेत आहात, ते डॉक्टरांना स्पष्टपणे सांगा. डॉक्टर आणि रुग्ण यांच्यात विश्वासाचे नाते हवे. आपण काय घेतोय, काय करतोय ते सर्व डॉक्टरांना स्पष्ट माहिती असणे गरजेचे असते.' 'माझ्याकडे रुग्ण अनेकदा अशा फाईल्सचा गठ्ठा घेऊन येतात,' असा अनुभव सांगत डॉ. माधुरी कानिटकर यांनी रुग्णांकडील कागदपत्रांच्या व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या, 'ज्येष्ठ नागरिकांकडे आजारांच्या फाईल्सचा मोठा गट्टा असतो. डॉक्टरला या सगळ्या फायली वाचायला वेळ नसतो. पण, ही सगळी माहिती मिळणेही गरजेचे असते. त्यासाठी आपल्यावर सुरू असलेल्या उपचारांचा एक सारांश रूग्णाने नोंद करून ठेवणे गरजेचे झाले आहे. त्यासाठी आता एआय किंवा डिजिटल टूल्स वापरून, आपल्या आजारांची डेट-वाईज समरी बनवता येते. तसेच डायरीच्या एका पानावर आपला ब्लड ग्रुप, कधी कुठल्या आजाराचे निदान झाले की नोंदवून ठेवणे गरजेचे आहे. तर, सुरू असलेल्या त्या-त्या वेळच्या औषधांची नेमकी यादीही एका 'फ्लॅग पेज'वर नोंदवून ठेवायला हवी.' 'एकापेक्षा जास्त डॉक्टरांकडून उपचार घेताना वेगवेगळ्या प्रिस्क्रिप्शनमुळे 'ड्रग इंटरॅक्शन' होण्याचा धोका असतो.

# शाईफेक प्रकरणावर काँग्रेस आक्रमक

## "हा हल्ला संतांच्या सहिष्णू महाराष्ट्राच्या परंपरेवर"

पुणे (दै. संध्या)

इंडियन नॅशनल काँग्रेसने राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते आणि प्रवचनकार विकास लवांडे यांच्यावर झालेल्या शाईफेक हल्ल्याचा तीव्र निषेध केला आहे. हा हल्ला केवळ विकास लवांडे यांच्यावर नसून, महाराष्ट्राच्या संतपरंपरा, सहिष्णुता आणि सामाजिक सलोखा यांच्या मूल्यांवरच आघात असल्याचे काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते गोपाळ तिवारी यांनी म्हटले आहे.

प्रसिद्धीपत्रकाद्वारे प्रतिक्रिया देताना गोपाळ तिवारी म्हणाले की, स्वतःला वारकरी म्हणवणारे संग्राम भंडारे यांनी केलेला हा प्रकार अत्यंत निंदनीय असून महाराष्ट्राच्या संतसंस्कृतीला काळिमा फासणारा आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू तुकाराम महाराज यांनी समाजाला सहिष्णुता, समता आणि मानवतेचा संदेश दिला. त्या संतपरंपरेचा वारसा असलेल्या महाराष्ट्रात अशा प्रकारची हिंसक प्रवृत्ती वाढत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.



तिवारी यांनी आरोप केला की, संग्राम भंडारे यांनी यापूर्वीही काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्याविरोधात धमकीची भाषा वापरली होती. त्यावेळी राज्यभरातून निषेध व्यक्त करण्यात आला होता. तरीही अशा प्रवृत्तींना आळा बसलेला नाही. काही कट्टरवादी विचारसरणींना राजकीय पाठबळ मिळत असल्यामुळेच अशा घटना वारंवार घडत असल्याचा आरोप त्यांनी केला.

त्यांनी पुढे सांगितले की, महाराष्ट्राची ओळख ही संत, समाजसुधारक आणि पुरोगामी विचारांनी घडलेली आहे. छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आगरकर, महर्षी कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील यांसारख्या महान व्यक्तींनी महाराष्ट्रात समता, शिक्षण आणि सामाजिक न्यायाची पायाभरणी केली. त्यांच्या विचारांमुळे महाराष्ट्राने देशाला प्रगत आणि पुरोगामी दिशा दिली. मात्र आज काही प्रतिगामी शक्ती महाराष्ट्राच्या या पुरोगामी ओळखीला धक्का पोहोचवण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप काँग्रेसने केला.

वारकरी संप्रदाय हा प्रेम, भक्ती, सहिष्णुता आणि मानवतेचा संदेश देणारा असून समाजात ऐक्य निर्माण करणारा आहे. परंतु शाईफेकसारख्या घटनांमुळे या परंपरेत हिंसक आणि कट्टरवादी प्रवृत्तींचा शिरकाव झाल्याचे दिसून येत असल्याची चिंता गोपाळ तिवारी यांनी व्यक्त केली. वारकरी संप्रदायाला अशा प्रवृत्तींपासून मुक्त करणे ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

काँग्रेसने राज्य सरकारवरही अप्रत्यक्ष टीका करताना म्हटले की, महाराष्ट्रातील सामाजिक सलोखा आणि सहिष्णुतेचे वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न सुरू आहे. संतांच्या विचारांवर चालणाऱ्या महाराष्ट्रात अशा प्रकारच्या घटना घडणे हे राज्याच्या प्रतिमेला धक्का देणारे आहे.

दरम्यान, या शाईफेक प्रकरणानंतर राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली असून विविध स्तरांतून या घटनेचा निषेध व्यक्त केला जात आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि संतपरंपरेचा आदर राखत समाजात शांतता व संवादाचे वातावरण टिकवणे आवश्यक असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले आहे.

## 'NCERT'च्या पुस्तकातून मराठ्यांचा नकाशा का वगळला?

पुणे (दै. संध्या)

'आपल्या कुटुंबातील मुली मुघलांच्या जनानखान्यात पुरवणाऱ्या जैसलमेरच्या कोपऱ्यातील एक संस्थानिक 'एनसीईआरटी'च्या पुस्तकातील मराठ्यांच्या देशव्यापी नकाशाला विरोध करतो. त्यांचे राज्यही केवळ पाच हजार रुपयांचे होते. त्याच्याकडे तिकडे वाळवंटात जाऊन मराठे काय चौथाई वसूल करणार होते? मात्र, या संस्थानिकाने दिलेल्या आव्हानामुळे मराठ्यांचा अधिकार असलेला देशव्यापी नकाशा 'एनसीईआरटी'च्या पाठ्यपुस्तकातून वगळला गेला, यासारखे दुर्दैव नाही,' अशी खंत भारत इतिहास संशोधक मंडळाचे सचिव पांडुरंग बलकवडे यांनी व्यक्त केली. 'आता 'एनसीईआरटी'च्या पाठ्यपुस्तकात मराठ्यांच्या इतिहासाला न्याय मिळावा म्हणून संघर्ष करण्याची वेळ आली आहे. सगळ्या राज्यकर्त्यांना आणि शिक्षण विभागाला पुराव्यांच्या आधारे मराठ्यांचा इतिहास सांगून न्याय मिळवावा लागेल. त्यासाठी सगळ्या इतिहास अभ्यासकांनी एकत्र येण्याची गरज आहे,' असेही त्यांनी सांगितले. इतिहासाच्या पाऊलखुणा, पाञ्चजन्य फाऊंडेशन आणि रावसाहेब चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने ज्येष्ठ इतिहास संशोधक पांडुरंग बलकवडे यांना 'शिवभूषण निनादराव बेडेकर स्मृती पुरस्कारा'ने गौरविण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते. प्राच्यविद्या पंडित अरविंद जामखेडकर यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. वासंती बेडेकर, कौस्तुभ कस्तुरे, समीर कुलकर्णी या वेळी उपस्थित होते. उत्तरार्धात अश्विन चितळे यांनी कवी भूषण यांच्या छंदांवर आधारित 'भूषण गाथा' या कार्यक्रमाचे सादरीकरण केले. बलकवडे म्हणाले,'अर्जुन सिंग यांच्या नेतृत्वात २००६ ते २००८ या काळात 'एनसीईआरटी'च्या अभ्यासक्रमाची नव्याने रचना करण्यात आली. इयत्ता चौथी ते बारावीपर्यंतच्या इतिहासात मराठ्यांच्या वाट्याला केवळ दोन पाने आली.

## "तुला पाहता" चित्रपटातून तरल प्रेमाची अनवट कहाणी उलगडणार

पुणे (दै. संध्या)

- मयुरा प्रधान दिग्दर्शित 'तुला पाहता' चित्रपटाचा रंजक टीजर लाँच
- एक नवा दृष्टिकोन घेऊन प्रेक्षकांसमोर येणारा 'तुला पाहता'
- 'तुला पाहता' १० जुलैपासून जगभरात मराठी आणि हिंदीमध्ये प्रदर्शित होणार



ऐन तारुण्यात, प्रेमात आकंठ बुडालेले असताना तो अचानक तिच्या आयुष्यातून निघून जातो आणि काही वर्षांनी तसाच अचानक परततो तो निवृत्त लष्करी अधिकारी म्हणून.. त्याच्या अचानक जाण्यानं आणि पुन्हा परतण्यानं तिच्या आयुष्यात काय खळबळ उडते त्याची तरल कहाणी तुला पाहता या चित्रपटातून उलगडणार आहे. १० जुलैला हा चित्रपट मराठीसह हिंदीतही प्रदर्शित होणार असून, या चित्रपटाचा टीजर लाँच करण्यात आला आहे. ब्रेव्ह व्हील प्रॉडक्शन्सच्या मयुरा प्रधान यांनी "तुला पाहता" या चित्रपटाची निर्मिती केली आहे. चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद आणि दिग्दर्शन ही मयुरा प्रधान यांचंच आहे. पुष्कर झोटिंग यांनी छायांकन, रोहन प्रधान, रोहन गोखले यांनी संगीत दिग्दर्शन, तर दीपाली विचारे यांनी नृत्य दिग्दर्शन केलं आहे. या चित्रपटात सुप्रसिद्ध ज्येष्ठ अभिनेते सतीश पुळेकर, अभिनेत्री इला भाटे,

निशिगंधा वाड, मानसी पाटील, नचिकेत लेले, आनंद काळे, दीपाली विचारे, पल्लवी अजय, स्वप्नील परजणे, आकाश शिंदे अशी उत्तम स्टारकास्ट आहे. नव्या-जुन्या पिढीच्या कलाकारांचा दर्जेदार अभिनय या चित्रपटातून पाहता येणार आहे.

कुटुंबांतील वेगवेगळ्या पिढ्यांची गोष्ट आता 'तुला पाहता' या चित्रपटातून उलगडणार आहे. एकत्र कुटुंब पद्धतीमध्ये जेव्हा तरुण एक जोडपं असतं तेव्हा काय काय घडतं याची रंजक गोष्ट "तुला पाहता" या चित्रपटातून उलगडणार आहे. एका तरल प्रेमकहाणीची झलक टीजरमधून दाखवण्यात आली आहे. पण या टीजरपलीकडेही या चित्रपटाच्या कथेत आणखी अनेक पदर आहेत. हे पदर ट्रेलरमधून आणखी काही प्रमाणात उलगडतील अशी अपेक्षा आहे. चित्रपटाचा पोत, छायांकन, पार्श्वसंगीतामुळे चित्रपटाचा गुणवत्तापूर्ण स्तर दिसून येतो.


चित्रपटाच्या पोस्टर, त्यातील कसदार अभिनेत्यांच्या फळी यामुळे 'तुला पाहता' हा चित्रपटाविषयीची उत्सुकता आता टीजरमुळे आणखी वाढली आहे. एक नवा दृष्टिकोन घेऊन प्रेक्षकांसमोर येणारा हा चित्रपट पाहण्यासाठी १० जुलैपर्यंत प्रतीक्षा करावी लागणार आहे.

## निरोगी आयुष्यासाठी आयुर्वेद दिशादर्शक : अविनाश धर्माधिकारी

पुणे (दै. संध्या)

'आधुनिक वैद्यकशास्त्रात आजार बरे करण्याचे उपचार असले तरी, आजारच होऊ नये आणि निरोगी कसे राहावे, हे आयुर्वेदाने सांगितले आहे. त्यामुळे निरोगी आयुष्यासाठी आयुर्वेद दिशादर्शक आहे,' असे मत चाणक्य मंडलचे संस्थापक आणि माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांनी रविवारी व्यक्त केले.

नावीन्य प्रकाशनाच्या वतीने वैद्य परीक्षित शेवडे आणि वैद्य स्वराली शेंड्येलिखित 'स्त्रियांचे आरोग्य आणि आयुर्वेद', 'निरोगी रहा' व 'बालकांचे आरोग्य आणि आयुर्वेद'



या पुस्तकांचे प्रकाशन धर्माधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले, त्या वेळी ते बोलत होते. प्रकाशक नितीन खैरे या वेळी उपस्थित होते.

ढासळत जाणारी कुटुंबव्यवस्था, विवाहसंस्था, बदलती जीवनशैली यावर भाष्य करून धर्माधिकारी म्हणाले, 'एकविसाव्या शतकातील माणसाच्या अनैसर्गिक आणि मुदतपूर्व मृत्यूला केवळ ताण हीच एक बाब ठरू शकते, असे भाकीत आपल्या पूर्वजांनी केले होते. हे आता खरे ठरत असेल, तर त्याच्या मुळाशी भोगवादी संस्कृती आहे. ती बळावत असून, त्यातून ताण निर्माण होत आहेत.

प्राचीन शास्त्रात मन हे सहावे इंद्रिय असल्याचे सांगितले. हे आता विज्ञानानेही मान्य केले आहे.' या तिन्ही पुस्तकांतून आपल्याला प्रत्यक्षात काय करता येऊ शकते आणि आयुर्वेदातील ज्ञान आपल्याला आचरणात कसे आणता येऊ शकते, या विषयी शेवडे यांनी आपल्या मनोगतात सांगितले. दिनचर्या आणि ऋतूचर्येविषयी मार्गदर्शन करण्यात आले असल्याचे शेंड्ये यांनी सांगितले.

## पुण्यात ओबीसी युवक मेळाव्यावरूनही काँग्रेसमध्ये रुसवेफुगवे?


पुणे (दै. संध्या)

लोकसभा, विधानसभा आणि महापालिका निवडणुकांमध्ये अपयश आल्यानंतर आता पुण्यातील काँग्रेसने तरुणांना पक्षाशी जोडण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. मात्र, पक्षाने घेतलेल्या ओबीसी युवक मेळाव्याला पक्षाच्या प्रमुख नेत्यांनीच पाठ फिरवली. या मेळाव्यात ओबीसींविषयी पक्षाची भूमिका मांडण्याऐवजी तरुणांनी राजकारणात येण्याचे सल्ले नेत्यांनी दिल्याने या मेळाव्याचे फलित काय? याबाबतही काँग्रेस पक्षांतर्गत चर्चा सुरू झाली आहे. काँग्रेसला मागील लोकसभा, विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये अपेक्षित यश मिळू शकले नाही. त्यामागे पक्षात तरुण पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची संख्या कमी असल्याचे पक्षवाढीला मर्यादा येत असल्याचे लक्षात आले. त्यामुळे तरुणांना पक्षात घेण्यासाठी आता प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत. त्यानुसार पुण्यात काँग्रेस भवन येथे ओबीसी युवकांचा मेळावा घेण्यात आला. मात्र, या मेळाव्याला पक्षाच्या शहरातील प्रमुख नेत्यांना आमंत्रण देण्यात आले नव्हते.

## वास न येणे, झोपेत बडबडणे, अक्षर लहान होणे, ही असू शकतात आजाराची लक्षणे

पुणे (दै. संध्या)

वास घेण्याची क्षमता कमी होणे, झोपेचे विकार जसे स्वप्नात बोलणे, हालचाली करणे, अक्षर लहान होत जाणे आणि हालचाली मंद होणे, ही पार्किन्ससनसारख्या गंभीर आजाराची लक्षणे असू शकतात, असा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे. पार्किन्सनमध्ये काही लक्षणे हात-पायाचा कंप सुरू होण्याच्या अनेक वर्षांपूर्वी दिसू शकतात, त्यामुळे त्यांची ओळख पटवणे कठीण जाते, याकडेही तज्ज्ञांनी लक्ष वेधले आहे. अनेक रुग्णांना पार्किन्सनचा आजार कंप दिसण्यापूर्वीच सुरू होतो हेच समजत नाही. हा विकार सुरुवातीच्या टप्प्यात ओळखण्यासाठी या 'नॉन-मोटर' म्हणजेच चेतासंस्थेशी निर्गाडत लक्षणांची माहिती असणे महत्त्वाचे आहे. याबाबत अपोलो हॉस्पिटलमधील सल्लागार न्यूरोलॉजिस्ट डॉ. सुयोग दोशी म्हणाले की, या आजारात मेंदूतील बदल हे दृश्य लक्षणे दिसण्याच्या कित्येक वर्षे आधी सुरू झालेले



असतात. हाता-पायाचा कंप हे केवळ एकच लक्षण अनेक रुग्णांमध्ये सुरुवातीला दिसून येत नाही. जेवणाचा वास नीट येईनासा होणे, वर्षानुवर्षे राहिलेली बद्धकोष्ठता किंवा झोपेत जोरात हातपाय हलवणे अशी लक्षणे दिसतात. हे बदल वाढत्या वयानुसार म्हणून सोडून दिले जातात. काही जणांमध्ये विनाकारण येणारी उदासीनता किंवा चिंता, हे देखील त्याच प्रक्रियेचा भाग असू शकते. चेहऱ्यावरचे भाव कमी होतात. लिहिताना अक्षरे हळूहळू लहान होत जातात. चालताना हात कमी हलतात. या गोष्टी इतक्या हळू येतात की घरचेही वर्षभर लक्षात घेत नाहीत. कंप नाही, म्हणजे पार्किन्सन नाही हे समीकरण चुकीचे आहे. वर सांगितलेले बदल सातत्याने जाणवत असतील तर न्यूरोलॉजिस्टकडे जाणे योग्य ठरते.

## पुणे, बंगळुरू, हैदराबादमध्ये 'वर्क फ्रॉम होम'?



पुणे (दै. संध्या)

पश्चिम आशियातील युद्धामुळे इंधन टंचाई निर्माण होऊन महागाईचा भडका उडाला आहे. यामुळे आगामी काळात पेट्रोल, डिझेलच्या किमतीत मोठी वाढ होऊन सर्वसामान्य नागरिकांसह नोकरदार वर्गाचे आर्थिक गणित बिघडणार आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन बचतीसाठी 'वर्क फ्रॉम होम' (घरुन काम) या पर्यायाचा स्वीकार करण्याचा सल्ला कंपन्यांना दिला आहे. यावरून आता माहिती तंत्रज्ञान (आयटी) क्षेत्रात नव्या चर्चांना उधाण आले आहे.

करोना संकटाच्या काळात देशातील बहुतांश आयटी कंपन्यांनी वर्क फ्रॉम होम पद्धती राबवली होती. त्या काळात कर्मचाऱ्यांची उत्पादकता टिकून राहिल्याचे अनेक कंपन्यांनी मान्य केले होते. मात्र, करोना संकटानंतर अनेक कंपन्यांनी कर्मचाऱ्यांना पुन्हा कार्यालयात हजर राहण्याचे आदेश दिले. आता इंधन दरवाढ, वाहतूक कोंडी आणि वाढता प्रवास खर्च यामुळे कर्मचारी पुन्हा वर्क फ्रॉम होमची मागणी करीत आहेत. पुणे, बंगळुरू, हैदराबाद आणि गुरुग्रामसारख्या आयटी हबमध्ये दररोज वाहतूक कोंडीत कर्मचाऱ्यांना तासनतास अडकून पडावे लागत असल्याचे चित्र सध्या आहे.

फोरम फॉर आयटी एम्प्लॉईज या संघटनेने या मुद्द्यावर सरकार आणि मोठ्या आयटी कंपन्यांना थेट प्रश्न विचारत, पंतप्रधानांचा सल्ला आयटी कंपन्या प्रत्यक्षात स्वीकारणार का? असा सवाल उपस्थित केला आहे. संघटनेने म्हटले आहे की, वर्क फ्रॉम होममुळे केवळ इंधन बचतच होत नाही तर प्रदूषणातही घट होते. याशिवाय कर्मचाऱ्यांचा वेळ वाचून मानसिक ताण कमी होण्यास मदत होते. सरकारने डिजिटल इंडिया आणि स्मार्ट वर्किंगचा पुरस्कार केला आहे. मग कंपन्यांनी कर्मचाऱ्यांना लवचिक काम पद्धती देण्यात काय अडचण आहे?

कंपन्यांच्या भूमिकेकडे लक्ष

काही आयटी कंपन्यांनी कर्मचाऱ्यांची कार्यालयीन उपस्थिती आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले आहे. टीम समन्वय, विदा सुरक्षा आणि कार्यालयीन संस्कृती यासाठी कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहणे गरजेचे असल्याचे कंपन्यांचे म्हणणे आहे. तरीही अनेक कंपन्या 'हायब्रिड मॉडेल'चा विचार करत असून आठवड्यातील काही दिवस घरातून काम करण्यास परवानगी देत आहेत. आगामी काळात संपूर्ण कालावधीसाठी वर्क फॉर्म होम पद्धतीचा स्वीकार कंपन्या करतात का, याकडे लक्ष लागले आहे.

### सोशल मीडियावरही चर्चा

दरम्यान, सोशल मीडियावरही हा मुद्दा मोठ्या प्रमाणावर चर्चेत आला आहे. अनेक कर्मचाऱ्यांनी #WorkFromHome आणि #FuelPrices या हॅशटॅगद्वारे आपली मते व्यक्त केली आहेत. वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर सरकार आणि आयटी कंपन्या यावर कोणता निर्णय घेतात, याकडे आता लाखो कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### ज्येष्ठ अभिनेत्री डेलनाझ इराणी यादें मालिकेत दिसणार खास भूमिकेत



मुंबई (दैनिक संध्या) : सोनी सबची यादें मालिका आपल्या भावनिक कथानक आणि व्यक्तिरेखांच्या स्तरित प्रवासामुळे प्रेक्षकांना खिळवून ठेवत आहे. या कथानकात आणखी एक रोचक वळण आणण्यासाठी ज्येष्ठ अभिनेत्री डेलनाझ इराणी मालिकेत खास भूमिका साकारण्यासाठी सज्ज आहेत. स्मरणीय अभिनय आणि रंगतदार स्क्रीन प्रेझेन्ससाठी ओळखल्या जाणाऱ्या डेलनाझ यांची 'चांदनी' ही भूमिका कथानकाला नवा रंग देणार आहे. एकेकाळी लाखो चाहत्यांची लाडकी असलेली चांदनी अजूनही प्रसिद्धी, ग्लॅमर आणि आदराच्या जगात जगत असते. मात्र तिच्या आयुष्यात अनपेक्षित वळण येतं जेव्हा ती रुग्ण म्हणून हॉस्पिटलमध्ये दाखल होते आणि तिला फक्त डॉ. देव यांनीच उपचार करावेत असा आग्रह धरते. तिला वाटतं की डॉ. देव अजूनही तोच उत्तम डॉक्टर आहे ज्याच्यावर ती पूर्ण विश्वास ठेवत होती. पण तिला हे माहीत नसतं की स्मृतीभ्रंशामुळे डॉ. देव आता पूर्वीसारखा डॉक्टर राहिलेला नाही. तिच्या आगमनामुळे भावनिक संघर्ष, दडलेले सत्य आणि डॉ. देवसाठी कठीण परिस्थिती निर्माण होते. आपल्या भूमिकेबद्दल बोलताना डेलनाझ इराणी म्हणाल्या, "चांदनीबद्दल मला सर्वात जास्त आवडतं ते म्हणजे ती एकाच वेळी नाट्यमय, ग्लॅमरस, भावूक आणि नाजूक आहे. ती अजूनही स्वतःला सुपरस्टार मानते जिच्यावर सगळे वेडे आहेत, आणि त्यामुळे ती एकीकडे मनोरंजक तर दुसरीकडे हृदयद्रावक वाटते. इक्बाल खानसोबत काम करणं माझ्यासाठी खूप खास आहे. तो असा अभिनेता आहे जो अत्यंत सहजतेने आणि प्रामाणिकपणे अभिनय करतो. प्रत्येक सीनमध्ये तो इतकी प्रामाणिकता आणतो की त्याच्यासोबत काम करणं खूप आनंददायी असतं. मालिकेत आमचे काही तीव्र सीन आहेत, पण कॅमेऱ्याच्या मागे आम्ही खूप हसतो. अशा मालिकेचा भाग होणं खूप छान वाटतं आणि मला खात्री आहे की प्रेक्षकांना डॉ. देव आणि चांदनी यांच्यातील नातं खूप आवडेल." सोनी सबवरील 'यादें' पाहायला विसरू नका, सोमवार ते शनिवार रात्री 8:00 वाजता, फक्त सोनी सबवर.

### महापौर मंजुषा नागपुरे यांच्या अध्यक्षतेखाली प्रशासकीय आढावा बैठक संपन्न

पुणे (दैनिक संध्या) : आज मा. महापौर मंजुषाताई नागपुरे मॅडम यांच्या अध्यक्षतेखाली अतिरिक्त महापालिका आयुक्त (ई) तसेच संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत महानगरपालिकेची महत्त्वपूर्ण प्रशासकीय आढावा बैठक पार पडली. या बैठकीत विविध विभागांच्या कामकाजाचा सखोल आढावा घेऊन आगामी विकासकामांबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या कामकाजाचा आढावा घेताना कचरा संकलनासाठी लागणाऱ्या वाहनांची संख्या, चालकांची उपलब्धता तसेच ओला व सुका कचरा व्यवस्थापन (RDM) अधिक कार्यक्षम करण्यावर भर देण्यात आला. महसूल वाढीसाठी विविध उपाययोजनांचा आढावा घेऊन प्रभावी बजेट नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले. शहरातील पार्किंग व्यवस्थापनाबाबत सविस्तर चर्चा करून ऑनलाइन प्रणालीद्वारे नियंत्रण वाढविण्यावर भर देण्यात आला. मल्टी-लेव्हल पार्किंग प्रकल्प राबवून नागरिकांना अधिक सोयीस्कर पार्किंग सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले. पायाभूत सुविधांच्या दृष्टीने जुन्या इमारतींचा पुनर्विकास तसेच नवीन इमारती उभारण्याबाबत चर्चा झाली. विविध प्रकल्पांच्या खर्च व व्यवहार्यता तपासून नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले. शहरातील रस्ते व कॉँक्रीट पायाभूत सुविधा अधिक मजबूत करण्यावरही भर देण्यात आला. आरोग्य क्षेत्रात मेडिकल कॉलेजमधील सुविधांचे उन्नतीकरण, आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करणे तसेच पीपीपी (PPP) मॉडेलवर हॉस्पिटल प्रकल्प राबविण्याबाबत चर्चा करण्यात आली. नागरिकांना अधिक चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी PET Scan सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश करण्यावर भर देण्यात आला. तसेच पीएमसी कॉलनी विकास (राजेवाडी, भवानी पेठ परिसर), बस थांबे आधुनिकीकरण तसेच विविध नागरी सुविधा विकसित करण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. ग. दि. माडगूळकर सभागृह, भिडे वाडा, बाळासाहेब ठाकरे बाल नाट्यगृह तसेच सिंहगड रोडवरील छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृह येथे ऑडिओ-व्हिडिओ सुविधा उभारण्यास प्राधान्य देण्यात आले. या बैठकीत झोपडपट्टी निर्मूलन, वाहतूक सुधारणा तसेच विविध विभागांमध्ये समन्वय वाढविण्याबाबत महत्त्वपूर्ण सूचना देण्यात आल्या. महापौर मॅडम यांनी सर्व विभागांना नागरिकाभिमुख, पारदर्शक व वेळेत कामे पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश दिले असून, शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशासनाने अधिक प्रभावीपणे कार्य करावे, असे आवाहन केले.

### स्पार्क्सने 'समर स्वॅग' कॅम्पेनअंतर्गत अनोख्या शू-स्टाईल सँडल्स लॉन्च केल्या




मुंबई (दैनिक संध्या) : युवा वर्गामध्ये भारतातील सर्वात लोकप्रिय अॅथलेजर फुटवेअर ब्रँडपैकी एक असलेल्या स्पार्क्सने आपले स्प्रिंग-समर कलेक्शन सादर केले आहे. या नवीन कलेक्शनमध्ये स्टाईल आणि आकर्षक अॅटिट्यूडवर विशेष भर देण्यात आला असून, 'समर स्वॅग' कॅम्पेन अंतर्गत सादर करण्यात आलेल्या शू-स्टाइल सँडल्सना विशेष प्राधान्य देण्यात आले आहे. आजच्या वेगवान जीवनशैलीला लक्षात घेऊन डिझाइन करण्यात आलेल्या या शू-स्टाइल सँडल्समधून युवा ग्राहकांच्या फुटवेअर निवडीतील बदल स्पष्टपणे दिसून येतो. आजचे ग्राहक केवळ उपयोगिताच नव्हे, तर स्वतःची स्टाईल आणि व्यक्तिमत्त्व व्यक्त करणारे पर्याय शोधत आहेत. 'समर स्वॅग' कॅम्पेन द्वारे स्पार्क्स आत्मविश्वासपूर्ण, सहज आणि ट्रेंडी स्टाईल सादर करते जी ग्राहकांना स्वतःचा वेगळा लूक सहजपणे साकार करण्यासाठी प्रेरित करते. या शू-स्टाइल सँडल्सच्या डिझाइनमध्ये लवचिकतेला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. त्यांची रचना पायांची नैसर्गिक हालचाल सहज शक्य होईल अशा प्रकारे करण्यात आली असून, चालणे, हलके ट्रेकिंग तसेच दैनंदिन प्रवासासाठी त्या उपयुक्त ठरतात. यासोबतच, मजबूत सोल अधिक टिकाऊपणा आणि उत्कृष्ट ग्रिप प्रदान करत असल्याने विविध पृष्ठभागांवर स्थिरता आणि सुरक्षितता मिळते. उष्ण हवामानाचा विचार करून या सँडल्समध्ये ब्रीदेबिलिटीवर (हवा खेळती राहण्याची सोय) ही भर देण्यात आला आहे. ओपन-स्ट्रक्चर डिझाइनमुळे योग्य प्रमाणात हवा खेळती राहते, ज्यामुळे दीर्घकाळ वापरादरम्यानही आरामदायी अनुभव मिळतो. तसेच, संपूर्ण डिझाइन हलके ठेवण्यात आल्याने दिवसभर वापरताना पायांवर अतिरिक्त ताण जाणवत नाही.

# दहावीनंतरचा डिप्लोमा अभ्यासक्रम रोजगार मिळवून देणारा उत्तम पर्याय

कुरण (दै. संध्या) :



■ डॉ. पोखरकर स्वप्नील रघुनाथ ■
प्राचार्य, जे.सी.ई.आय., जयहिंद पॉलिटेक्निक, कुरण

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली, तंत्र शिक्षण संचालनालय मुंबई तसेच महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त तंत्रनिकेतन संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना दहावीनंतर पदविका (डिप्लोमा) अभ्यासक्रमांच्या विविध शाखांमध्ये प्रवेश घेण्याची संधी उपलब्ध आहे. तंत्रनिकेतनमध्ये मेकॅनिकल, सिव्हील, कॉम्प्युटर, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रिकल, मेकॅट्रॉनिक्स तसेच आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित विविध शाखा कार्यरत आहेत. या सर्व शाखांचा अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळामार्फत राबविला जातो.

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी "के स्कीम" हा नवा अभ्यासक्रम लागू केला आहे. हा अभ्यासक्रम उद्योगाभिमुख, कौशल्याधारित आणि आऊटकम बेस शिक्षण प्रणालीवर आधारित असून विद्यार्थ्यांना उत्कृष्ट शिक्षणाची हमी देणारा ठरत आहे. "के" योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांमध्ये रोजगारासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करण्यावर विशेष भर दिला जातो. नवीन तंत्रज्ञानाशी विद्यार्थ्यांना परिचित करून देण्यासाठी अद्ययावत अभ्यासक्रमाचा समावेश करण्यात आला आहे.

विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव मिळावा यासाठी चौथ्या सत्रानंतर १२ आठवड्यांचे औद्योगिक प्रशिक्षण (इनप्लांट ट्रेनिंग) अनिवार्य करण्यात आले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची उद्योगजगताशी ओळख होऊन त्यांच्या तांत्रिक कौशल्यांमध्ये वाढ होते. प्रत्येक शाखेनुसार तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार विविध वैकल्पिक विषय निवडण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना आपल्या करिअरच्या दृष्टीने आवश्यक असलेले विशेष ज्ञान आत्मसात करता येते.

"के" स्कीममध्ये प्रात्यक्षिके, मिनी प्रोजेक्ट, निरंतर मूल्यमापन, औद्योगिक भेटी, पेपर सादरीकरण स्पर्धा, प्रकल्प प्रदर्शन, प्रश्नमंजुषा स्पर्धा आणि व्यक्तिमत्त्व विकास उपक्रमांवर विशेष भर देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना विषयांचे आकलन सुलभ व्हावे यासाठी अभ्यासक्रमामध्ये द्विभाषिकतेचा पर्याय उपलब्ध करण्यात आला असून विद्यार्थी इंग्रजीसोबत मराठी भाषेतूनही परीक्षा देऊ शकतात.

एमएसबीटीई मार्फत दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी "स्कूल कनेक्ट" हा उपक्रम राबविण्यात येतो. या उपक्रमांतर्गत तंत्रनिकेतनमधील अधिव्याख्याते शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना पदविका अभ्यासक्रमाबाबत मार्गदर्शन, प्रचार व प्रसार करतात. तसेच नॉन-कॅप कोट्यामधून किंवा संस्थास्तरावर प्रवेशित झालेल्या व ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देखील दिली जाते.

पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मार्फत ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येते. प्रवेशासाठी दहावी परीक्षेत किमान ३५ टक्के गुणांसह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. तसेच बारावी विज्ञान शाखेत गणित विषयासह उत्तीर्ण विद्यार्थी किंवा दोन वर्षांचा आयटीआय अभ्यासक्रम पूर्ण केलेले विद्यार्थी थेट द्वितीय वर्ष पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ शकतात.

विद्यार्थ्यांसाठी शासनामार्फत विविध शिष्यवृत्ती योजना व आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांसाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना राबवली जाते. अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्ग, विमुक्त जाती-जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार शिष्यवृत्ती योजना लागू आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांसाठी डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना तसेच अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी अल्पसंख्याक शिष्यवृत्ती योजना राबवली जाते. कॅप प्रक्रियेद्वारे प्रवेशित महाराष्ट्र राज्यातील वार्षिक उत्पन्न रु. ८ लाखांपर्यंत असलेल्या विद्यार्थिनींना १०० टक्के शिक्षण शुल्क माफीचा लाभ दिला जात आहे.

तज्ज्ञांच्या मते, पॉलीटेक्निक शिक्षण हे अल्पावधीत रोजगारक्षम बनविणारे प्रभावी माध्यम ठरत आहे. आधुनिक प्रयोगशाळा, प्रशिक्षित प्राध्यापक, उद्योग क्षेत्राशी असलेले सहकार्य आणि कौशल्याधारित शिक्षण यामुळे विद्यार्थ्यांना रोजगार तसेच उच्च शिक्षणाच्या मोठ्या संधी उपलब्ध होत आहेत.

## 'हायब इंडिया' निवड चाचणी १७ मे रोजी

पुणे (दै. संध्या) :

भारतातील आणि परदेशात राहणाऱ्या भारतीय तरुण संगीत प्रतिभेच्या शोधासाठी 'हायब इंडिया'तर्फे पुण्यात विशेष निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. १७ मे २०२६ रोजी पुणे नगर रस्ता परिसरातील नोवोटेल येथे सकाळी नऊ वाजल्यापासून प्रत्यक्ष निवड चाचण्या होणार आहेत. सहभागी होऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी आगाऊ नोंदणी करणे आवश्यक असून, निवड झालेल्या उमेदवारांना जागतिक दर्जाचे प्रशिक्षण आणि संगीत निर्मिती क्षेत्रात काम करण्याची संधी मिळणार आहे. या माध्यमातून भारतीय कलाकारांना आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. प्रत्यक्ष उपस्थित राहणे शक्य नसलेल्या इच्छुकांसाठी ३१ मार्च ते ३१ जुलैदरम्यान ऑनलाईन निवड चाचण्याही सुरू ठेवण्यात आल्या आहेत. पात्रता, नियम आणि सहभागासंबंधीची माहिती 'हायब इंडिया'च्या अधिकृत संकेतस्थळावर आणि समाजमाध्यमांवर उपलब्ध करण्यात आली आहे. या निवड चाचण्यांच्या पार्श्वभूमीवर १६ मे रोजी सायंकाळी चार वाजल्यापासून फिनिक्स मार्केटसिटी येथील लिबर्टी स्क्वेअरमध्ये विशेष खुल्या चाहतावर्ग अनुभव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. संगीत, नृत्य आणि विविध संवादात्मक उपक्रमांच्या माध्यमातून तरुणांना वेगळा अनुभव देण्याचा प्रयत्न या उपक्रमातून केला जाणार आहे. यात संगीतावर आधारित नृत्य सत्रे, चाहतावर्ग संवाद विभाग, विविध भेटवस्तू आणि आकर्षक अनुभव विभाग उभारण्यात येणार आहेत.

## शाळांमधील पीएफ चोरीविरोधात १ जूनपासून राज्यस्तरीय एल्गार

भिवंडी (दै. संध्या) :



मुंबई आणि उपनगरातील सुमारे ३५० हून अधिक स्वयं-अर्थसहाय्यित (Self-Finance) शाळांमधील हजारो शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीवर (PF) डल्ला मारणाऱ्या व्यवस्थापनांविरुद्ध आता राज्यस्तरीय आंदोलन छेडण्यात येणार आहे. मुंबई शहर शिक्षक विकास मंडळ (रजि.) आणि शिक्षक नेते डॉ. विशाल कडणे यांच्या नेतृत्वाखाली येत्या १ जून २०२६ पासून हे तीव्र आंदोलन सुरू होत आहे.महत्त्वाची आकडेवारी आणि कायदेशीर वास्तव : कर्मचारी संख्या: मुंबई विभागातील साधारणपणे ३५० ते ४०० शाळा अशा आहेत, जिथे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संख्या २० ते ७५ च्या दरम्यान आहे.बाधित कर्मचारी: एका अंदाजानुसार, मुंबईतील सुमारे १५,००० ते २०,००० शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आजही पीएफच्या लाभापासून वंचित आहेत. कायदेशीर तरतूद: 'कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायदा १९५२' नुसार, २० पेक्षा जास्त कर्मचारी असलेल्या कोणत्याही संस्थेने कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेकडे (EPFO) नोंदणी करणे आणि १२% हिस्सा जमा करणे कायदेशीररित्या अनिवार्य आहे. या कपातीमुळे कर्मचाऱ्यांना केवळ बचतच नाही, तर EDLI (विमा योजना) अंतर्गत ७ लाख रुपयांपर्यंतचे संरक्षण आणि पेन्शन देखील मिळते.

**डॉ. विशाल कडणे यांचा आक्रमक पवित्रा**

**आर्थिक नुकसानीचा तक्ता (संभाव्य)**
तपशीलअंदाजित रक्कम (प्रति महिना)
कर्मचाऱ्याचा हिस्सा (१२%)₹ १,८०० - ₹ ३,६००
व्यवस्थापनाचा हिस्सा (१२%)₹ १,८०० - ₹ ३,६००
एकूण मासिक बचत₹ ३,६०० - ₹ ७,२००

**अनेक शाळांमधील कर्मचाऱ्यांनी डॉ. विशाल कडणे यांची भेट घेऊन गाऱ्हाणे*मांडल्यानंतर त्यांनी या लढ्याचे नेतृत्व स्वीकारले आहे."पीएफ*ही शिक्षकांच्या हक्काचीपुंजी आहे. २० पेक्षा जास्त कर्मचारी असूनही जे व्यवस्थापन पीएफ देत नाही, त्यांच्यावर गुन्हे दाखल*करण्यासाठी आम्ही सरकारकडे पाठपुरावा करू. १ जूनपासून होणारे आंदोलन हे निर्णायक असेल." - डॉ. विशाल कडणे (मुंबई*शिक्षक नेते)**

व्यवस्थापन हा हिस्सा वाचवून कर्मचाऱ्यांच्या भविष्याशी खेळत आहे. कर्मचाऱ्यांना आवाहन - ज्या शाळांमध्ये कर्मचारी संख्या २० च्या वर असूनही पीएफ कपात केली जात नाही, अशा शाळांमधील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी न घाबरता पुढे यावे. ही माहिती गोपनीय ठेवून आपल्या हक्कासाठी लढा दिला जाईल, असे आवाहन भगवान सागर आणि मुंबई शहर शिक्षक विकास मंडळाच्या कार्यकारणीने केले आहे.एकजूट दाखवा, सुरक्षित भविष्य मिळवा !

# शॉपर्स स्टॉपकडून हाइब इंडियासोबत 'गेट स्पॉटलाइट रेडी 'चे आयोजन

**भारताच्या पहिल्या ग्लोबल गर्ल ग्रुप ऑडिशनला प्रोत्साहन**

पुणे (दै. संध्या) :




शॉपर्स स्टॉप या भारतातील आघाडीच्या प्रीमियम फॅशन, सौंदर्य आणि भेटवस्तूंच्या मॉलने हायबी इंडियासोबत भागीदारी करून पुण्यातील फिनिक्स मॉल ऑफ मिलेनियममध्ये 'गेट स्पॉटलाइट रेडी' हा ऑडिशनवर आधारित आकर्षक इन-स्टोअर अनुभव सुरू केला आहे. ही भागीदारी भारतातील पुढच्या पिढीतील कलाकारांना देशातील पहिल्या जागतिक गर्ल ग्रुप ऑडिशन्ससाठी प्रोत्साहन देण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. त्यातून तरुण भारतीय प्रतिभेला एक जागतिक व्यासपीठ उपलब्ध होईल.

नवीन पिढीसाठी तयार केलेली ही मोहीम एक शक्तिशाली सांस्कृतिक बदल दर्शवते. त्यात जेन झी आणि जेन अल्फा आता केवळ प्रेक्षक नाहीत, तर जगावर वर्चस्व गाजवण्यासाठी सज्ज असलेले महत्त्वाकांक्षी आहेत. ७ मे ते १५ मे पर्यंत चालणाऱ्या या उपक्रमात सौंदर्य, स्टाईल आणि जागतिक पॉप संस्कृती यांचा संगम असेल, जो ग्राहकांना निवडक उपक्रमांद्वारे स्पॉटलाइटसाठी तयार होण्याची संधी देईल.

हा अनुभव हायबी इंडियाच्या जागतिक गर्ल ग्रुप ऑडिशन्सबद्दल वाढत्या उत्साहाला पूरक आहे. ३१ मार्च ते ३१ जुलै या कालावधीत ऑनलाइन चालणाऱ्या या ऑडिशन्स भारतातील उदयोन्मुख तरुण, महत्त्वाकांक्षी प्रतिभावंतांना आकर्षित करतात. याला १७ मे रोजी होणाऱ्या प्रत्यक्ष ऑडिशन्स आणि १६ मे रोजी पुण्यात होणाऱ्या 'हायबी इंडिया पॉप-अप पार्क'मधील कार्यक्रमांमुळे अधिक चालना मिळेल. तसेच संवादात्मक अनुभव आणि कंपनीच्या जागतिक दर्जाच्या प्रशिक्षण व निर्मिती प्रणालीमध्ये प्रवेश करण्याची संधी मिळेल.

"शॉपर्स स्टॉपने हायबी इंडियाच्या भागीदारीत 'गेट स्पॉटलाइट रेडी' या आपल्या देशव्यापी मोहिमेची घोषणा केली आहे," असे शॉपर्स स्टॉपचे ग्राहक सेवा सहयोगी व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी कविंद्र मिश्रा म्हणाले. "अनेक दशकांपासून शॉपर्स स्टॉपने जागतिक स्तरावरील आघाडीच्या ब्रँड्सना भारतीय ग्राहकांच्या जवळ आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. 'गेट स्पॉटलाइट रेडी'च्या माध्यमातून हा ब्रँड आपला प्रवास पुढे नेत असून भारतीय प्रतिभेला जागतिक व्यासपीठावर चमकण्याची संधी मिळेल.

## दम्यावर फक्त रिलीफ नाही, नियमित कंट्रोल थेरपीच गरजेची" — डॉ. मनोज पवार

पुणे (दै. संध्या) :

जागतिक दमा दिन 2026 निमित्त, भारतातील दम्याच्या उपचारांमध्ये वाढत चाललेल्या तफावतीकडे तज्ज्ञांनी लक्ष वेधले आहे. जीना (ग्लोबल इनिशिएटिव्ह फॉर अस्थमा) यंदा दाहशामक इनहेल्ड औषधांच्या उपलब्धतेच्या गरजेवर भर देत असताना, सिप्लाचे 'बेरोक जिंदगी' आणि 'टफीज' यांसारखे उपक्रम जागरूकता वाढवण्यासाठी आणि रुग्णांना वेळेवर योग्य उपचार घेण्यास प्रोत्साहित करण्यासाठी पुढाकार घेत आहेत. प्रभावी आणि परवडणारे उपचार उपलब्ध असूनही विलंबित निदान, उपलब्धतेतील असमानता आणि इनहेलरबाबतचे गैरसमज यांमुळे उपचारांचा पुरेसा वापर होत नसल्याचे समोर आले आहे.

इंटरव्हेंशनल पल्मोनोलॉजिस्ट डॉ. मनोज पवार म्हणाले, "प्रत्यक्षात अनेक रुग्ण दम्याची लक्षणे वाढल्यानंतरच इनहेलर वापरतात. त्वरित आराम देणाऱ्या इनहेलर्सचा वाढता वापर आणि इनहेलरबाबतचे गैरसमज यामुळे नियंत्रक उपचारांकडे दुर्लक्ष होत आहे. विशेषतः पालक आणि किशोरवयीन मुलांमध्ये इनहेलरविषयी असलेली भीती उपचारांच्या नियमिततेवर परिणाम करते."

त्यांच्या मते, दम्याचे व्यवस्थापन हे केवळ लक्षणांवर उपचार करण्यापुरते मर्यादित नसून, श्वसनमार्गातील दाह नियंत्रित ठेवणे तितकेच महत्त्वाचे आहे. ग्लोबल इनिशिएटिव्ह फॉर अस्थमा (GINA) च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, एकत्रित दाह-विरोधी इनहेलर्सचा वापर हा अधिक प्रभावी पर्याय ठरतो. "एकाच इनहेलरमधून आराम आणि नियंत्रण दोन्ही मिळत असल्याने उपचार सोपे होतात आणि रुग्ण उपचार अधिक नियमितपणे घेतात," असे त्यांनी स्पष्ट केले.

अभ्यासांनुसार, भारतात डॉक्टरांनी सुचवलेल्या इनहेलरचा अनियमित वापर करण्याचे प्रमाण 75 टक्क्यांपर्यंत आहे. त्यामुळे जनजागृती वाढवणे, इनहेलरविषयीचे गैरसमज दूर करणे आणि नियंत्रक औषधांच्या नियमित वापराला प्रोत्साहन देणे गरजेचे असल्याचे डॉ. पवार यांनी सांगितले.

## R.T.O. जाहीर नोटीस

श्रीमती. तृप्ती ईश्वर हांडे रा. उंब्रज नं.2, ता. जुन्नर, जि पुणे यांचे पती कै. ईश्वर दिलीप हांडे हे दिनांक 06/02/2026 रोजी मयत झाले असून, त्यांचे नावाने MH14GR9417 हे वाहन असून, सदर वाहन त्यांचे मृत्यू पश्चात त्यांची वारस पत्नी म्हणून, श्रीमती. तृप्ती ईश्वर हांडे यांचे नावाने करावयाचे आहे. याबाबत कुणाचीही काही हरकत असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ८ दिवसांचे आत, आमचे खाली नमुद पत्यावर तसे लेखी कळवावे, अन्यथा कुणाचीही काही हरकत नाही, असे समजून सदर वाहन वारस पत्नी श्रीमती. तृप्ती ईश्वर हांडे यांचे नावाने केले जाईल. त्याविषयी, कुणाचीही तक्रार फसवणूक होऊ नये. म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिद्ध केली असे.

कळावे,

श्रीमती. तृप्ती ईश्वर हांडे
रा. उंब्रज नं.2,
ता. जुन्नर, जि. पुणे

पुणे, जुन्नर,
दिनांक :- ११/०५/२०२६

# कॅनन इंडियाकडून आपल्या व्यवसायाचा विस्तार

नवी दिल्ली (दै. संध्या) :

Canon
Delighting You Always

कॅनन इंडिया या डिजिटल इमेजिंग सोल्यूशन्स क्षेत्रातील आघाडीच्या कंपनीने आज इमेजफोर्स सी3150 च्या लाँचची घोषणा केली. हे एक उच्च कार्यक्षमता असलेले ए3 कलर मल्टिफंक्शन डिवाईस आहे, जे विशेषतः मोठे उद्योग, एसएमई, सरकारी संस्था आणि कॉपी शॉप मालकांसाठी डिझाइन करण्यात आले आहे. प्रति मिनिट 50 पानांपर्यंत हाय-स्पीड कलर आउटपुट देणारे इमेजफोर्स सी3150 उच्च-गुणवत्तेची प्रिंटिंग आणि मीडिया स्थिरता प्रदान करते, जे मोठ्या प्रमाणात प्रिंटिंग आवश्यक असलेल्या कामांसाठी अत्यंत उपयुक्त आहे. या लाँचच्या माध्यमातून, कॅननचा प्रमुख क्षेत्रांमध्ये आपला विस्तार करण्याचा, मार्केट शेअर वाढवण्याचा आणि सलग 10 वर्षांपासून लेझर कॉपियर बाजारपेठेमधील आपले नंबर 1 स्थान अधिक दृढ करण्याचा मनसुबा आहे. आपला डॉक्युमेंट डिजिटायझेशन पोर्टफोलिओ अधिक दृढ करण्यासाठी, कॅनन इंडियाने इमेजफॉर्म्युला डीआर-सी340 आणि डीआर-सी350 हे अल्ट्रा-कॉम्पॅक्ट हाय-स्पीड डॉक्युमेंट स्कॅनर्स देखील लाँच केले आहेत. वेगवान, अचूक आणि विश्वसनीय स्कॅनिंगसाठी डिझाइन केलेले हे स्कॅनर्स मोठे उद्योग, एसएमई आणि सरकारी संस्थांना मोठ्या प्रमाणात कागदपत्रांचे कार्यक्षमतेने डिजिटायझेशन करण्यास आणि माहितीचा ओघ सुलभ करण्यास मदत करतात.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
कार्यकारी अभियंता,
प्रशासन संगणकीकरण विभाग, कोथरूड, जि. पुणे, यांचे कार्यालय
ई-मेल - eeacd.punewrd@maharashtra.gov.in दूरध्वनी क्र. ०२०-२५४४०३८३,०२०-२५४४०३८२

**ई निविदा सूचना क्र./०१/२०२६-२७**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, प्रशासन संगणकीकरण विभाग, पुणे जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरिता ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवीत आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, प्रशासन संगणकीकरण विभाग, पुणे यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| | |
|---|---|
| कामाचे नाव : | "Design, Development and Implementation of Web and Mobile application for Project Progress Monitoring System (PPMS) for all IDCs" |
| जिल्हा : | पुणे |
| ई-निविदा उपलब्ध कालावधी दिनांक : | १२/०५/२०२६ ते दिनांक ०१/०६/२०२६ |
| ई-निविदा उघडण्याचा दिनांक : | ०२/०६/२०२६ |
| काम पूर्ण करण्याचा कालावधी : | ७२ महिने |

जा.क्र. प्रसंवि/५३५/२०२६
कार्यकारी अभियंता, प्रशासन संगणकीकरण विभाग,
जलसंपत्ती भवन, कोथरूड, पुणे
दि. ०८/०५/२०२६

सही/-
कार्यकारी अभियंता
प्रशासन संगणकीकरण विभाग,
जलसंपत्ती भवन, कोथरूड,
पुणे-४११०३८

क्रमांक : आरओसी-2026-27/क्र-5/C७०१

## थोडक्यात पण महत्वाचे...



### तरुणावर पिस्तूल रोखून जिवे मारण्याची धमकी; सांगवी पोलिसात गुन्हा दाखल

पिंपरी (दैनिक संध्या) : मित्रांसोबत गप्पा मारत बसलेल्या एका तरुणाला जुन्या ओळखीच्या चौघांनी गाठून पिस्तुल रोखत जिवे मारण्याची धमकी दिली. ही घटना शुक्रवारी (दि. ८) रात्री नऊच्या सुमारास जुनी सांगवी येथील दत्त आश्रम रोडवरील नवीन पुलाजवळ घडली. याप्रकरणी अनिकेत देवेंद्र गायकवाड (२४, रा. जयमाला नगर, जुनी सांगवी) यांनी सांगवी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार दोन विधीसंघर्षित बालकांसह अन्य दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी अनिकेत गायकवाड हे त्यांचे मित्र दत्ता लांडगे आणि पवन अवचरे यांच्यासह नवीन पुलाजवळ गप्पा मारत बसले होते. त्यावेळी पांढऱ्या रंगाच्या ॲक्टिव्हावरून चार आरोपी तेथे आले. त्यातील एका आरोपीने कमरेला लावलेले पिस्तुल काढून फिर्यादीच्या दिशेने रोखले. "तुला लय माज आहे का, तू अमोल भोसलेसोबत का फिरतोस, आज तुला खल्लासच करतो," अशी धमकी देत आरोपींनी शिवीगाळ केली. सांगवी पोलिसात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक भालेराव करीत आहेत.



### पिंपरी-चिंचवडमध्ये नाले तुंबले; पावसाळ्यात पूराचा धोका वाढला

पिंपरी (दैनिक संध्या) : पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना पिंपरी-चिंचवड शहरातील प्रमुख नाले आणि उपनाले मोठ्या प्रमाणात तुंबलेल्या अवस्थेत असल्याचे वास्तव समोर आले आहे. साचलेला गाळ, टाकण्यात येणारा कचरा, राडारोडा, अन झुडपे यामुळे अनेक नाल्यांच्या प्रवाहात अडथळा आला आहे. पावसाळ्यापूर्वी नाले सफाईचे काम पूर्ण न झाल्यास शहरातील अनेक भागात पूरस्थितीचा धोका उद्भवू शकतो. एका बाजूला स्मार्ट सिटीचे स्वप्न दाखवले जात असताना दुसऱ्या बाजूला शहरातील नालेच गुदमरल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. शहरातील अनेक मुख्य नाले आणि उपनाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचल्याने प्रवाह विस्कळीत झाला आहे. अनेक ठिकाणी नाल्यांमध्ये झुडपे वाढलेली असून काही भागांत राडारोडा आणि चिखल दिवसेंदिवस नाल्यांच्या कडेलाच पडून असल्याचे दिसत आहे. त्यामुळे मुसळधार पावसात हा गाळ पुन्हा नाल्यात वाहून जाऊन परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे. उपनगरे व एमआयडीसी परिसरासह अनेक भागांतील प्रमुख नाले ,स्ट्रॉम वॉटर निचरा होण्यासाठीचे छोटे नाले पूर्ण क्षमतेने वाहू शकतील अशी स्थिती नसल्याने पावसाचे पाणी थेट रस्ते, सोसायट्या आणि व्यापारी आस्थापनांमध्ये शिरण्याची भीती व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे शहरातील अनेक नाला परिसरामध्ये उद्याने असल्याने त्या ठिकाणी सुरक्षेच्या उपाययोजना अत्यंत अपुऱ्या असल्याचे चित्र आहे. काही ठिकाणी वळणाच्या ठिकाणी नाल्यांचे कठडे तुटलेल्या अवस्थेत असून त्यांची दुरुस्ती अद्याप करण्यात आलेली नाही. त्यामुळे वहानचालक,शतपावलीसाठी येणारे ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांसाठी हे नाले धोकादायक ठरत आहेत; तसेच काही नाल्यांलगतच विद्युत खांब उभे करण्यात आलेले आहेत. मुसळधार पावसात नाले तुडुंब भरल्यास पाणी विद्युत यंत्रणेला स्पर्श करून विजेचा प्रवाह उतरण्याची शक्यता निर्माण होऊ शकते. त्यामुळे पाण्यातून मार्ग काढणाऱ्या नागरिकांच्या जीवितालाच धोका निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे.

### इंद्रायणी नदी प्रदूषणाच्या विळख्यात

देहूगाव (दैनिक संध्या) : तीर्थक्षेत्र देहूगावातील पवित्र इंद्रायणी नदी सध्या प्रदूषणाच्या विळख्यात सापडली असून, शहरातील सोसायट्या व परिसरातील गटारांचे मैला मिश्रित सांडपाणी थेट नदीपात्रात सोडले जात असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या दूषित पाण्यामुळे वारकरी भाविकांच्या आरोग्यावर मोठा धोका निर्माण झाला आहे. काळोखेमळा परिसरातून येणाऱ्या ओढ्यात माळीनगरमधील सांडपाणी कोणतीही प्रक्रिया न करता सोडले जात आहे. हेच दूषित पाणी पुढे इंद्रायणी नदीत मिसळत आहे. तसेच पाण्याच्या टाकी परिसरातून, सिद्धेश्वर मंदिराजवळील भागातून आणि पोलीस चौकीमागील गटारांमधूनही मोठ्या प्रमाणात सांडपाणी थेट नदीत सोडले जात असल्याचे निदर्शनास आले आहे. काही ठिकाणी एसटीपी (सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प) साठी बांधलेले चेंबर फुटल्याने घाणपाणी थेट नदीत मिसळत असून, परिसरात तीव दुर्गंधी पसरली आहे. या ओढ्या, नाल्याजवळ गेल्यास घाण पाण्यामुळे सुटणाऱ्या दुर्गंधीमुळे श्वास घेणेदेखील कठीण होत आहे. प्रत्येक मोठ्या धार्मिक सोहळ्यापूर्वी प्रशासनाकडून तात्पुरते उपाय केले जातात. आढावा बैठका, सूचना आणि तात्पुरते बांध घालून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न होतो. मात्र, सोहळा संपताच पुन्हा परिस्थिती 'जैसे थे' होत असल्याचे वास्तव आहे. शासनाच्या श्रीक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत राबविण्यात आलेली भुयारी गटार योजना निष्फळ ठरत असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

### आकुर्डी रेल्वे स्टेशनजवळ विद्युत रोहित्राला आग; वाहतूक कोंडी, नागरिकांचा संताप

आकुर्डी (दैनिक संध्या) : आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ रस्त्यालगत असणाऱ्या विद्युत रोहित्राने रविवारी रात्री 8.45 वाजता अचानक पेट घेतला. रस्त्यालगत विद्युत रोहित्र पेटल्याने परिसरात खळबळ उडाली. जवळजवळ अर्ध्या तासाने अग्निशमन दलाची गाडी येऊन आग विझविण्याचा प्रयत्न केला. परंतु तोपर्यंत विभागाने विद्युत प्रवाह बंद न केल्यामुळे अग्निशमन दलासमोर काही कालावधी पुरता पेचप्रसंग निर्माण झाला. अखेर विद्युतप्रवाह बंद झाल्यानंतर अग्निशामक दलाला आग आटोक्यात आणण्यात यश प्राप्त आले. काही कालावधीतच आग पूर्णपणे विझली गेली. यामध्ये कुठलीही जीवितहानी न झाल्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले. विद्युत रोहितच्या बाजूला खाऊ गल्ली व अनेक छोटे मोठे शॉप्स, दुकाने असल्याने या भागात सातत्याने गर्दी आढळते. परंतु दुर्दैवाने कोणत्याही दुकानदाराकडे अग्निशमन नळकांडी नसल्याने आग लहान स्वरुपात असताना प्रयत्न करता आला नाही. अखेर बारामती डबेवाला या शॉपचे मालक कुणाल राऊत यांनी आपल्या गाडीतील छोटेसे अग्निशमन नळकांडे काढत आग विझजवण्याचा प्रयत्न केला. काही अंशी आग शांत होण्यास मदत झाली. या प्रभागाचे नगरसेवक नीलेश तरस यांनी अग्निशमन दलाला संपर्क करून या संदर्भाची माहिती दिली.

# ओंकार राऊत व अभिज्ञा भावे यांचा पुरस्काराने सन्मान

**तळेगाव दाभाडे (दै. संध्या)**

'महाराष्ट्राची हास्यजत्रा' फेम अभिनेते ओंकार राऊत आणि अभिनेत्री अभिज्ञा भावे यांना ज्येष्ठ अभिनेते शिवाजी साटम यांच्या हस्ते 'कलागौरव' पुरस्काराने, तर ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नंदकुमार वाळंज यांना 'जीवनगौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. निमित्त होते अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद तळेगाव शाखेच्या २१ व्या वर्धापन दिन कार्यक्रमाचे.




**अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद तळेगाव शाखेचा २१ व्या वर्धापन दिन उत्साहात साजरा**

नाना भालेराव कॉलनीमध्ये झालेल्या कार्यक्रमाला खासदार श्रीरंग बारणे, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. विश्वास पाटील, अभिनेत्री सविता मालपेकर, राजन भिसे, नगराध्यक्ष संतोष दाभाडे, उपनगराध्यक्ष गणेश काकडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश खांडगे, नाट्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश धोत्रे, बबनराव भेगडे, राजन लाखे, नीलम शिर्के – सामंत, विलास काळोखे, नाट्य परिषदेचे पदाधिकारी आदी उपस्थित होते.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद तळेगाव शाखेच्या २१ व्या वर्धापन दिन विविध कार्यक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला नाट्य परिषदेच्या वाटचालीची चित्रफीत दाखवण्यात आली. 'परंपरा महाराष्ट्राची' अभंग ते लावणी या सांस्कृतिक कार्यक्रमाने कलात्मक उंची वाढवली. खासदार बारणे यांनी कार्यक्रमास शुभेच्छा देताना सांगितले, तळेगावच्या सांस्कृतिक जडणघडणीमध्ये नाट्य परिषदेचे मोठे योगदान आहे. डॉ. विश्वास पाटील यांनी तळेगावच्या सांस्कृतिक परंपरेचे कौतुक केले. शिवाजी साटम यांनी नाट्यशिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. आजपर्यंत आम्ही जे काही कमावले आहे, ते नाट्यशिक्षणामुळेच. भाऊसाहेब भोईर म्हणाले, की कोणत्याही शहराची उंची केवळ इमारतीवरून मोजता येत नाही, तर त्या शहरात सामाजिक, सांस्कृतिक चळवळी किती सक्रिय आहेत, यावरून मोजता येते. नगराध्यक्ष संतोष दाभाडे यांनी आगामी दोन-तीन वर्षांत नियोजित नाट्यगृह पूर्ण करण्याची ग्वाही दिली.

दरम्यान, नयना डोळस व बालकलाकारांचा यावेळी गौरव करण्यात आला. आकाश थिटे यांनी सूत्रसंचालन, तर दीपक बाळसराफ यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विश्वास देशपांडे, संजय वाडेकर, दीपक बाळसराफ, नितीन शहा, चंद्रकांत भिडे, हरिश्चंद्र गडसिंग, दादा उऱ्हे, सचिन धनवे, उमेश महाजन, तानाजी मराठे, मयूर राजगुरव, राजेश बारणे, बसप्पा भंडारी, दीपाली पाटील, वैशाली लगाडे, फाल्गुनी भाटिया, डॉ. सोरटे यांनी परिश्रम घेतले.

## पिंपरी-चिंचवडमध्ये २४ सोसायट्यांचे नळजोड तोडले

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड शहरातील मोठ्या हाऊसिंग सोसायट्या व आस्थापनांना मैलासांडपाणी शुद्धीकरण केंद्र (एसटीपी) कार्यान्वित करून पाण्याचा पुनर्वापर करणे बंधनकारक आहे. त्यासंदर्भात महापालिकेने वारंवार नोटीसा देऊनही शहराती 24 हाऊसिंग सोसायट्यांचे नळजोड आत्तापर्यंत तोडण्यात आले आहेत. ही धडक कारवाई यापुढेही सुरू राहणार असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. शहरात मैलासांडपाणी प्रक्रिया आणि पुनर्वापराला प्रोत्साहन देण्यासाठी मोठ्या हाऊसिंग सोसायट्या आणि आस्थापनांतील खासगी एसटीपी सुरू करण्याबाबत महापालिकेकडून सातत्याने पाठपुरावा तसेच, कारवाई सुरू आहे. शहरात सध्या एकूण 106 एमएलडीचे 494 खासगी एसटीपी आहेत. त्यापैकी केवळ 83 एमएलडी क्षमतेची 369 एसटीपी सुरू अहेत. तर, 23 एमएलडी क्षमतेची 125 केंद्रे अद्याप बंद असल्याचे आढळून आले



**■ एसटीपी न चालवल्याने महापालिकेची धडक कारवाई; पर्यावरण नियम मोडणाऱ्यांवर कारवाई तीव्र**

आहे. सुरू नसलेल्या एसटीपी केंद्र सुरू करण्यासाठी संबंधित हाऊसिंग सोसायट्यांना महापालिकेच्या पर्यावरण विभागामार्फत तांत्रिक सहाय्य करण्यात येत आहे. तसेच, एसटीपी सुरू करण्याबाबत 125 पैकी 99 सोसायट्यांना महापालिकेकडून तीन वेळा नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. काही प्रकरणांमध्ये बांधकाम व्यावसायिकांकडून एसटीपी केंद्रांचे सोसायट्यांना हस्तांतरण करण्यात अडचणी येत आहेत. अशा सोसायट्यांच्या बाबतीत पर्यावरण विभागामार्फत सुनावण्या घेऊन मार्ग काढण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत.

## कुदळवाडीतील अनधिकृत धार्मिक स्थळांवर कारवाई

*कायदा-सुव्यवस्थेसाठी नागरिकांनी सहकार्य करण्याचे आमदार महेश लांडगे यांचे आवाहन*

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने सोमवारी पहाटे कुदळवाडी आणि परिसरातील अनधिकृत धार्मिक स्थळांवर बुलडोझर कारवाई केली. या पार्श्वभूमीवर आमदार महेश लांडगे यांनी प्रतिक्रिया देत, "देशविघातक प्रवृत्तींना आश्रय देणाऱ्या बेकायदेशीर प्रार्थनास्थळांवर कारवाई होणे आवश्यक होते. राष्ट्र सुरक्षेच्या दृष्टीने कोणतीही तडजोड केली जाणार नाही," असे स्पष्ट केले.




महेश लांडगे म्हणाले की, या कारवाईदरम्यान काही हिंदू धार्मिक स्थळांचेही नुकसान झाल्याची खंत आहे. मात्र, संबंधित स्थळे अधिकृत जागी आणि नियमानुसार पुनर्स्थापित करण्यासाठी पुढाकार घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

त्यांनी पुढे नमूद केले की, राष्ट्र सुरक्षा, इंद्रायणी नदी प्रदूषण नियंत्रण आणि पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने फेब्रुवारी २०२५ मध्ये या भागात मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणविरोधी कारवाई करण्यात आली होती. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने ही कारवाई करण्याचे धाडस दाखवले, असेही त्यांनी म्हटले. कुदळवाडी परिसर आगामी काळात अतिक्रमणमुक्त करून 'ग्रोथ हब' म्हणून विकसित करण्याचा शासनाचा मानस असल्याचे सांगताना लांडगे यांनी, "कायद्यापेक्षा कोणीही मोठे नाही. देशविघातक प्रवृत्तींना आश्रय देणाऱ्या कोणत्याही बेकायदेशीर बांधकामाला आम्ही समर्थन देणार नाही," अशी ठाम भूमिका मांडली. तसेच, परिसरातील नागरिकांनी कोणताही धार्मिक तणाव निर्माण न करता पोलीस आणि महापालिका प्रशासनाला सहकार्य करावे, तसेच पिंपरी-चिंचवड शहरातील कायदा व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले."जय श्रीराम... जय संविधान...!" अशा घोषवाक्यासह त्यांनी आपली प्रतिक्रिया समाप्त केली आहे.

## दुबार नावे हटवण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना निवेदन

**पिंपरी (दै. संध्या)**

निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी आणि मतदार याद्यांमधील बोगस व दुबार नावांचा प्रश्न निकाली काढण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते अरुण पवार यांनी प्रशासनाकडे आपला लढा अधिक तीव्र केला आहे. या संदर्भात मतदार यादी आधार कार्डाशी लिंक करण्यात यावी, या मुख्य मागणीसाठी त्यांनी पुन्हा एकदा प्रशासनाचे दरवाजे ठोठावले आहेत.

अरुण पवार यांच्या वतीने विधानसभा मतदारसंघ क्र. २०५ चिंचवडचे निवडणूक निर्णय अधिकारी श्री. कुलकर्णी यांना निवेदन देण्यात आले. अरुण पवार यांचे प्रतिनिधी मालोजी



भालके व श्रीकृष्ण जाधवर यांनी हे निवेदन दिले. अरुण पवार यांनी निवेदनात म्हटले आहे, की मतदार यादी आधार लिंकिंग अनिवार्य केल्यास एका व्यक्तीचे एकाच मतदारसंघात नाव राहील. पर्यायाने दुबार नावांची तत्काळ ओळख पटवून बोगस नोंदणी रोखता येईल. आधार लिंकिंगमुळे कोट्यवधी दुबार नावे कमी होतील. तसेच बोगस मतदानालाही आळा बसेल. दुबार नोंदींची कडक पडताळणी करून त्या कायमच्या रद्द कराव्यात. दुबार नावे आढळल्यास निवडणूक कर्मचाऱ्यांनी मतदाराशी संपर्क साधून केवळ त्याच्या सध्याच्या वास्तव्याच्या ठिकाणीच नाव कायम ठेवावे.

पवार यांनी सांगितले, की पिंपरी-चिंचवड ही औद्योगिक नगरी आहे. येथील मतदार याद्या आदर्श असाव्यात, यासाठी आपला लढा सुरू आहे. आधार लिंक केल्यास निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता येईल. याबाबत भारतीय निवडणूक आयोग नवी दिल्ली, मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य, महापालिका आयुक्त यांनाही निवेदन दिले आहे.

## लालबहादूर शास्त्री मंडईत पालेभाज्यांचे दर वाढले

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी येथील लालबहादूर शास्त्री भाजी मंडईत रविवार (दि. 10) बाजारात वाढत्या उन्हामुळे उत्पादन कमी असल्याने पालेभाज्यांचे दर वाढले आहेत, तर गेल्या आठवड्याप्रमाणे फळभाज्यांचे दर स्थिर आहेत. कोथिंबीर व मेथीची जुडी 40 रुपये दराने विक्री केली जात आहे. गवार, शेवगा 50 - 60 रुपये किलो दराने विक्री केली जात आहे, वांगी व फ्लॉवर 40 - 50 रुपये किलोचा दर आहे. मिरची 60, कर्नाटक कैरी 50 - 60 रुपये किलो दराने विक्री केली जात आहे. कांदा 100 रुपयांना पाच किलो प्रमाणे विक्री केली जात आहे. लसूण 100 - 150, तर आले 80 - 90 रुपये किलो दराने विक्री केली जात आहे.

फळभाज्यांचे दर पुढील प्रमाणे : रविवारी बाजारात गवार 70 रुपये, शेवगा 60, टोमॅटो 25, भेंडी 50, फ्लॉवर 30, कोबी 30, मिरची 50, गाजर 25, शिमला 60, लसूण 100 - 120, आले 70, वांगी 40, काकडी 40, कारले 70, कांदे 20 - 25 किलो, बटाटा 25-30 रुपये किलो, बिन्स 60, पावटा 70, लाल भोपळा 30, घोसाळी 60, दोडका 70, तोंडली 70, बीट 50, दुधी 40, घेवडा 60 रुपये.

## उन्हाळी सुट्ट्यांत एसटी बसला प्रचंड गर्दी

**खराळवाडी (दै. संध्या)**

उन्हाळी सुट्ट्यांमुळे एप्रिल-मे महिन्यात गावी जाणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढली आहे. महागड्या खासगी लक्झरी बसपेक्षा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या एसटी बसला प्रवाशांची मोठी पसंती मिळत आहे. मात्र, ऑनलाईन रिझर्व्हेशनमुळे सामान्य प्रवाशांची मुस्कटदाबी होत आहे. एसटीमध्ये बसण्यासाठी जागा मिळाल्याचा सर्वसामान्य प्रवाशांना आनंद असतो. परंतु अचानक रिझर्व्हेशन केलेला प्रवासी येतो तेव्हा त्यांना नाइलाजास्तव उभा राहण्याची वेळ येत आहे. यामुळे सुखकर वाटणारा प्रवास वेदनादायक होत आहे. मुलाना शाळेच्या सुट्या लागल्यामुळे उन्हाळ्यात अनेक जण आपल्या गावी किंवा फिरायला जातात. त्यासाठी रेल्वे तिकिटांची बुकींग

**■ खासगी ट्रॅव्हल्स महागल्याने एसटीकडे कल वाढला; मात्र आसन आरक्षणामुळे सामान्य प्रवासी अडचणीत**

तीन महिन्यांपूर्वी काही जणांनी करून ठेवलेली आहे. परंतु अनेकांना रेल्वे तिकीट मिळत नाही. त्यांना पर्याय मार्ग म्हणून खासगी प्रवासी वाहतुकीचा असतो तरी उन्हाळ्यात गर्दीचा फायदा घेत खासगी ट्रॅव्हल्स कंपनीने बसच्या तिकीटात मोठी वाढ केल्याने सर्वसामान्य प्रवाशांनी सध्या एसटी बसच्या प्रवासाला पसंती दिली आहे. एसटी बसचे तिकिट सर्वसाधारण प्रवाशांना परवाडणारे असल्यामुळे सध्या एसटीच्या प्रवासासाठी वल्लभनगर बसस्थानकात प्रवासी गर्दी करताना दिसतात. उन्हाळ्याच्या सुट्टीचा फायदा घेऊन खासगी बसचे तिकीट दर जास्त आहे.

## क्रीडा नगरी म्हणून नावलौकिक व्हावे : बारणे

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी चिंचवड ही नगरी कबड्डी खेळाची पंढरी आहे. येथून अधिकाधिक राष्ट्रीय खेळाडू घडावेत आणि क्रीडा नगरी म्हणून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे नाव देशभरात नावलौकिक मिळावा, असे प्रतिपादन खासदार श्रीरंग बारणे यांनी केले. प्रो कबड्डीच्या माध्यमातून खेळाडूंना मोठ्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. भविष्यात अधिकाधिक खेळाडूंनी या क्षेत्रात यश संपादन करावे, असे देखील त्यांनी खेळाडूंना शुभेच्छा देताना सांगितले.

महापौर रवि लांडगे यांच्या संकल्पनेतून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने महापौर चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा २०२६ चे भोसरी येथील गावजत्रा मैदानावर आयोजन करण्यात



आले आहे. या स्पर्धेला खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांनी भेट दिली. यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी महापौर रवि लांडगे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, नगरसदस्य तथा शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, नगरसदस्य निलेश तरस, नगरसदस्या सुलभा उबाळे, उपायुक्त पंकज पाटील, क्रीडा अधिकारी रंगराव कारंडे, क्रीडा पर्यवेक्षक दीपक कन्हेरे, क्रीडा पर्यवेक्षक अरुण कडूस यांच्यासह क्रीडाप्रेमी व नागरिक उपस्थित होते.

याप्रसंगी खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते विविध क्रीडा प्रकारातील शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. यामध्ये बॉक्सिंगमधील १९९७-९८ चे शिवछत्रपती पुरस्कार विजेते विजय यादव, कबड्डीमधील २०१५-१६ च्या शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या पूजा शेलार, कबड्डीतील शिवछत्रपती पुरस्कार विजेते राजू घुले, सायकलिंगमधील २००३-०४ च्या शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या मीनाक्षी शिंदे, जलतरणमधील २०२०-२१ च्या शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या वैष्णवी जगताप तसेच कबड्डीमधील २०२३-२४ चे शिवछत्रपती पुरस्कार विजेते विराज लांडगे यांचा समावेश होता.

## थोडक्यात पण महत्त्वाचे...



### मोटरसायकल चोरणारे दोघे अटकेत

नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर येथून दि.२९/३/२०२६ रोजी शाईन कंपनीची मोटारसायल चोरीला गेली होती तसेच २४/४/२०२६ रोजी जुन्नर शहरातून एक बुलेट गाडी चोरीस गेली होती.सदर गुन्ह्यांचा स्थानिक गुन्हे शाखेमार्फत समांतर तपास करत असताना दोन्ही गाड्या ज्या ठिकाणाहून चोरीस गेलेल्या होत्या त्या ठिकाणचे CCTV फुटेज तपासले असता दोन्ही गाड्या या चोरी करून ओतूर च्या बाजूला गेल्याचे CCTV फुटेज वरून लक्षात आले. गुन्हे शाखेच्या पथकाने ओतूर भागात CCTV फुटेज वरून गोपनीय बातमीदारा मार्फत माहिती घेतली असता समर्थ बाळासाहेब ढगे (वय १८ रा.५२ गल्ली ओतूर, ता.जुन्नर जि.पुणे),अथर्व सचिन साबळे (वय २० रा. ओतूर, ता. जुन्नर, जि. पुणे)हे बिना नंबर प्लेटची शाईन मोटरसायकल वापरत असल्याचे समजले. दि.७/५/२०२६ रोजी वरील दोन्ही इसम हे कुमशेत फाटा जुन्नर येथे येणार असल्याचे गुन्हे शाखेच्या पथकाला बातमीदारामार्फत समजले. सदर ठिकाणी गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा लावून दोघांना ताब्यात घेतले असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली असून त्यांच्याकडून चोरीस गेलेल्या दोन्ही मोटारसायकल जप्त करण्यात आल्या आहेत. सदर आरोपीची वैद्यकीय तपासणी करून पुढील कार्यवाहीसाठी जुन्नर पोलीस स्टेशनच्या ताब्यात दिले आहे. सदरची कार्यवाही ही पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदिप गिल्ल, अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलिस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर, पोलीस निरीक्षक किरण अवचर, सहायक पोलीस निरीक्षक महादेव शेलार, सहायक फौजदार दीपक साबळे, पोलीस हवालदार राजू मोमिन, संदीप वारे, पोलीस शिपाई अक्षय नवले, अभिमन्यू मोटे यांनी केली आहे.

### तडीपार कुणाल वीर वाकी येथून ताब्यात

चाकण (दैनिक संध्या) : दोन वर्षांसाठी तडीपार असलेल्या खेड तालुक्यातील वाकी, सुंबरेनगर येथील कुणाल बाळू वीर या २४ वर्षीय तरुणास ताब्यात घेण्यात आले आहे.वीर याला दोन वर्षासाठी तडीपार करण्यात आले होते. शासनाचा आदेश डावलून वीर हा कोणाची परवानगी न घेता चाकण भागात आला होता. वाकी येथून त्याला ताब्यात घेऊन जेरबंद करण्यात आले. चाकण पोलीस याप्रकरणी अधिक तपास करत आहेत.

### चाकणमधील तडीपार मयूर मेटे यास अटक

चाकण (दैनिक संध्या) : पुणे जिल्ह्यातून तब्बल अठरा महिन्यांसाठी तडीपार असलेल्या बत्तीस वर्षीय आरोपीला चाकण येथून ताब्यात घेऊन अटक करण्यात आली असल्याची माहिती उत्तर चाकण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांनी दिली. मयूर सुनील मेटे (वय - ३२, रा. चाकण) असे अटक करण्यात आलेल्या तडीपार तरुणाचे नाव आहे. मेटे याच्यावर महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम १४२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तडीपार असतानाही मेटे हा आदेशाचे उल्लंघन करत चाकण हद्दीत मोकाट फिरत होता. चाकण पोलीस याप्रकरणी अधिक तपास करत आहेत.

### वाडेबोल्हाईत मोफत आरोग्य तपासणी शिबिराला महिलांचा प्रचंड प्रतिसाद



कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : वाडेबोल्हाई (ता.हवेली) येथे राजेंद्र पठारे फाऊंडेशन व समर्थ युवा फाऊंडेशन तसेच युवा नेते वैभव पठारे यांच्या वतीने कै.राजेंद्र पंढरीनाथ पठारे यांच्या वाढदिवसानिमित्त महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, भाजपचे प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे,शिवछत्रपती क्रीडा जीवन गौरव पुरस्काराचे विजेते माजी सभापती पंढरीनाथ उर्फ अण्णासाहेब पठारे, वडगाव शेरीचे आमदार बापूसाहेब पठारे,माजी नगरसेवक महेंद्र पठारे, नगरसेवक सुरेंद्र पठारे यांच्या मार्गदर्शनाखाली ११ ते १३ मे अशा तीन दिवसांच्या कालावधीत करण्यात आले आहे. या शिबिराचा शुभारंभ वाडेबोल्हाईच्या लोकनियुक्त महिला सरपंच पल्लवी प्रदिप शिंदे, माजी सरपंच कुशाभाऊ गावडे, माजी उपसरपंच संजयराव भोरडे, माजी उपसरपंच विद्याधर गावडे, ज्येष्ठ नेते कांताराम गावडे, बोल्हाई देवी देवस्थानचे अध्यक्ष बळीराम गावडे, माजी उपसरपंच शिवाजीराव भोर, राष्ट्रवादी काँग्रेस महिला तालुकाध्यक्ष सुरेखा भोरडे, माजी सरपंच वैशाली केसवड, माजी सरपंच स्वाती इंगळे, सोसायटीचे चेअरमन निळकंठ केसवड, ग्रामपंचायत सदस्य नंदकुमार भोर, आदी मान्यवरांच्या हस्ते पार पडला. याप्रसंगी माजी उपसरपंच महेश शिंदे, माजी उपसरपंच योगेश गायकवाड, माजी उपसरपंच तथा सदस्या सुमित शिंदे, माजी उपसरपंच तथा सदस्या मोनाली भोर, माजी उपसरपंच तथा सदस्या सोनाली रिकामे, सदस्य सोनाली शिंदे, नवनिर्वाचित ग्रामपंचायत सदस्य राणी पायगुडे, गायत्री शरद भोर, प्राजक्ता पठारे, माजी उपसरपंच महादेव गावडे, शिवाजीराव भोरडे, तुकाराम शिंदे, युवा नेते राहुल शिंदे, उद्योजक नितीन गावडे, संजय पायगुडे, बाळासाहेब पवार, पंडित पायगुडे, लक्ष्मण गावडे, आदी विविध संस्थांचे पदाधिकारी, सदस्य, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या मोफत शिबिराचे आयोजन व नियोजन करण्यासाठी वैभव पठारे मित्र परिवाराने परिश्रम घेतले.या शिबिराच्या शुभारंभ प्रसंगी प्रथम दिवशी महिलांचा शिबिराला प्रचंड प्रतिसाद लाभला.यामध्ये काही प्रमाणात पुरूषांच्याही तपासणी करण्यात येत आहे.या तपासण्या भव्य आरोग्य व्हेन गाडीत करण्यात येत आहेत.

### राज्यात 10.45 कोटी टन ऊस गाळप; साखर उत्पादनात कोल्हापूरचा दबदबा कायम

बारामती (दैनिक संध्या) : राज्यातील सन 2025-26 चा ऊस गाळप हंगाम संपला असून, सरासरी 105 दिवस हंगाम चालला आहे. तर, 10 कोटी 45 लाख 58 हजार मेट्रिक टन ऊस गाळप पूर्ण झाले असून, 99 लाख 18 हजार मेट्रिक टनांइतके साखर उत्पादन हाती आले आहे. तर, 9.49 टक्क्यांइतका निव्वळ साखर उतारा मिळाला असल्याची माहिती साखर आयुक्ताल यातून मिळाली. ऊस गाळपात पुणे आणि सोलापूर विभाग अग्रस्थानी राहिला असून, साखर उत्पादन आणि उताऱ्यामध्ये कोल्हापूर विभागाने आपले वर्चस्व कायम ठेवल्याचे ऊस गाळप हंगामाच्या अंतिम अहवालावरून दिसून येत आहे. राज्यातील 102 सहकारी आणि 107 खासगी मिळून एकूण 209 साखर कारखान्यांनी ऊस गाळप हंगाम घेतला. या सर्व कारखान्यांची मिळून दैनिक ऊस गाळप क्षमता सुमारे 10 लाख 7 हजार 800 मेट्रिक टन राहिली. तुलनात्मक स्थिती विचारात घेता राज्यात गतवर्षीच्या हंगाम 2024-25 मध्ये 199 साखर कारखान्यांनी मिळून एकूण 853.82 लाख मे. टनांइतकेच ऊस गाळप पूर्ण केले होते. म्हणजेच गतवर्षपिक्षा यंदा सुमारे 191.76 लाख मे. टनांनी अधिक ऊस गाळप पूर्ण झाले असून, 182.51 लाख क्विंटलने साखर उत्पादनात वाढ झालेली असल्याची माहिती साखर आयुक्तालयातून दिली. पुणे विभागातील 32 कारखान्यांनी मिळून एकूण 222 लाख 55 हजार मे. टन, तर सोलापूरमधील 49 कारखान्यांनी एकूण 222 लाख 5 हजार मे. टनांइतके ऊस गाळप पूर्ण केले आहे.

# कै. ज्योतिभाऊ विश्वनाथ थोरवे यांचे स्मरणार्थ खंडोबा मंदिराला विविध वस्तू प्रदान

जेजुरी (दै. संध्या)



कै ज्योतीभाऊ विश्वनाथ थोरवे यांच्या स्मरणार्थ प्रा.सौ.वर्षा पांडुरंग थोरवे यांनी श्री मार्तंड देवस्थान जेजुरी यांना न्यासाला खंडोबा मंदिरात नित्य उपयोगात येणाऱ्या वस्तू भेट दिल्या.

श्री खंडोबा मंदिर मुख्य गाभारा साफसफाई करण्यासाठी उच्च प्रतीचा व्हॅक्यूम क्लिनर, श्री खंडोबा मंदिर मुख्य गाभारा मध्ये भक्तिमय वातावरण निर्माण व्हावे यासाठी श्री खंडोबा देवाचा मंत्र लावणे साठी स्पीकर ट्रॉली, अन्नदान कक्ष या ठिकाणी चांगल्या प्रतीचे आत्याधुनिक सिलिंग 5 फॅन, अन्नदान कक्ष येथे चांगल्या प्रतीचा कमर्शियल वापराकरिता मिक्सर ,देवसंस्थानचे चप्पल स्टॅन्ड करिता मेटल मधील चांगल्या प्रतीचा स्टँड फॅन, देवसंस्थानचे भंडारा पॅकिंग कक्ष करिता मेटल मधील चांगल्या प्रतीचा स्टँड फॅन आदी वस्तू थोरवे परिवाराच्या वतीने देण्यात आल्या. यावेळी जेजुरीच्या श्री मार्तंड देवसंस्थानचे अध्यक्ष अॅड. विश्वास पानसे यांनी थोरवे परिवाराचे आभार मानले.यावेळी विश्वस्त अॅड. पांडुरंग थोरवे, व्यवस्थापक आशिष बाठे व अधिकारी कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

## शरण मठात पट्टाभिषेक सोहळ्याच्या निमित्ताने धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन

अक्कलकोट (दै. संध्या)

अक्कलकोट संस्थानचे राजगुरू श्री सिद्धारूढ महास्वामी यांचे अग्रगण्य शिष्य सद्गुरू श्री रेवणसिद्ध शिवशरण महास्वामी मठाचे श्री चौडय्या देवरू यांच्या पट्टाभिषेक सोहळ्यानिमित्ताने दोन दिवस विशेष धार्मिक सोहळा होणार आहे. शरण मठ अक्कलकोट येथे हा सोहळा होत असून रविवारी (ता. १०) पहाटे ब्राम्ही मुहूर्तावर चिक्क रेवणसिद्ध महास्वामी यांच्या समाधी गदगीस महारुद्राभिषेक झाला.

तसेच सहस्त्र बिलवार्चन, सहस्त्र नामावली, विशेष अलंकार सहित महाआरती करण्यात आली. यावेळी माजी खासदार डॉ. श्री. जयसिद्धेश्वर महास्वामी, श्री.अभिनव गजदंड शिवाचार्य महास्वामी, श्री अभिनव शरण शिवालिंगेश्वर महास्वामी, श्री चन्नबसव पट्टदेवरू, श्री परमानंद महास्वामी, श्री शंकरानंद महास्वामी यांसह अन्य मठाधीश व मान्यवरांच्या उपस्थितीत आजचे कार्यक्रम झाले. त्यानंतर सकाळी नऊ वाजता सर्व मठाधीशांच्या उपस्थितीत धर्म ध्वजारोहणाचा कार्यक्रम झाला. त्यानंतर वेदांत वेदिका, दिपप्रज्वलन आणि विविध मठाचे मठाधीश व प्रमुख अतिथी यांच्या उपस्थितीत भक्तांसाठी आशीर्वाद धर्मसभा घेण्यात आली. कार्यक्रमाचे संयोजन श्री रेवणसिद्ध शिवशरण महास्वामी मठाचे अध्यक्ष सचिव सर्व पदाधिकारी आणि भक्त या सर्वांनी मिळून केले.

शरण मठात कार्यक्रमाचा मुख्य विधी सोमवारी होणार असून पहाटे रेवणसिद्ध महास्वामी यांच्या समाधीस महारुद्रभिषेक होईल. तसेच श्री चौडय्या देवरू यांचा पट्टाभिषेक महोत्सव तसेच गुरुवीन उपकार स्मरणे या विषयावर आध्यत्मिक प्रवचन होणार आहे.

## लांडेवाडीत डोंगराला आग; दोन झोपड्या खाक

मंचर (दै. संध्या)

लांडेवाडी (ता. आंबेगाव) येथे शनिवारी (ता. ९) दुपारी डोंगराला लागलेल्या आगीत दोन झोपड्यांसह गोठा जळून खाक झाला. सुमारे एक लाख ७० हजार रुपयांचे नुकसान झाले असून, दोन महिलांच्या प्रसंगावधानामुळे दोन चिमुकल्यांचे प्राण वाचल्याने मोठा अनर्थ टळला. लांडेवाडीतील दर्यावस्ती परिसरात ही घटना घडली. गुलाब केवाळे यांच्या गोठ्यातील शेती साहित्य, चारा व संसारोपयोगी वस्तू आगीत जळून खाक झाल्या, तर सागर केदारी यांची झोपडी पूर्णपणे जळाली. माही केदारी (८ महिने) व शिवांश केवाळे (१० महिने) ही बालके झोपडीत असताना परिसरातील महिलांनी धाडस दाखवून त्यांना सुरक्षित बाहेर काढले. घटनेची माहिती मिळताच खंडेराव आढळराव पाटील, अभिजित आढळराव पाटील, प्रदीप आढळराव पाटील, सोमनाथ आढळराव पाटील, अविनाश आढळराव पाटील, वनमजूर रामभाऊ उभे यांच्यासह ग्रामस्थांनी आग आटोक्यात आणली. तहसीलदार डॉ. सचिन वाघ यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला.



संकटात सापडलेल्या केदारी व केवाळे कुटुंबासाठी लांडेवाडी ग्रामस्थांनी माणुसकीचे दर्शन घडवले. उपसरपंच अंकुश लांडे पाटील व खंडेराव आढळराव पाटील यांच्या आवाहनानंतर अवघ्या १५ मिनिटांत ५० हजार रुपयांची मदत जमा झाली. उद्योजक संजय थोरात यांनी केदारी कुटुंबाला दोन महिन्यांचा किराणा व शैक्षणिक साहित्य देण्याचे जाहीर केले. तर रमेश येवले यांनी २० हजार रुपयांची रोख रक्कम संबंधित कुटुंबाकडे सुपूर्त केली.

## अनधिकृत पार्किंग विरोधात मनसेचे बुधवारपासून साखळी उपोषण

चाकण (दै. संध्या)

■ महाळुंगे इंगळे येथे मांडणार ठिय्या

वाहतूक कोंडी सोडविण्याच्या मोघम गप्पा मारणाऱ्या प्रशासना विरोधात मनसेने आक्रमक भूमिका घेतली आहे. अनधिकृत पार्किंग विरोधात महाळुंगे इंगळे येथे बुधवार (दि.१३) पासून मनसेने साखळी उपोषण करण्याचा निर्धार केला आहे.

औद्योगिकीकरणाने विस्तारणाऱ्या चाकण भागात वाढत्या वाहतूक कोंडीने नागरिक अक्षरशः रडकुंडीला आले आहेत. चाकण मधील मोक्याच्या ठिकाणी उड्डाणपूल न बांधता चुकीच्या ठिकाणी पूल बांधल्याने रात्री अपरात्री केव्हाही प्रचंड वाहतूक कोंडी होते. त्यामुळे सर्वांनाच मोठा मनस्ताप सहन करावा लागतो. पूर्वीचे चाकण आणि आजचे चाकण यात मोठा बदल झाला आहे. औद्योगिकीकरण आणि त्याच तुलनेत नागरिकीकरण वाढल्याने



वाहनांची संख्या सुद्धा अफाट वाढली आहे. वाहन चालकांच्या बेफिकिरीमुळे अनेकांचे नाहक बळी गेले आहेत. चाकणसह महाळुंगे इंगळे परिसरात बेकायदेशीर आणि अनधिकृत पार्किंग मोठ्या प्रमाणात वाढले आहे. मोठ्या प्रमाणावर होत असलेली वाहतूक कोंडी, अपघाताचा धोका वाढल्याने नागरिकांसह कामगार हैराण झाले आहेत. चाकण भागातील वाढती वाहतूक कोंडी आणि रस्त्यावरील दुतर्फा होत असलेली अनधिकृत पार्किंग मार्गी लावण्यासाठी अनेक सेवाभावी संस्था, संघटना आणि कार्यकर्त्यांनी पाठपुरावा केला. मात्र संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्याकडे जाणून बुजून दुर्लक्ष केले आहे. रोजच्या होत असलेल्या वाहतूक कोंडीने व अनधिकृत पार्किंग मुळे खेड तालुक्यातील जनता मरणयातना सहन करत आहेत.

प्रशासनाच्या विरोधात आणि चाकणसह औद्योगिक भागात कायम स्वरूपी ठोस उपाययोजना कराव्यात यासाठी मनसे महाळुंगे इंगळे येथील एचपी चौकातील वाहतूक पोलीस स्टेशन समोर बुधवार पासून साखळी उपोषण करणार असल्याचे मनसेचे चाकण शहर अध्यक्ष महेश शिरोळे यांनी सांगितले.



## खालुंब्रे पंचक्रोशीतील प्रलंबित रस्ते विकास कामांना गती

**पीएमआरडीए निधीची तरतूद**

"रस्त्यांची कामे अंतिम टप्प्यात असून, लवकरच खालुंब्रे येथील पाणीपुरवठा योजनेचेही लोकार्पण मोठ्या धुमधडाक्यात करण्यात येणार आहे."
**- गणेश बोत्रे, जिल्हा परिषद सदस्य**

चाकण (दै. संध्या)

खेड तालुक्यातील महाळुंगे इंगळे - नाणेकरवाडी या जिल्हा परिषद गटातील प्रलंबित रस्ते विकास कामांना गती आली असून, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून निधीची विशेष तरतूद करण्यात आली आहे.

माजी आमदार दिलीप मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली या रस्त्याच्या विकास कामाचे उद्घाटन करण्यात आले. हुंदाई चौकाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याची दुरवस्था झाली होती. याबाबत नाणेकरवाडी - महाळुंगे जिल्हा परिषदेचे सदस्य गणेश बोत्रे यांनी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे वेळोवेळी पाठपुरावा करून निधीची मंजुरी मिळवली. त्यामुळे खालुंब्रे ते फेज १ या ७५० मीटर अंतराच्या रस्त्याच्या मजबुतीकरणाचे काम सुरू करण्यात आले आहे. यामुळे औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यांकडे जाणारी जड वाहतूक, शेतकरी आणि स्थानिक नागरिकांचा प्रवास अधिक सुलभ होणार आहे. दिलीप मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली गणेश बोत्रे आणि पंचायत समिती सदस्या अश्विनी तरस यांच्या हस्ते खालुंब्रे चौकात नारळ वाढवून उद्घाटन करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विकास कामांच्या उद्घाटनानंतर जिल्हा परिषद सदस्य गणेश बोत्रे यांनी ' जल जीवन मिशन ' अंतर्गत सुरू असलेल्या कामांची पाहणी केली. गावातील पाणीपुरवठा योजनांचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आदेश त्यांनी संबंधित ठेकेदारांना दिले आहेत.

## ऊस तोडणी करत दहावीत दीपाली बुधवंतने मिळवले ८०.२० टक्के



पारगाव (दै. संध्या)

ता. आंबेगाव येथील भीमाशंकर सहकारी साखर कारखाना परिसरात कोपीमध्ये राहणाऱ्या ऊस तोडणी मजुराची मुलगी दीपाली गोरक्ष बुधवंत या विद्यार्थिनीने दहावीच्या परीक्षेत जिद्दीने अभ्यास करत ८०.२० टक्के गुण मिळवले तिने मिळवलेल्या यशाबद्दल तिचे परिसरात कौतुक होत आहे. या मुलीचे वडील गोरक्ष बुधवंत हे मूळ राहणार अकोले तालुका पाथर्डी जिल्हा अहिल्यानगर चे रहिवाशी असून ते ऊसतोड कामासाठी गेल्या अनेक वर्षांपासून पारगाव येथे भीमाशंकर कारखाना परिसरात कोपी करून राहत आहेत. त्यांची मुलगी दिपाली हिने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आई-वडिलांच्या सोबत ऊस तोडणीचे काम करून प्रतिकूल परिस्थितीत अभ्यासासाठी अत्यंत कमी वेळ मिळत असून सुद्धा मुळगावी जाऊन दहावीची परीक्षा दिली. यामध्ये तिला ८०.२० टक्के गुण मिळाले. पारगावचे माजी उपसरपंच आणि माजी विद्यार्थी संघाचे उपाध्यक्ष सचिन दत्तात्रय अस्वारे यांनी त्या विद्यार्थिनीच्या घरी जाऊन तिचा सत्कार करून अभिनंदन केले तसेच पुढील शिक्षणासाठी लागणाऱ्या मदतीचे आश्वासन दिले. या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चे कार्याध्यक्ष गोरक्ष(बाप्पू) ढोबळे, स्वप्नील कुल्लाळ, गोरक्ष बुधवंत आणि त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

# 'आपले सरकार' पोर्टलच्या बिघाडामुळे विद्यार्थी-पालक हैराण

## बारामतीत दाखले सेवांचा खोळंबा; सर्व्हर डाऊनमुळे महा ई-सेवा केंद्रांवर नागरिकांची गर्दी

शैक्षणिक प्रवेशाचा हंगाम तोंडावर असताना 'आपले सरकार' पोर्टल तातडीने सुरळीत सुरू करून पर्यायी व्यवस्था उभी करावी. पोर्टल बंद असल्याने विद्यार्थी आणि पालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.
**- प्रमोद पानसरे, अध्यक्ष, महा ई-सेवा केंद्र बारामती तालुका संघटना**

बारामती (दै. संध्या)

शासनाच्या 'आपले सरकार' पोर्टलच्या सततच्या तांत्रिक बिघाडामुळे बारामती तालुक्यात विद्यार्थी, पालक आणि महा ई-सेवा केंद्रचालक हैराण झाले आहेत. शैक्षणिक दाखले, अर्ज पडताळणी, डिजिटल स्वाक्षरी यांसारख्या सेवा ठप्प झाल्याने नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. शासनाकडून डिजिटल महाराष्ट्राच्या घोषणा केल्या जात असल्या तरी प्रत्यक्षात मात्र पोर्टल वारंवार बंद पडत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे. तब्बल आठवडाभर 'तांत्रिक सुधारणा'च्या नावाखाली पोर्टल बंद ठेवण्यात आले होते. मात्र, पुन्हा सुरू झाल्यानंतरही यात कोणताही बदल झालेला नाही. काही काळासाठी सेवा सुरू झाल्या; पण सर्व्हर पुन्हा डाऊन झाल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. विशेष म्हणजे, पोर्टल बंद राहणार असल्याची कोणतीही पूर्वकल्पना ई-सेवा केंद्रचालकांना देण्यात येत नाही. दरवर्षी प्रवेशादरम्यान अशा अडचणींना पालकांना सामोरे जावे लागत आहे. सध्या बारावी आणि दहावीचा निकाल जाहीर झाला आहे. जून-जुलै महिन्यातील प्रवेशप्रक्रियेसाठी जातीचे, उत्पन्नाचे, रहिवासी तसेच इतर शैक्षणिक दाखल्यांची गरज भासणार आहे. ही गर्दी लक्षात घेऊन अनेक पालकांनी मे महिन्यापासूनच दाखले काढण्यास सुरुवात केली आहे. मात्र, याच काळात पोर्टल कोलमडले आहे. दाखल्यांसाठी पालकांना उन्हातान्हात हेलपाटे मारावे लागत आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक काम रखडल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

अपडेटच्या नावाखाली नागरिकांची थट्टा सुरू आहे का? असा सवालही अनेक नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. दरम्यान, शासनाच्या डिजिटल व्यवस्थेतील नियोजनाचा अभाव पुन्हा एकदा समोर आला आहे. वेबसाइट सातत्याने बंद राहणे आणि सर्व्हर डाऊन राहणे, हा प्रकार आता नित्याचा झाल्याची प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### लवकर निदान आणि वेळेवर उपचार हर्नियाच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी महत्त्वाचे

मुंबई (दैनिक संध्या) : हर्निया ही एक सामान्य पण अनेकदा दुर्लक्षित केली जाणारी समस्या आहे, ज्याच्यावर वेळेत उपचार न केल्यास जीवनाच्या गुणवत्तेवर लक्षणीय परिणाम होऊ शकतो. ही अवस्था तेव्हा निर्माण होते जेव्हा एखादा अवयव किंवा ऊतक आसपासच्या स्नायूमधील कमकुवत भागातून बाहेर ढकलले जाते. जड वजन उचलणे, दीर्घकालीन खोकला, स्थूलता आणि मागील शस्त्रक्रिया अशा बाबी याचा धोका वाढवू शकतात. जागतिक आरोग्य संघटनेनुसार, हर्नियासह उपचार न केलेल्या शस्त्रक्रियेसंबंधित आजारांमुळे जागतिक रोगांच्या भारात लक्षणीय वाढ होते. नॅशनल सेंटर फॉर बायोटेक्नॉलॉजी इन्फॉर्मेशनच्या आकडेवारीनुसार, सुमारे 27% पुरुषांना आणि 3% महिलांना आयुष्यात कधी ना कधी इन्ग्वायनल हर्नियाचा त्रास होतो. आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय देखील गुंतागुंत टाळण्यासाठी लवकर निदान आणि वेळेवर शस्त्रक्रियेचे महत्त्व अधोरेखित करते. "माझ्या प्रॅक्टिसमध्ये, मी अनेक रुग्णांवर उपचार केले आहेत ज्यांना सुरुवातीला फक्त एक छोटी सूज जाणवली होती. उपचार न केल्यास ही अवस्था कशी वाढू शकते हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. वेळेवर हस्तक्षेप केल्यास, प्रक्रिया किती सोपी आहे आणि दुरुस्तीनंतर सूज व अस्वस्थता यांसारखी लक्षणे किती लवकर सुधारतात हे पाहून रुग्णांना दिलासा मिळतो," असे डॉ. परमेश्वर भाम्ब्रूले यांनी सांगितले. "मी माझ्या रुग्णांना नेहमी सांगतो की हर्नियाचा उपचार हा केवळ दिसणारी सूज दुरुस्त करण्यापुरता मर्यादित नसून, गुंतागुंत टाळणे आणि एकूण जीवनमान सुधारण्याबद्दलही आहे. वेळेवर उपचारानंतर अनेक रुग्णांना हालचालीत सुधारणा, झोपेत सुधारणा आणि दैनंदिन दिनक्रमात लवकर परतण्याचा अनुभव येतो," असे डॉ. विनायक क्षीरसागर यांनी सांगितले.

### मावडी पिंपरी हायस्कूलचा सलग 19 व्या वर्षी 100 टक्के निकालाचा मानाचा तुरा

पुरंदर (दैनिक संध्या) : पुरंदर तालुक्यातील मावडी पिंपरी हायस्कूल,पिंपरी विद्यालयाने यंदाच्या एस.एस.सी.परीक्षेत सलग १९ व्या वर्षी १०० टक्के निकालाची उज्वल परंपरा कायम राखत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयाच्या या यशामुळे विद्यार्थी, पालक व ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावर्षी परीक्षेसाठी एकूण ३२ विद्यार्थी बसले होते. त्यामध्ये १७ मुले व १५ मुलींचा समावेश होता. सर्व विद्यार्थी उत्तीर्ण होत विद्यालयाने शंभर टक्के निकालाची गौरवशाली परंपरा अबाधित ठेवली. विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये कु.खेडेकर गौरी विठ्ठल हिने ९१.८० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. शेंडकर हरिओम सहदेव याने ८६.६० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला. तर कु.चौंडकर कार्तिकी शिवाजी व कापरे सार्थक प्रशांत यांनी प्रत्येकी ८६.४० टक्के गुण मिळवत संयुक्तरीत्या तृतीय क्रमांक प्राप्त केला. विद्यालयाच्या या उल्लेखनीय यशाबद्दल श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ,सासवड संस्थेच्या अध्यक्षा आनंदीकाकी जगताप, संस्थेचे सचिव तथा माजी आमदार संजय जगताप, भारतीय प्रशासन सेवा अधिकारी व संस्थेचे विशेष सल्लागार डॉ. राजेंद्र जगताप, सहसचिव दत्तात्रय गवळी, संस्थेच्या समन्वयिका सोनालीताई शिंदे, ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा व संस्थेच्या विश्वस्त राजवर्धिनी जगताप, भारती विद्यापीठाच्या संचालिका व संस्थेच्या विश्वस्त डॉ. अस्मिता जगताप, संस्थेचे व्यवस्थापक कानिफनाथ अमराळे,रवींद्रपंत जगताप तसेच मावडी-पिंपरी गावचे ग्रामस्थ यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे,पालकांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले. विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजी कोलते व सर्व शिक्षकवृंद यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. विद्यालयाच्या सलग १९ वर्षांच्या १०० टक्के निकालाच्या परंपरेमुळे परिसरात विद्यालयाचे विशेष कौतुक होत आहे.

### नि:शुल्क आध्यात्मिक संस्कार शिबिराचे आयोजन; 12 ते 25 मे दरम्यान होणार शिबिर

पुणे (दैनिक संध्या) : लहान मुलांमध्ये सदाचार, सत्प्रवृत्ती आणि आध्यात्मिक मूल्यांची जपणूक व्हावी, या उद्देशाने दि. १२ ते २५ मे २०२६ या कालावधीत 'आध्यात्मिक संस्कार शिबिर' आयोजित करण्यात आले आहे. रविवार पेठ कस्तुरे चौकातील श्री विठ्ठल मंदिर देवस्थान ट्रस्ट येथे शिबिर होणार आहे. शिबिरासाठी नाव नोंदणी आवश्यक असल्याची माहिती संदीप शिवलिंग पळसे यांनी दिली. हे शिबिर पूर्णपणे निःशुल्क असणार आहे. वय वर्षे ८ ते १६ या वयोगटातील फक्त मुलांना सहभागी होता येणार आहे. शिबिराची वेळ दररोज सकाळी ८ ते दुपारी १२.३० अशी राहणार आहे. या शिबिरामध्ये प्रातःस्मरण, प्राणायाम, श्रीमद्भगवद्गीता अभ्यास, संतांचे अभंग व त्यांचा भावार्थ, विविध स्तोत्रे, हरिपाठ, संत वाङ्मय अभ्यास तसेच विविध खेळ यांचा समावेश असणार आहे.

# माहिती अधिकार हे भ्रष्टाचाराविरोधातील प्रभावी शस्त्र

## ॲड. अजित बोराडे यांचे प्रतिपादन; दक्ष नागरिक संघाचा माहिती अधिकार कार्यकर्ता मेळावा उत्साहात

पिंपरी चिंचवड(दै. संध्या)



सरकारी कार्यालयांत सामान्य नागरिकांना मिळणारी वागणूक पाहता ही खरोखर जनतेची सत्ता आहे का, असा प्रश्न निर्माण होतो. ही व्यवस्था बदलण्यासाठी आणि भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी 'माहिती अधिकार कायदा २००५' हे सर्वसामान्यांच्या हातातील प्रभावी शस्त्र असल्याचे प्रतिपादन सहकारतज्ज्ञ ॲड. अजित बोराडे यांनी केले. प्रशासनात पारदर्शकता आणण्यासाठी नागरिकांनी माहिती अधिकार कायद्याचा प्रभावी वापर करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

दक्ष नागरिक संघाच्या वतीने चिंचवड येथे रविवारी (दि. १०) आयोजित माहिती अधिकार कार्यकर्त्यांचा महामेळावा व पुरस्कार सोहळ्यात ते बोलत होते. खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते मेळाव्याचे उद्घाटन झाले. कार्यक्रमास कामगार नेते इरफान सय्यद, नगरसेविका सुप्रिया चांदगुडे, पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे, नगरसेवक राजू बनसोडे, युवा सेनेचे निलेश हाके,ॲड. श्वेता मांडे-वैद्य, सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर नागरगोजे, शांताराम कुंभार, पत्रकार सुरज साळवे, काशिनाथ शिंदे आदी उपस्थित होते.

यावेळी खासदार बारणे यांच्या हस्ते संजीवन सांगळे यांना 'सहकार भूषण', डॉ. सोनाली गेडाम-नागदेवते यांना 'विद्यारत्न', तर पत्रकार सुरज साळवे यांना 'पत्रकारिता भूषण' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

ॲड. बोराडे म्हणाले, स्वातंत्र्यानंतरही प्रशासकीय यंत्रणेचा दृष्टिकोन फारसा बदललेला नाही. सुशिक्षित व्यक्तींनाही एखाद्या कामासाठी अनेक महिने कार्यालयांच्या चकरा माराव्या लागतात, तर अशिक्षित नागरिकांची अवस्था अधिक कठीण असते. माहिती अधिकार कायद्यामुळे शासकीय अधिकाऱ्यांचे उत्तरदायित्व वाढते आणि त्यांच्या चुकीच्या निर्णयांवर प्रकाश पडतो. माहिती अधिकार कायद्यांतर्गत केवळ कागदपत्रेच नव्हे, तर सरकारी कामातील साहित्य, रस्ते बांधणीसाठी वापरण्यात येणारे सिमेंट, वाळू किंवा औषधांचे नमुने घेण्याचाही अधिकार नागरिकांना आहे. तसेच संबंधित कार्यालयात जाऊन प्रत्यक्ष फाईल तपासणी करण्याची तरतूदही या कायद्यात असून, पहिल्या तासासाठी ही तपासणी मोफत असल्याची माहिती त्यांनी दिली.

खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, माहिती अधिकार कायद्यामुळे सर्वसामान्य नागरिक सत्तेच्या केंद्रस्थानी आला आहे. कायद्याचे तांत्रिक ज्ञान नसतानाही केवळ एका अर्जाद्वारे प्रशासकीय कामातील त्रुटी आणि चुका उघड करणे शक्य झाले आहे. चुकीच्या पद्धतीने काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना वठणीवर आणण्याचे काम या कायद्याने केले आहे. माहिती अधिकाराचा वापर विधायक कामांसाठी झाल्यास अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लागण्यास मदत होते. माहिती अधिकार कायद्यामुळे प्रशासनातील पारदर्शकता वाढली असून नागरिकांना त्रास देणाऱ्या प्रवृत्तींना आळा बसला आहे. मात्र काही जण या कायद्याचा चुकीचा वापर करून प्रामाणिक कार्यकर्त्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे सामाजिक कार्यकर्त्यांनी आपल्या कामातील आणि चारित्र्यातील स्वच्छता जपणे आवश्यक असल्याचेही बारणे यांनी नमूद केले.

सूत्रसंचालन ॲड. श्वेता मांडे-वैद्य यांनी केले. विनोद क्षीरसागर यांनी प्रास्ताविक, तर निलेश हाके यांनी आभार मानले.

## संघर्षावर मात करत पुण्यातील रात्र शाळेचे विद्यार्थी राज्यात अव्वल

पुणे (दै. संध्या)



पहाटेपासून वेदपाठशाळेतील दिनक्रम, पौरोहित्याचे काम आणि रात्री अभ्यास... ; तर दुसरीकडे दिवसा सुरक्षा रक्षक आणि बाउन्सर म्हणून काम, रात्री शाळेत शिक्षण, घर आणि मुलाची जबाबदारी... अशा प्रतिकूल परिस्थितीतही वसुप्रद कुलकर्णी आणि अंकुश रेवाळे यांनी जिद्दीच्या जोरावर दहावीची परीक्षा केवळ उत्तीर्णच केली नाही, तर राज्यात प्रथम आणि द्वितीय क्रमांक मिळवत संघर्षातून यशाची प्रेरणादायी कहाणी साकारली आहे. दि रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटी संचलित आबासाहेब अत्रे रात्र प्रशाला तर्फे संघर्षातून यश मिळवणाऱ्या या विद्यार्थ्यांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन संस्थेच्या सोमवार पेठ येथील प्रांगणात करण्यात आले होते. सामाजिक कार्यकर्ते विवेक वेलणकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमास संस्थेचे कार्याध्यक्ष संजीव महाजन, सचिव प्रफुल्ल निकम, सदस्य भारत वेदपाठक, समन्वयक कैलास साळुंखे हे उपस्थित होते.

आबासाहेब अत्रे रात्र प्रशाला या रात्र शाळेचा यंदाचा दहावीचा निकाल ८८.८८ टक्के लागला आहे. प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या वसुप्रद कुलकर्णी यानी ९०.४० टक्के गुण मिळवले आहेत. तर अंकुश रेवाळे यांनी ८४.८० गुण मिळवून राज्यात द्वितीय आले आहेत. दहावी व बारावी परीक्षेत प्रथम तीन क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांना यावेळी गौरविण्यात आले.

विवेक वेलणकर म्हणाले, यापुढील काळात श्रमजीवी माणसांचे महत्त्व अधिक वाढणार आहे. भविष्यात स्किल-बेस्ड शिक्षणाकडे सर्वांनाच वळावे लागेल. आयआयटी आणि आयटीआय या दोन्ही शिक्षणप्रवाहांना समान महत्त्व मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रत्येकाने कौशल्याधारित शिक्षणावर भर देणे गरजेचे आहे. आपल्या परिसरात अनेक चांगल्या संस्था उपलब्ध आहेत. पारंपरिक शिक्षण जरूर घ्या; पण त्यासोबत स्किल-बेस्ड शिक्षणही आत्मसात करा.

## लावणी सादरीकरणाच्या अश्लीलतेवर नियंत्रण

पुणे (दै. संध्या)

लावणी सादरीकरणातील वाढत्या अश्लीलतेवर नियंत्रण आणण्यासाठी राज्य सरकारने स्वतंत्र सेन्सॉर बोर्ड स्थापन करावे, अशी मागणी करत तमाशा कलावंतांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना साकडे घातले आहे. यासंदर्भात निवेदन पाठविण्यात आले असून लवकरच मुख्यमंत्र्यांची भेट घेण्याचा निर्धार लावणी कलाकारांनी रविवारी पुण्यात झालेल्या बैठकीत घेतला. लोककला आणि लावणीचे कार्यक्रम पारंपारिक पद्धतीनेच सादर झाले पाहिजेत. डीजे लावून अश्लील कार्यक्रम करणाऱ्यांवर निर्बंध असायला हवेत, या सर्व प्रकारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारच्या वतीने त्वरित स्वतंत्र सेन्सॉर बोर्ड समितीची स्थापना करण्यात यावी, अशी मागणी या बैठकीत करण्यात आली. बनसोडे म्हणाल्या, 'महाराष्ट्राची लोककला असलेल्या लावणी आणि तमाशाला अनेक वर्षांची परंपरा आहे. मात्र, मध्यंतरी डीजेच्या तालावर नृत्य सादरीकरण सुरू झाले. त्याचा परिणाम पारंपारिक लोककलेवर होत आहे. राज्य सरकारने सेन्सॉर बोर्ड स्थापन करून पारंपरिक लोककलेला नवसंजीवनी प्राप्त करून द्यावी.'

## भारतीय लोकशाही अधिक प्रगल्भ होईल - प्रा.उल्हास बापट

पुणे (दै. संध्या)

"घटना दुरुस्ती विधेयकावरून देशभरात चर्चा सुरु आहे. पुण्यात १५ विधी महाविद्यालय आहेत. त्यामध्ये ४५ हून अधिक प्राध्यापक संविधान शिकवणारे आहेत. पण ही मंडळी समाजाला गरज व्यक्त होताना दिसत नाहीत. संविधान काय आहे हे जनते पर्यंत पोहोचवण्याचे त्यांचे कर्तव्य आहे., " असे मत व्यक्त करत प्रा. उल्हास बापट यांनी सांगितले की, आपली भारतीय लोकशाही मजबूत आहे ती अधिक प्रगल्भ होईल याबद्दल मला पूर्ण विश्वास आहे. रविवारी गांधी भवन, कोथरूड येथे ३१ वे गांधी दर्शन शिबीर संपन्न झाले. यावेळी पहिल्या सत्रात, 'महिला आरक्षण, डिलिमिटेशन विधेयक आणि घटनादुरुस्ती' या विषयावर घटनातज्ञ प्रा. उल्हास बापट यांनी आपले विचार मांडले. यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी डॉ. प्रविण सप्तर्षी उपस्थित होते. यावेळी अभय छाजेड उपस्थित होते.

दुसऱ्या सत्रात अस्थिर जग आणि आपण' या विषयावर ज्येष्ठ पत्रकार, राजकीय विश्लेषक जतीन देसाई यांनी मांडणी केली. या सत्राचे अध्यक्ष अन्वर राजन होते. तिसऱ्या सत्रात अनंत महादेवन दिग्दर्शित फुले हा चित्रपट दाखवण्यात आला. कार्यक्रमाचे संयोजन महाराष्ट्र गांधी स्मारक निधी आणि युवक क्रांती दल यांनी केले. प्रा.उल्हास बापट म्हणाले की, संसदेचे प्रमुख हे राष्ट्रपती असतात. मात्र आपल्याकडे नवीन संसद इमारतीचे उद्घाटन झाले त्यावेळी त्यांनाच बोलावले नाही. संसदेला डेप्युटी स्पिकर गेली अनेक वर्षे नाहीत. लोकसभेची संख्या वाढवली पण राज्यसभेची नाही.

## उरण करंजा मच्छीमार सोसायटीचा मालवण दौरा संपन्न

उरण (दै. संध्या)




उरण - रायगड जिल्ह्यातील उरण येथील करंजा मच्छीमार सोसायटी आणि करंजा मत्स्य बंदर हे आज महाराष्ट्रातील मच्छीमारांसाठी प्रगतीचे एक आदर्श केंद्र मानले जाते. मासेमारीसोबत आदर्श व्यवस्थापनासाठी ते ओळखले जाते. शिस्तबद्ध कार्यप्रणालीतून आर्थिक भरभराट हे या सोसायटीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे. याचे संचालन पूर्णपणे स्थानिक कोळी समुदायाद्वारे केले जाते. मासेमारी करण्यापासून ते त्यांच्या विक्रीपर्यंत आणि संपूर्ण आर्थिक व्यवहारांचा हिशोब ठेवण्यापर्यंतची सर्व जबाबदारी हे बांधव स्वतः चोखपणे पार पाडतात. हजारों मच्छीमारांना शिस्तबद्ध पद्धतीने काम करता यावे, यासाठी तिथली प्रणाली विकसित होत होत भक्कम आणि उपयुक्त बनली आहे. या बंदरातून दरवर्षी तब्बल ४५० ते ५०० कोटी रुपयांच्या माशांची विक्री आणि निर्यात होते. करंजा मच्छीमार सोसायटीचे अध्यक्ष प्रदीप नाखवा यांच्या नेतृत्वाखाली मच्छीमार सोसायटीच्या कार्यकारी मंडळातील काही मंडळी आणि 'ड्रायफ्रूट ग्रुप करंजा'चे सदस्य यांनी कोकण पर्यटनाच्या पंढरीला अर्थात मालवणला भेट दिली. अहोरात्र समुद्राशी नातं राखणाऱ्या या मच्छीमार बांधवांनी त्यांच्या धावपळीच्या आयुष्यातून थोडा वेळ स्वतःसाठी काढला, तोही समुद्राला साक्षी ठेवून.

किल्ले सिंधुदुर्ग व राजकोट येथील छत्रपती शिवरायांच्या भव्य पुतळ्यासमोर हे सर्व दर्यावर्दी नतमस्तक झाले आणि सोबतच मालवण शहर व परिसरातील निसर्गाचा आणि मालवणच्या विशेष आदरातिथ्याचाही त्यांनी भरभरून आनंद घेतला. त्यांनी मालवण बंदर जेटी जवळच्या 'मीज वेव्ह' येथे आपुलकीचा मालवणी पाहुणचार त्यांच्या सदैव स्मरणात राहील आणि प्रत्येक सुट्टीला त्यांची पावलं मालवणकडे वळतीलच, अशीही त्यांनी प्रसन्नपणे ग्वाही दिली.

करंजा आणि मालवण या दोन्ही ठिकाणच्या मच्छीमार संस्कृतीत बऱ्यापैकी साम्य आहे. कोकणच्या पर्यटनाची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालवणच्या सहलीने दोन्हीकडच्या बांधवांमधले जिव्हाळ्याचे नातं हे एकमेकांशी अभ्यासूपणे जोडून राहायची सशक्तता वाढवणारं ठरेल, असंही ड्रायफ्रूट ग्रुप मधल्या सदस्यांनी आवर्जून सांगितलं. या दरम्यान ड्रायफ्रूट ग्रुपच्या सदस्यांनी त्यांच्या सहलीच्या आनंदाला पारंपरिक कोळी नृत्याची जोड देत मालवण साजरं केलं.

# आयआयटी मद्रासच्या बीएस पदवी अभ्यासक्रमाच्या नवीन बॅचसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू

पुणे (दै. संध्या)




इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मद्रास (आयआयटी मद्रास) ने २०२६ च्या शैक्षणिक वर्षासाठी आपल्या बीएस पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू केली आहे. या अभ्यासक्रमांसाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख ३१ मे २०२६ आहे. उच्च दर्जाचे आयआयटी शिक्षण सर्व स्तरांतील आणि विविध पार्श्वभूमीच्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावे या उद्देशाने हे अभ्यासक्रम तयार करण्यात आले आहेत. वयाची कोणतीही अट न ठेवता, बारावी उत्तीर्ण असलेली कोणतीही व्यक्ती या अभ्यासक्रमांसाठी अर्ज करण्यास पात्र आहे. हे पदवी अभ्यासक्रम चार स्वतंत्र अभ्यासक्रमांच्या स्वरूपात उपलब्ध आहेत. बीएस इन डेटा सायन्स अँड अप्लिकेशन्स, बीएस इन इलेक्ट्रॉनिक सिस्टिम्स, बीएस इन मॅनेजमेंट अँड डेटा सायन्स आणि बीएस इन एरोनॉटिक्स अँड स्पेस टेक्नॉलॉजी. हे अभ्यासक्रम अशा पद्धतीने तयार करण्यात आले आहेत की, ते स्वतंत्र पदवी म्हणून किंवा नियमित कॉलेज पदवीसोबत एकाच वेळी पूर्ण करता येतील.

हे अभ्यासक्रम प्रामुख्याने ऑनलाइन पद्धतीने चालवले जातात. मात्र, शैक्षणिक गुणवत्ता आणि लवचिकता जपण्यासाठी भारतभरातील विविध केंद्रांवर प्रत्यक्ष परीक्षा घेतल्या जातात. विद्यार्थी आपल्या सोयीनुसार शिक्षण पूर्ण करू शकतात. तसेच, त्यांच्या शैक्षणिक आणि करिअरच्या उद्दिष्टांनुसार सर्टिफिकेट, डिप्लोमा किंवा डिग्री अशा विविध स्तरांवर अभ्यासक्रम पूर्ण करण्याचे पर्याय येथे उपलब्ध आहेत.

अर्ज करू इच्छिणारे विद्यार्थी आणि पालक अधिक माहितीसाठी अधिकृत पोर्टलला भेट देऊ शकतात.

३१ मे २०२६ ही अर्ज करण्याची अंतिम तारीख असल्याने, इच्छुक विद्यार्थी https://study.आयआयटीm.ac.in या संकेतस्थळावरून अर्ज करू शकतात.

या अभ्यासक्रमांविषयी बोलताना आयआयटी मद्रासचे डीन (अकॅडमिक कोर्सेस) प्रा. प्रताप हरिदोस म्हणाले, "हे बीएस पदवी अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना गुणवत्तेशी कोणतीही तडजोड न करता लवचिक पद्धतीने शिक्षण घेता यावे यासाठी तयार करण्यात आले आहेत. आजच्या काळात विद्यार्थ्यांनी त्यांच्या मुख्य पदवीसोबतच डेटा, टेक्नॉलॉजी आणि आंतरशाखीय विचारसरणीमध्ये मजबूत पाया तयार करण्याची गरज वाढत आहे. या अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांना इतर शैक्षणिक किंवा व्यावसायिक मार्गांचा पाठपुरावा करत असतानाच आयआयटी मद्रास स्तराचे शिक्षण घेण्याची संधी मिळते. त्यामुळे त्यांच्या करिअरच्या संधींमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होते."

बदलत्या करिअर संधी आणि उद्योगांच्या वाढत्या अपेक्षा लक्षात घेता, आयआयटी मद्रास लवचिक शैक्षणिक पद्धतीद्वारे विद्यार्थ्यांना भविष्यासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करण्यास मदत करत आहे. ही पद्धत भौगोलिक मर्यादा, पारंपरिक प्रवेश प्रक्रिया आणि शिक्षणाची कडक चौकट यांसारख्या मर्यादा दूर करण्यास मदत करते.

पारंपरिक अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या तुलनेत, या बीएस पदवी अभ्यासक्रमांसाठी जॉइंट एंट्रन्स एक्झॅमिनेशन (JEE) उत्तीर्ण असण्याची गरज नाही. त्याऐवजी, विद्यार्थी क्वालिफायर प्रक्रियेद्वारे प्रवेश मिळवू शकतात. यामुळे देशभरातील मोठ्या विद्यार्थीवर्गासाठी आता आयआयटी मद्रासचे शिक्षण उपलब्ध झाले आहे.

या बीएस पदवी अभ्यासक्रमांचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ते इतर पदवी अभ्यासक्रमांसोबत एकाच वेळी पूर्ण करता येतात. BCom, बीएससी, BBA किंवा अभियांत्रिकी पदवीचे शिक्षण घेणारे विद्यार्थी देखील आयआयटी मद्रासच्या बीएस अभ्यासक्रमांमध्ये एकाच वेळी प्रवेश घेऊ शकतात. त्यामुळे त्यांना त्यांच्या मुख्य विषयासोबतच विश्लेषणात्मक, तांत्रिक आणि निर्णयक्षमता अधिक सक्षम करण्याची संधी मिळते.

आजच्या स्पर्धात्मक रोजगार क्षेत्रात ही 'दुहेरी-पदवी' लवचिकता अत्यंत महत्त्वाची ठरत आहे. कंपन्या आता अशा पदवीधरांना प्राधान्य देत आहेत, ज्यांच्याकडे विषयाचे सखोल ज्ञान तर आहेच, पण त्यासोबतच डेटावर आधारित आणि आंतरशाखीय समस्या सोडवण्याची उत्तम क्षमता देखील आहे.

देशभरातील हजारो विद्यार्थी या अभ्यासक्रमांमध्ये आधीच सहभागी झाले आहेत. हे बीएस पदवी अभ्यासक्रम आयआयटी मद्रासचे जागतिक दर्जाचे शिक्षण सर्वांसाठी सुलभ करण्याच्या ध्येयाचे निदर्शक आहेत. शिक्षणात सर्वसमावेशकता जपण्यासाठी, पात्र आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना संस्था ७५ टक्क्यांपर्यंत शुल्कात सवलत देते, जेणेकरून पैशांची कमतरता त्यांच्या प्रगतीत अडथळा ठरणार नाही.

या अभ्यासक्रमांची रचना उद्योग आणि शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञांच्या सल्ल्याने तयार करण्यात आली आहे. यात प्रात्यक्षिक शिक्षण, वास्तविक जीवनातील उपयोग आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानावर विशेष भर देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना डेटा विश्लेषण, व्यावसायिक निर्णयक्षमता, इलेक्ट्रॉनिक सिस्टिम्स आणि एरोस्पेस टेक्नॉलॉजी यांसारख्या क्षेत्रांत प्रत्यक्ष अनुभव मिळत असल्याने, ते वेगाने बदलणाऱ्या करिअर संधींसाठी अधिक सक्षम होतात.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### अनिकेत चव्हाण यूथ इनिशिएटिव्ह'च्या माध्यमातून करिअर मार्गदर्शनाचा नवा मंच

पुणे (दैनिक संध्या) : आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ गुण नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या क्षमता, आवडी आणि योग्य दिशादर्शन महत्त्वाचे आहे, या उद्देशाने धारेश्वर विद्या व क्रीडा प्रतिष्ठानचे संचालक अनिकेत सोपान (काका) चव्हाण यांच्या 'अनिकेत चव्हाण यूथ इनिशिएटिव्ह'तर्फे धायरी येथील धारेश्वर विद्या व क्रीडा प्रतिष्ठानच्या संकुलात 'करिअर डिस्कव्हरी समिट २०२६' या विशेष करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमामागील भूमिका स्पष्ट करताना अनिकेत चव्हाण म्हणाले की, "आज अनेक विद्यार्थी आणि पालक करिअरच्या बाबतीत संभ्रमात असतात. पारंपरिक करिअरच्या पलीकडेही अनेक संधी उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांना योग्य वेळी योग्य मार्गदर्शन मिळावे आणि त्यांच्यातील क्षमता ओळखून त्यांना दिशा मिळावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे." कार्यक्रमामध्ये बापूसाहेब गायकवाड, ऋषी हराळ, अनूप कुमार, रमा काळे, रावसाहेब घुगे, विजय नवले अशा विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना करिअरच्या बदलत्या संधी, कौशल्यांचे महत्त्व, व्यक्तिमत्व विकास, स्पर्धा परीक्षा तसेच भविष्यातील रोजगार क्षेत्रांबाबत वास्तवाधारित मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी देखील मोठ्या उत्साहाने सहभाग घेत विविध प्रश्न विचारले. अनिकेत चव्हाण यांनी शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या प्रवासाबाबत बोलताना, 'यात्रा शिक्षणविश्वाची' या माध्यमातून शिक्षण क्षेत्रातील सकारात्मक बदल आणि वास्तव समाजापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले. तसेच युवकांना सक्षम, जागरूक आणि स्वावलंबी बनवण्यासाठी भविष्यातही अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी उपक्रमाचे कौतुक करत अशा मार्गदर्शन कार्यक्रमांची आजच्या काळात मोठी गरज असल्याची भावना व्यक्त केली.

### रंगरंगोटीमुळे अंगणवाडी झाली बोलकी



चाकण (दैनिक संध्या) : सेवाभावी संस्था, ग्रामस्थ, दानशूर कंपन्या आणि येथील नगरसेवकांच्या पुढाकारातून चाकण येथील नेहरू चौकातील अंगणवाडीला आकर्षक रंगरंगोटी केल्यामुळे अंगणवाडी बोलकी झाली असून, रुपडेच पालटून गेले आहे. चाकण येथील नेहरु चौकात बालकांसाठी नवयुग अंगणवाडी आहे. या अंगणवाडीला ॲटलास कॅपको व होम फॉर द चिल्ड्रेन्स यांच्याकडून रंगरंगोटी करण्यात आली. बालकांचे लक्ष वेधण्यासाठी भिंतीवर आकर्षक, सुबक रंगीत चित्र काढण्यात आली आहेत. या अंगणवाडीत सुमारे ४७ बालके शिक्षण घेत असून, मुलांना विरंगुळा वाटावा म्हणून भिंती आकर्षक पद्धतीने रंगविण्यात आल्या आहेत. प्रियंका आगरकर, संध्या नगरकर व शेख या येथे परिश्रम घेत आहेत. नेहरू चौकात अगदी मध्यवर्ती ठिकाणी बालचमुंसाठी नवयुग अंगणवाडी आहे. या अंगणवाडीत शेजारी पाजारी असणारी बालके शिक्षणासाठी त्यांचे पालक घेऊन येत असतात. त्यांना विरंगुळा वाटावा म्हणून या ठिकाणी सातत्याने छोटे छोटे उपक्रम राबवले जातात. या प्रभागाचे नगरसेवक मंगेश कांडगे, नगरसेविका अनिता घोगरे, माजी नगराध्यक्ष शेखर घोगरे आदींसह नेहरू चौकातील सर्वच ग्रामस्थांचे यासाठी विशेष सहकार्य लाभत आहे."



### स्व. आ. सुरेशभाऊ गोरे विद्यालयाचा शेकडा निकाल 97.68 टक्के

चाकण (दैनिक संध्या) : स्व.गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेच्या येथील स्व.आ. सुरेशभाऊ गोरे माध्यमिक विद्यालय इयत्ता दहावीचा निकाल ९७.६८ टक्के लागला असून, विद्यालयाने उज्वल यश संपादन केले आहे. साई राजेश धानके याने ९३.६० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. वैभव संतोष मंचरे याने ९३.०० टक्के गुण मिळवून द्वितीय, तर श्रावणी सुरेश पिसोडे हिने ९२.८० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला. विद्यालयाच्या गुणवत्ता यादीमध्ये विद्यार्थिनींनी विशेष उल्लेखनीय कामगिरी करत बाजी मारली. यशस्वी विद्यार्थ्यांचे चाकणच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे, गटनेते नितीन गोरे, स्व.गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे, उपाध्यक्ष राजेंद्र गोरे, संचालक ओंकार गोरे, मुख्याध्यापिका प्रमिला गोरे, प्राचार्य सचिन आभाळे, प्रिन्सिपल माधुरी गोरे, पर्यवेक्षक सविता कुमकर तसेच विषय शिक्षक दत्तात्रय लिंभोरे, सुवर्णा चौधरी, सिद्धार्थ मळेवडी, स्वाती काळे, रुपाली जैद, वैशाली दांगट, अपर्णा शिंदे, सुवर्णा कणसे, रविना औटी, सुंदर बाला, दीपाली पाटील आदींनी कौतुक केले.

### पुणे जिल्हा परिषदेला उच्च न्यायालयाकडून दिलासा; 60 दिवसांची मुदतवाढ

■ नीरा ग्रामपंचायत व्यापारी गाळे वाटप प्रकरण

नीरा (दैनिक संध्या) : मुंबई उच्च न्यायालयाने पुणे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना मोठा दिलासा देत न्यायालयाच्या पूर्वीच्या आदेशाच्या अंमलबजावणीसाठी अतिरिक्त ६० दिवसांची मुदतवाढ मंजूर केली आहे. या प्रकरणी दाखल करण्यात आलेल्या अंतरिम अर्जावर न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती हितेन वेणेगावकर यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. 'अन्वर सादिक शेख विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर' या याचिकेत पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अंतरिम अर्ज दाखल करून ४ मार्च २०२६ रोजी दिलेल्या आदेशाच्या पालनासाठी अतिरिक्त वेळ मागितला होता. जिल्हा परिषदेकडून न्यायालयात मांडण्यात आले की, संबंधित ६१ गाळाधारकांना वैयक्तिक सुनावणी देण्याची प्रक्रिया सुरू असून त्यासाठी अधिक वेळ आवश्यक आहे. न्यायालयाने अर्जातील मांडणीचा विचार करून जिल्हा परिषदेकडून प्रत्येक गाळाधारकाला सुनावणीची संधी दिली जात असल्याचे नमूद केले. त्यामुळे अर्जातील प्रार्थना मान्य करत मूळ मुदतीनंतर आणखी ६० दिवसांची मुदतवाढ देण्याचे आदेश न्यायालयाने दिले. या प्रकरणात जिल्हा परिषदेकडून ॲड. अश्विन कपाडणीस यांनी बाजू मांडली, तर याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. सोहेल मुजावर यांनी काम पाहिले. राज्य शासनाच्या वतीने अतिरिक्त सरकारी वकील पी. पी. काकडे आणि सहाय्यक सरकारी वकील निशा मेहरा यांनी न्यायालयात बाजू मांडली. या निर्णयामुळे संबंधित गाळाधारकांच्या सुनावणी प्रक्रियेला अधिक वेळ मिळणार असून प्रशासनाला निर्णय प्रक्रियेसाठी दिलासा मिळाला आहे.

# सासवडचा पाणीपुरवठा सुरळीत होणार

## विरोधकांच्या 'हांडा मोर्चा' नंतर सत्ताधाऱ्यांचे प्रत्युत्तर

सासवड (दै. संध्या)



गेल्या काही दिवसांपासून विस्कळीत झालेल्या सासवड शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न आता मार्गी लागणार आहे. वीर पाणीपुरवठा योजनेच्या जॅकवेलवर उच्च क्षमतेचा जनरेटर बसविण्यात आला असून, वीज खंडित झाली तरीही पाण्याचा उपसा अखंडित सुरू राहणार आहे. यामुळे शहराचा पाणीपुरवठा लवकरच सुरळीत होईल, अशी माहिती नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सोमवारी (ता. ११) शिवसेनेच्या नगरसेवकांनी पाणीप्रश्नावरून नगरपरिषदेवर 'हांडा मोर्चा' काढला होता. या पार्श्वभूमीवर सत्ताधारी गटाने तातडीने पत्रकार परिषद घेऊन पालिकेची भूमिका स्पष्ट केली. यावेळी मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण, उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, गटनेते अजित जगताप, पाणी पुरवठा सभापती ज्ञानेश्वर गिरमे, आरोग्य सभापती राजन जगताप, नगरसेवक ज्ञानेश्वर जगताप, प्रदीप राऊत उपस्थित होते.

गराडे आणि घोरवडी तलाव कोरडे पडल्याने सासवड शहर पूर्णतः वीर योजनेवर अवलंबून आहे. सातारा आणि पुणे जिल्ह्यातील वेगवेगळ्या भारनियमनामुळे पाणीपुरवठ्यात येणारे अडथळे दूर करण्यासाठी किर्लोस्कर कंपनीच्या 'सीएसआर' फंडातून वीर जॅकवेलवर ७५० केव्हीचा जनरेटर बसवण्यात आला आहे. यामुळे आता वीज नसतानाही पाणी उपसा अखंड सुरू राहील. दूषित पाण्याची समस्या सोडवण्यासाठी जुन्या पाईपलाईन बदलण्यात येणार असून, भविष्यातील पाणीप्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी 'अमृत २' योजनेतून १४३ कोटींच्या प्रकल्पास मंजुरी मिळाली आहे. याअंतर्गत नवीन जलवाहिन्या, मोठ्या टाक्या आणि जलशुद्धीकरण केंद्र उभारले जाणार असल्याची माहिती सभापती ज्ञानेश्वर गिरमे व राजन जगताप यांनी दिली.

विरोधी गटावर टीका करताना आरोग्य सभापती राजन जगताप म्हणाले की, "विरोधक केवळ स्वतःला पालिकेत केबिन मिळवण्यासाठी स्टंटबाजी करत आहेत. गेल्या चार वर्षांच्या प्रशासकीय राजवटीत झालेल्या दिरंगाईमुळे काही प्रश्न प्रलंबित आहेत. आम्ही पदभार स्वीकारून अवघे तीन-चार महिने झाले असून नियोजित पद्धतीने कामे पूर्ण करत आहोत." विद्यमान आमदारांनी त्यांची ताकद चांगल्या बाबींसाठी वापरावी. त्यांनी २०२५ पासून सासवडसाठी किती निधी उपलब्ध केला.. असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण यांनी सांगितले की, वीर योजनेसाठी 'एक्सप्रेस फिडर' आणि जॅकवेलवर सौर ऊर्जा प्रकल्पासाठी पाठपुरावा सुरू आहे. तसेच कांबळवाडी पंप हाऊसवरही लवकरच जनरेटर बसवण्यात येणार आहे. उन्हाळ्याची तीव्रता लक्षात घेता, ज्या भागात पाणी पोहोचत नाही, तिथे पालिकेच्या वतीने टँकरद्वारे पुरवठा केला जाईल, असेही प्रशासनातर्फे स्पष्ट करण्यात आले.

> "नागरिकांनी घाबरून जाऊ नये. तांत्रिक अडचणी दूर झाल्या असून जनरेटरमुळे आता विजेचा लपंडाव पाणीपुरवठ्यात अडथळा ठरणार नाही. सासवडच्या पाणीप्रश्नावर आम्ही कायमस्वरूपी तोडगा काढण्यास कटिबद्ध आहोत."
> **- आनंदीकाकी जगताप, नगराध्यक्षा, सासवड नगरपरिषद.**

## कल्याणीनगरमध्ये टेरेस फ्लॅटला भीषण आग; जीवितहानी नाही

पुणे (दै. संध्या)

शहरातील कल्याणीनगर भागातील 'स्काय लाउंज' या इमारतीच्या दहाव्या मजल्यावरील एका टेरेस फ्लॅटला सोमवारी (ता. ११) सायंकाळी आग लागली. या आगीत घरातील टीव्ही, फ्रिज, एसी यांसह इतर घरगुती साहित्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. मात्र, अग्निशामक दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणली. त्यामुळे इमारतीमधील इतर घरांना लागणारा मोठा धोका टळला. अग्निशामक दलाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, कल्याणीनगर येथील 'स्काय लाउंज' इमारतीत सोमवारी सायंकाळी पावणेसहा वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. दहाव्या मजल्यावर असलेल्या एका टेरेस फ्लॅटमधून अचानक धुराचे लोट येऊ लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. वाऱ्याचा वेग आणि ज्वलनशील साहित्यामुळे आगीने रौद्र रूप धारण केले होते. परंतु आग लागताच इमारतीमधील रहिवासी सुरक्षितपणे बाहेर पडल्याने मोठा अनर्थ टळला. आगीची माहिती मिळताच अग्निशामक दलाचे दोन बंब तातडीने घटनास्थळी दाखल झाले. येरवडा अग्निशामक केंद्राचे प्रभारी अधिकारी संजय जाधव, बी. टी. कवडे रस्ता केंद्राचे प्रभारी अधिकारी नीलेश लोणकर आणि जवानांनी शर्थीचे प्रयत्न करून काही वेळातच आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळवले. शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.

## अतिक्रमणे नियमित करण्यासाठी अर्ज प्रक्रिया सुरू; अर्ज करण्याचे आवाहन

बारामती (दै. संध्या)

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदीनुसार व दिनांक २५ मार्च २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यातील गरीब व गरजू कुटुंबांच्या निवासस्थानाचा प्रश्न निकाली काढण्यासाठी शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमणे नियमित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील कलम ४० व ५१ तसेच महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ मधील नियम ४३, ४३(अ) व ५२ अंतर्गत विशिष्ट अटी व शर्तींनुसार दिनांक ०१ जानेवारी २०११ रोजी किंवा त्यापूर्वी झालेली व सध्या अस्तित्वात असलेली केवळ निवासी स्वरूपाची अतिक्रमणे नियमित करण्यात येणार आहेत.

अतिक्रमणे नियमित करण्यासाठी पात्रता दिनांक ०१ जानेवारी २०११ रोजी किंवा त्यापूर्वीची व सध्या अस्तित्वात असलेली केवळ निवासी प्रयोजनासाठीची अतिक्रमणेच नियमित करण्यासाठी पात्र राहतील. तसेच संबंधित वस्ती किंवा परिसरातील नागरिकांच्या दैनंदिन गरजांसाठी असलेली किराणा दुकान, मेडिकल, दळणाची चक्की, छोटेखानी दवाखाना आदी स्वरूपाची अतिक्रमणे, अतिक्रमणधारकाच्या निवासस्थानास जोडलेली असल्यास अपवादात्मक परिस्थितीत नियमानुसार विचारात घेतली जाणार आहेत.

अतिक्रमण दिनांक ०१ जानेवारी २०११ पूर्वीचे असल्याचा पुरावा म्हणून मतदार यादीतील नाव, वीज बिल, मालमत्ता कर पावती, निवासी पुराव्यासाठीचे इतर शासकीय दस्तऐवज (शिधापत्रिका वगळून), ग्रामपंचायतमधील आठ-अ उतारा, अतिक्रमण सर्वेक्षण नोंदवही, झोपडपट्टी घोषणेची अधिसूचना आदी पुरावे ग्राह्य धरले जातील. उपग्रह छायाचित्र देखील महत्त्वाचा पुरावा म्हणून मान्य करण्यात येणार आहे.

याशिवाय, चालू वास्तव्यासंदर्भातील मागील एका वर्षातील शासकीय पुरावा सादर करणे आवश्यक राहील. असे उपविभागीय अधिकारी श्री. उत्तम दिघे यांनी स्पष्ट केले आहे.

सदर अतिक्रमण हे केवळ स्व-राहण्यासाठी (निवासी हेतूसाठी) केलेले असावे. व्यावसायिक वापरासाठीची अतिक्रमणे नियमित करण्यासाठी पात्र ठरणार नाहीत.

पात्र व्यक्तींनी (संस्था नव्हे) अतिक्रमण नियमित करण्यासाठी दिनांक ३० डिसेंबर २०२६ पर्यंत अर्ज सादर करावेत.

> ग्रामीण भागातील नागरिकांनी संबंधित गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडे अर्ज करावेत, तर नगरपालिका व नगरपंचायत हद्दीतील नागरिकांनी संबंधित मुख्याधिकारी यांच्याकडे अर्ज सादर करावेत. निर्धारित मुदतीत अर्ज करणाऱ्या पात्र व्यक्तींना त्यांचे अतिक्रमण नियमित होईपर्यंत संरक्षण मिळणार आहे. मात्र, निर्धारित मुदतीनंतर अर्ज न करणाऱ्या अथवा अपात्र व्यक्ती/संस्थांची अतिक्रमणे निष्कासित करण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याचे उपविभागीय अधिकारी श्री. दिघे यांनी सांगितले आहे.

## जुन्नर लोकन्यायालयात ३६२३१ प्रकरणे निकाली

### दोन कोटी नऊ लाख साठ हजार दोनशे अठावन्न हजार रूपयांची वसुली

जुन्नर (दै. संध्या)




शनिवार दिनांक ०९-०५-२०२६ रोजी जुन्नर न्यायालयातील आयोजित राष्ट्रीय लोक न्यायालयामध्ये एकूण ३६२३१ प्रकरणांचा तडजोडीने निपटारा करण्यात येऊन, प्रलंबित व दाखलपुर्व प्रकणांतील एकूण २०,९६०,२५८ /- रूपयांची तडजोडीने वसूली करण्यात आली.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे यांच्या सौजन्याने व तालुका विधी सेवा समिती जुन्नर यांच्या वतीने आयोजित लोकन्यायालयचे उद्घाटन जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय जुन्नर चे न्यायाधीश मा. श्री एस बी शेलार साहेब यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

या प्रसंगी बोलताना, जिल्हा व अति सत्र न्यायाधीश श्री एस बी शेलार यांनी "न्याय आपल्या दारी"! या संकल्पनेनुसार विधिसेवा प्राधीकरण आपल्यापर्यंत पोहोचत आहे पक्षकारांनी लोक न्यायालयाच्या माध्यमातून आपली प्रलंबित प्रकरणे निकाली काढून आयुष्यातील महत्वाचा वेळ आणि पैसा वाचवावा असे आवाहन उपस्थितांना केले.

कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी लोकन्यायालय पॅनल प्रमुख न्यायाधीश जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय जुन्नर मा श्री एस बी शेलार साहेब श्रीमती एस एस जैन ४थे दिवाणी न्यायाधीश क स्तर जुन्नर तसेच जुन्नर वकील बार असोसिएशन चे अध्यक्ष हेमंत हडवळे उपाध्यक्ष निलीमा शेरकर सचिव पुराणिक नलावडे लोक अदालत पॅनल सदस्य ॲड प्रविण मदगुले ॲड श्वेता पवार तसेच समर्थ लॉ कॉलेज बेल्हेचे स्वयंसेवक विद्यार्थी उपस्थित होते

लोकन्यायालयामध्ये दिवाणी, फौजदारी दावा, दाखल पूर्व बँकेची वसुली प्रकरणे ग्रामपंचायत महावितरण पतसंस्था फायनान्सची प्रकरणे तडजोडी करिता ठेवण्यात आली होती दिवसभराच्या कामकाजात लोकन्यायालयाचे २ पॅनल मध्ये दोन्ही बाजूच्या पक्षकारांचे म्हणणे ऐकून व त्यांच्यामध्ये समेट घडवून आणण्याचा प्रयत्न करण्यात येऊन त्याद्वारे एकूण ३६२३१ प्रकरणे आपसी समझोता व तडजोड करून निकाली काढण्यात आली तसेच प्रलंबित व दाखलपुर्व प्रकणांतील एकूण रक्कम २,०९,६०,२५८ रूपयांची वसूली करण्यात आली.

राष्ट्रीय लोकन्यायालय यशस्वी करण्याकरिता मा श्री एस बी शेलार साहेब जिल्हा न्यायाधिश जुन्नर यांच्या न्यायालयात व्ही सी द्वारे पक्षकार हजर झाले. राष्ट्रीय लोकन्यायालय यशस्वी करण्याकरिता जुन्नर वकील बार असोसिएशनचे सदस्य, पोलीस अधिकारी, कर्मचारी व न्यायालयीन कर्मचारी, पंचायत समिती जुन्नर, बँक , ग्रामपंचायत, महावितरण, पतसंस्था, फायनान्स, व यांचे मोलाचे योगदान लाभले.

## पंतप्रधानांच्या आवाहनाचा सराफा बाजारावर काय परिणाम झाला?

पुणे (दै. संध्या)

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'वर्षभर घरात कोणताही कार्यक्रम असला तरी सोने खरेदी करू नये,' असे केलेल्या आवाहनानंतर देशातील सराफ बाजारात चर्चांना उधाण आले आहे. या विधानाचा परिणाम सोन्याच्या विक्रीवर होण्याची शक्यता व्यक्त केली जात असली, तरी पुण्यातील सराफ व्यावसायिकांनी सध्या 'वेट ॲण्ड वॉच'ची भूमिका घेतली आहे. अद्याप ग्राहकांच्या प्रतिसादात कोणताही मोठा बदल जाणवलेला नसल्याचे व्यावसायिकांचे म्हणणे आहे. सराफ बाजारात सध्या लग्नसराईचा हंगाम सुरू असून, दागिने आणि गुंतवणुकीसाठी सोन्याची खरेदी कायम आहे. त्यामुळे पंतप्रधानांच्या आवाहनाचा तात्काळ परिणाम बाजारावर झालेला दिसत नाही. अनेक ग्राहक आधीच ठरवलेली खरेदी करत असून, काही ग्राहक मात्र पुढील परिस्थितीचा अंदाज घेत निर्णय घेत असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. सराफ व्यावसायिकांच्या मते, भारतीय कुटुंबांमध्ये सोने हे केवळ गुंतवणुकीचे साधन नसून परंपरा, सुरक्षितता आणि सामाजिक प्रतिष्ठेशी जोडलेले आहे. विवाह, धार्मिक कार्यक्रम आणि विविध समारंभांमध्ये सोन्याला विशेष महत्त्व असल्याने खरेदी पूर्णपणे थांबणे कठीण असल्याचे मत व्यक्त होत आहे. त्याचवेळी, सोन्याच्या वाढत्या दरामुळे ग्राहक आधीच सावधपणे खरेदी करत असल्याचेही बाजारातील चित्र आहे.

"सध्या बाजारात कोणतीही घबराट किंवा खरेदीत मोठी घट दिसत नाही. ग्राहक नियमितपणे व्यवहार करत आहेत. पुढील काही दिवसांत परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतरच या विधानाचा बाजारावर किती परिणाम होतो, हे स्पष्ट होईल. पुढील काही आठवड्यांत ग्राहकांचा कल, सोन्याचे दर आणि बाजारातील व्यवहार यावरूनच या आवाहनाचा प्रत्यक्ष परिणाम किती होतो, याचे स्पष्ट चित्र समोर येणार आहे."

## वैष्णवी शिंपी हिने पटकावला "कॅलिस्टा इंडिया २०२६" मानाचा मुकुट

पुणे, पिंपरी (दै. संध्या)



आपल्या उपजत सौंदर्याबरोबरच परीक्षकांनी विचारलेल्या मार्मिक, तिरकस प्रश्नांना प्रचंड आत्मविश्वासाने उत्तर देऊन आपले व्यक्तिमत्व आणि बौद्धिकता सिद्ध करत जळगाव येथील वैष्णवी शिंपी हिने टाळ्यांच्या कडकडाटात आणि रंगीबेरंगी प्रकाश झोतात "कॅलिस्टा इंडिया २०२६" या बहुचर्चित सौंदर्य स्पर्धेचा प्रथम क्रमांकाचा आकर्षक मानाचा मुकुट आणि रोख २० हजार रुपयांचे बक्षीस पटकावले. कॅलिस्टा पेजंट्स आयोजित "कॅलिस्टा इंडिया २०२६" आणि "कॅलिस्टा मिस, मिसेस महाराष्ट्र २०२६" या सौंदर्यस्पर्धेत अंतिम फेरीत विजेत्या ठरलेल्या सौंदर्यवतींना मुकुट, रोख बक्षीस, प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. चिंचवड येथील एल्प्रो सिटी मॉल येथे आयोजित केलेल्या या अंतिम फेरीस कॅलिस्टा पेजंट्सचे कार्यकारी संचालक संजीव जोग, आधार पशुपक्षी मित्र फाउंडेशन व हमारा विश्व फाउंडेशनच्या संचालिका अनिता अग्रवाल, मायफिल्म प्रॉडक्शनचे मयूर सोनवणे, करिश्मा सुर्ती, स्पर्धेचे परीक्षक दीपाली मुंधारे, ज्योती कामत, सोनल परब, डॉ. भवानी, रुबिना चव्हाण, रोशिता रोज, स्वरा खरोटे, इरा खान, सानिया खान, अनामिका राणी आणि अनिता गनवीर तसेच देशभरातून सहभागी झालेल्या आणि अंतिम फेरीत स्थान मिळवलेल्या ३३ सौंदर्यवती उपस्थित होत्या.

प्रथम उपविजेतेपद पश्चिम बंगाल मधील काजल सोनकर हिला मुकुट, रोख १७ हजार रुपयांचे पारितोषिक, तर द्वितीय उपविजेतेपद विभागून जागृती गाणवे (रायगड) आणि वृषाली अजोटीकर (पुणे) यांना मुकुट आणि रोख १५ हजार रुपयांचे बक्षीस देऊन गौरविण्यात आले. ऑनलाईन कॅलिस्टा इंडिया २०२६ विजेत्या म्हणून डॉ. स्नेहल नारखेडे पोल, प्रियांका झाडे आणि अनिता महापुरे यांचा विशेष गौरव करण्यात आला. तसेच ऑनलाईन कॅलिस्टा महाराष्ट्र २०२६ विजेत्या अंजना गावले आणि डॉ. सुषमा सोनवणे यांनाही गौरविण्यात आले. शुभांगी मंगरुळकर, पूजा बनोडकर आणि प्राची राय यांना उत्तेजनार्थ विशेष गौरवचिन्ह, मुकुट आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेत सहभागी झालेल्या प्रत्येक स्पर्धकाला आयोजकांच्या वतीने सोनेरी नथ, पैठणी साडी, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.